सत्यमेव जयते

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

रासनिप्रा

## ‘अ’, ‘ब’, ‘क’ व ‘ड’ वर्ग सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी यांचेकरिता

# मार्गदर्शक हस्तपुस्तिका

(दि.१५-०७-२०२० पर्यंत अद्ययावत)


जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र.:- ०२०-२६०५०६४१

## ‘अ’,‘ब’,‘क’ व ‘ड’ वर्ग
## सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी
## निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी
## यांचेकरिता

# मार्गदर्शक हस्तपुस्तिका

(दि.१५-०७-२०२० पर्यंत अद्ययावत)

वाय-२९
१

# !!... शुभ संदेश ...!!

- महाराष्ट्र राज्य हे देशातील सहकार चळवळीच्या संख्यात्मक व गुणात्मक वाटचालीमध्ये अग्रेसर राज्य असून भारतीय राज्यघटनेच्या ९७ व्या घटनादुरूस्तीने देशातील सहकार चळवळीमध्ये दिर्घकालीन गुणात्मक व सकारात्मक परिणाम करणाऱ्या दुरूस्त्या संमत करण्यात आलेल्या आहेत. भारतीय राज्य घटनेतील सुधारणेनंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करून राज्यातील सर्व सहकारी संस्थांची संचालक मंडळाची, पदाधिकाऱ्यांची व संचालकमंडळातील नौमित्तीक रिक्त पदांची निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात आणि निःपक्षपातीपणे पार पाडण्याकरिता **" राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण "** ही स्वायत्त यंत्रणा गठीत करण्यात आलेली आहे.

- राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरीता शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ हे नियम तयार करून त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी सुधारणा केलेल्या आहेत. सदर नियमातील तरतूदींप्रमाणे प्राधीकरणास प्राप्त अधिकारीतेस अनुसरून सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडताना आवश्यक असणाऱ्या सूचना या कार्यालयीन आदेश, परिपत्रके आणि मार्गदर्शक सूचनांचे माध्यमातून प्राधीकरणाकडून वेळोवेळी निर्गमीत करून सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात आणि निःपक्षपातीपणे पार पाडण्याकरीता कसोशीने कार्यवाही करण्यात येत आहेत.

- राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडताना निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणेबरोबरच राज्यातील "क" व "ड" वर्गीकरणातील समाविष्ठ सहकारी संस्थांची मोठी संख्या विचारात घेऊन सहकार विभागाव्यतिरिक्त अन्य अनुभवी सेवानिवृत्त कर्मचारी, वकील व प्रमाणीत लेखापरीक्षकांचेही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे पॅनल गठीत करण्यात आलेले आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रियेशी संबंधित महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४, प्राधीकरणास प्राप्त अधिकारीतेस अनुसरून सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडताना आवश्यक असणा-या सूचनांबाबतचे कार्यालयीन आदेश, परिपत्रके आणि मार्गदर्शक सूचना आणि भारत निर्वाचन आयोगाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकरीता तयार केलेल्या अदयावत हस्तपुस्तिकेचा अभ्यास करून या हस्तपुस्तिकेच्या रूपाने समग्र व अदयावत एकत्रीकरण करून देणेकरीता आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांचे अध्यक्षतेखाली एकूण ०६ सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली होती. सदरची हस्तपुस्तिका तयार करण्याकरीता समिती सदस्यांबरोबरच प्राधीकरणाचे सचिव श्री यशवंत गिरी आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे सदरची अभ्यासपूर्ण हस्तपुस्तिका तयार करण्यामधील योगदान उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे.

- निवडणूक निर्णय अधिकारी व प्राधीकृत अधिकारी आणि निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता या हस्तपुस्तिकेचे संकलन, संपादन व प्रकाशनाचा हा हेतू यशस्वी व सफल व्हावा अशी अपेक्षा करतो. राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाच्या या हस्तपुस्तिकेच्या अभ्यासपूर्ण वापराकरीता आपणास हार्दिक शुभेच्छा....!!!

(डॉ जगदिश पाटील)
आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**अनुक्रमणिका**


| अ.क्र | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | १ |
| | सर्वसाधारण | १ |
| | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व निवडणूक नियमातील सुधारणा | १ |
| | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० | २ |
| | अधिनियमातील निवडणूकविषयक तरतूदी | ३ |
| | अधिनियमातील सभासदत्वाविषयी तरतूदी | ४ |
| | अधिनियमातील समिती सदस्यांच्या अपात्रते विषयी तरतूदी | १० |
| २ | मतदार यादी | १३ |
| | मतदार यादी तयार करणे बाबत निवडणुक नियमातील तरतुदी | १३ |
| | मतदार यादी तयार करण्याकरीता स्त्रोत | १७ |
| | प्रारुप व अंतिम मतदार यादी प्रसिध्दी | १७ |
| | अर्हता दिनांक | १७ |
| | मतदार यादीचा कार्यक्रम | १८ |
| ३ | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या | २० |
| | निवडणूक प्रक्रियेसाठी अधिकारी व कर्मचारी नियुक्ती | २० |
| | निवडणूक प्रक्रियेसाठी मदतनीस नियूक्ती | २२ |
| | मतमोजणी प्रक्रियेसाठी अधिकारी / कर्मचारी नियुक्ती | २२ |
| | पोलिस बंदोबस्त मागणी | २२ |
| | निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीसाठी प्राधिकरणाकडून मंजूरी | २२ |
| ४ | निवडणूक कार्यक्रम तयार करणे, मंजूरी व प्रसिध्दी | २४ |
| | "अ" व "ब" प्रवर्ग सहकारी संस्थाचा निवडणूक कार्यक्रम जाहिर करणे | २४ |
| | "क" प्रवर्ग सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहिर करणे | २५ |
| | "ड" प्रवर्ग सहकारी संस्थाचा निवडणूक कार्यक्रम जाहिर करणे | २६ |
| | "अ" व "ब" प्रवर्ग सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी | २६ |
| | "क" व "ड" प्रवर्ग सहकारी संस्थाचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी | २६ |
| ५ | निवडणूक प्रक्रिया सुरु होणेपूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही | २७ |
| ६ | नामनिर्देशन | २८ |
| | नामनिर्देशन पत्र स्विकृती व प्रसिध्दी | २८ |
| | उमेदवारी अर्ज विक्री / स्वीकृती रजिस्टर | २९ |
| | नामनिर्देशन अनामत व अर्ज शुल्क | ३० |
| | नामनिर्देशन पत्राची छाननी | ३० |
| | उमेदवारी अर्ज मागे घेणे. | ३१ |
| | निवडणुक लढविण्या-या उमेदवारांची यादी तयार करणे आणि निवडणूक बोध चिन्हांचे वाटप | ३२ |
| | बिनविरोध / अविरोध निवडणूक | ३५ |

| अ.क्र | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ७ | आचारसंहिता नियम -३ | ३६ |
| | मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई | ३६ |
| | मतदान केंद्रामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तणूक केल्याबाबत शास्ती | ३६ |
| | मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबदल शास्ती | ३६ |
| | मतदान केंद्रावरून मतपत्रिका बाहेर नेणे हा अपराध असणे | ३६ |
| | इतर अपराध व त्याबददलच्या शास्ती | ३७ |
| ८ | मतदान | ३८ |
| | मतदानापूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही | ३८ |
| | मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी यांचेसाठी मार्गदर्शक सूचना.<br>अ) मतदान साहित्य ताब्यात घेणे<br>ब) निवडणूक मतदान प्रतिनिधीची नेमणूक करणे<br>क) मतदान / मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक | ३८ |
| | मतदानापुर्वी उमेदवाराचे निधन होणे. | ३९ |
| ९ | निवडणूकीच्या वेळी मतदानाची रीत — नियम ३३ ते ३५ | ४० |
| | मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र | ४० |
| | मतपत्रिकेचा नमुना | ४० |
| | मतदानाबाबत दक्षता | ४० |
| | मतदानाच्या पूर्व संध्येला करावयाची पूर्व तयारी | ४१ |
| | मतदान केंद्रावरील व्यवस्था | ४१ |
| | मतदान अधिकारी यांचे काम<br>अ) मतदान अधिकारी — क्र १ , २, ३, ४ व ५ | ४२ |
| | मतदानासाठी मतदान पेटी तयार करणे. (नियम — ३८) ईव्हिएम मार्फत मतदान प्रक्रियेसाठी तयारी करणे. (नियम ३९) | ४३ |
| | मतदाराची ओळख पटविणे. (नियम - ४०) | ४४ |
| | मतदारास मतपत्रिका देणे. (नियम - ४३) | ४४ |
| | मतदानाची कार्यपध्दती (नियम - ४४ ) | ४५ |
| | मतदान केंद्रात प्रवेश (नियम - ३७ ) | ४५ |
| | तोतयोगिरी विरुध्द खबरदारी घेणे. (नियम - ४२ ) | ४६ |
| | ओळखी बाबत आव्हान देणे. (नियम -४१) | ४६ |
| | अंध किंवा अपंग मतदारांच्या मताची नोंदणी (नियम - ४६) | ४७ |
| | खराब झालेल्या व परत केलेल्या मतपत्रिका (नियम - ४७) | ४७ |
| | दुबार नोंदविलेली मते (नियम - ४८) | ४७ |
| | मतदान बंद करणे (नियम - ४९) | ४८ |
| | मतपेटी मोहोरबंद करणे. (नियम - ५०) | ४८ |
| | मतपत्रिकांचा हिशोब (नियम - ५१) | ४८ |
| | पाकिटे मोहोरबंद करणे. (नियम - ५२) | ४९ |
| | मतपेटी व साहित्य निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सुपूर्द करणे. (नियम - ५३) | ४९ |
| | मतपेटया नष्ट इत्यादी झाल्यास नव्याने मतदान करणे. | ५० |

| अ.क्र | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **१०** | मतमोजणी / फेर मतमोजणी | ५१ |
| | मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी प्रवेश | ५१ |
| | मतपेटयांची छाननी व त्या उघडणे. | ५२ |
| | मतपत्रिकांची छाननी व आक्षेपित मतपत्रिका बाद करणे. | ५२ |
| | मतमोजणीची कार्यपध्दती | ५३ |
| | मतमोजणी सतत चालू ठेवणे. | ५४ |
| | स्वतंत्र मतदारसंघ नसतील किंवा एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील अशा बाबतीतील मतमोजणीची कार्यपद्धती :- | ५४ |
| | नव्याने मतदान घेण्यात आल्यावर मतमोजणी परत सुरू करणे. | ५४ |
| | मतांची फेर मोजणी | ५५ |
| **११** | निवडणूक निकालाची घोषणा व प्रसिध्दी (नियम ६४) | ५६ |
| **१२** | अनामत रक्कमा व जप्ती | ५७ |
| **१३** | उमेदवार खर्चाचे लेख्यांचे सनियंत्रण व तरतूदी | ५८ |
| **१४** | निवडणूक निधीचे व्यवस्थापन | ५९ |
| **१५** | पदाधिकारी निवड | ६० |
| **१६** | निवडणूक संबंधीचे विवाद | ६१ |
| **१७** | भ्रष्टाचार आणि निवडणूक विषयक अपराध (नियम ७९) | ६२ |
| **१८** | निवडणूकीच्या संबंधातील भ्रष्टाचार अपराध आणि त्यासाठीची शास्ती | ६३ |
| **१९** | निवडणूकांमधील अधिकारी इत्यादींनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे. | ६४ |
| **२०** | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सादर करावयाचा अहवाल | ६५ |
| **२१** | निवडणूक संबंधीत कागदपत्रांची अभिरक्षा आणि विल्हेवाट | ६६ |
| | निवडणूकीसंबंधीची कागदपत्रे अभिरक्षेत ठेवणे. | ६६ |
| | निवडणूक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी (नियम ७२) | ६६ |
| | निवडणुक विषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे. (नियम ७३) | ६६ |
| **२२** | नैमित्तीक रिक्त जागा (नियम - ७४) | ६७ |
| **२३** | "ड" वर्ग सहकारी संस्था निवडणूक (नियम ७६) | ६८ |
| **२४** | समारोप | ८१ |
| **२५** | ई - १ ते ई - १७ नमुने | ८२ |

# १. प्रास्ताविक

## १.१ सर्वसाधारण

**राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाचे गठन थोडक्यात परिचय**

**भारतीय** राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणे ९७ व्या घटना दुरूस्तीनुसार प्रचलीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा.

➢ कलम ७३ कब (१) अन्वये राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याकरीता **"राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण"** या स्वायत्त प्राधिकरणाचे गठन करण्यात आले आहे.

- **प्राधिकरणास या सुधारणा अन्वये खालील अधिकार प्राप्त झालेले आहेत.**

➢ सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता राज्यशासन, सहकारी संस्था अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील कोणताही **अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करणे**

➢ सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता **सार्वजनीक व खाजगी मालमत्ता, वाहने किंवा सेवा यांचे अधिग्रहण करणे**

➢ सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता **"आदर्श आचार संहिता"** निश्चित करुन लागु करणे.

➢ सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता **मतदार यादींचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करणे.**

➢ **पदाधिकारी निवडणूक व नैमित्तिक रिक्त जागा** भरणे.

- **प्राधिकरणाचे धोरण**
- सहकारी संस्था व कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात निःपक्षपातीपणे घेणे.
- मतदार यादी पारदर्शक पद्धतीने नियमानुसार अचुक, निर्दोष आणि व्यापक प्रसिद्धीसह तयार करणे.
- मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे; आवश्यकतेनुसार मतदान केंद्रांची संख्या वाढविणे.
- नवीन तंत्रज्ञान व विशेष ज्ञान यांचा वापर करुन संस्थांच्या वर्गांच्या निवडणुका घेणे.
- सहकारी संस्थेच्या व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विद्यमान समितीची मुदत संपण्यापुर्वी तिची निवडणूक प्रक्रिया पुर्ण करणे.
- सहकारी संस्थांच्या निवडणूक खर्चाबाबत काटकसरीचे धोरणाचा अवलंब करणे.

## १.२ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व निवडणुक नियमातील सुधारणा

- **दिनांक ०६.०८.२०१८ चे अधिसुचनेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था (समित्यांची निवडणूक) नियम २०१४ मध्ये झालेल्या सुधारणा**

➢ संस्था वर्गीकरणात बदल.

➢ ई - १ नमुन्यातील माहिती प्राधिकरणासह जिल्हा / प्रभाग / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जतन करणे अनिवार्य.

➢ अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यापासून १० ते २० दिवसांच्या आत (दोन्ही दिवस वगळून) निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द होणे अनिवार्य.

➢ नामनिर्देशन पत्र स्वीकृतीकरीता ५ कार्यालयीन कामाचे दिवस अनुज्ञेय करणे अनिवार्य.

➢ राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकारी यांनी साक्षांकीत केलेला जातीचा दाखला जोडणे आवश्यक. (कलम ७३ ब - स्पष्टीकरण विचारात घेणे आवश्यक)

➢ राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी घोषणापत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक.

- “ड” वर्गातील सहकारी संस्थेच्या निवडणूकीत सहभागी होणाऱ्या उमेदवारांना निवडणूक खर्च सादर करण्याची आवश्यकता नाही.
- उमेदवारांनी निवडणूक खर्च विहीत मुदतीत सादर न केल्यास अशा उमेदवारांना तीन वर्षाकरीता अपात्र ठरविण्याचे अधिकार निबंधकास प्राप्त.
- प्रत्येक उमेदवाराने निवडणूक निकाल घोषित झाल्यापासून ६० दिवसात निवडणूक खर्चाच्या नोंदवहया संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य.
- निवडणूक निकाल प्राप्तीनंतर कलम ७३ अअअ अंतर्गत समिती गठनाची कार्यवाही निबंधकाने करणे अनिवार्य.
- “क” व “ड” वर्गातील सहकारी संस्थेच्या निवडणूकीकरीता मतदार यादी अंतिम करण्याचे अधिकार तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्राप्त.

- **दि. ०९.०३.२०१९ चे शासन अध्यादेशाप्रमाणे “महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०” मध्ये झालेल्या सुधारणा**

- शासनाचे दिनांक ९.०३.२०१९ चे अध्यादेशाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये केलेली सुधारणा दिनांक २३.७.२०१९ रोजी अंतिम केलेली आहे.
- **तसेच “ प्रकरण १३ - ब सहकारी गृहनिर्माण संस्थां ”** व **“ कलम १५४- ब ”** नव्याने समाविष्ठ.
- कलम ७३ सीबी (११) च्या परंतुकानुसार २५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी संस्थेची निवडणूक प्रक्रिया संस्था स्तरावर विहित केलेल्या रितीने पुर्ण करण्याची तरतूद समाविष्ठ.
- परिणामी अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांची निवडणूक विहीत केलेल्या पद्धतीने संस्था स्तरावर घेणे अनिवार्य.
- “ त्या - त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही मावळत्या समितीच्या सदस्यांचा पदावधी संपल्यावर तात्काळ नव्याने निवडून आलेल्या समितीच्या सदस्यांना पद ग्रहण करणे शक्य व्हावे म्हणून **विद्यमान समितीची मुदत संपण्यापूर्वी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे प्रत्येक संस्थेच्या समितीची निवडणूक घेण्यात येईल ”**.

## १.३ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

### कलम ७३ कब :- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण

**पोटकलम (१)**

- ✓ सहकारी संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्याचे आणि त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचे अधिक्षण, निर्देशन आणि नियंत्रण राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे निहित असेल.
- ✓ समिती सदस्यांची सार्वत्रिक निवडणूक, नैमित्तिक रिक्त पदे यांची निवडणूक आणि पदाधिका-यांची निवडणूक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे घेण्यात येईल.

**पोटकलम (८)**

- ✓ राज्य शासन प्राधिकरणास त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देईल.

**पोटकलम (१०)**

- ✓ **मावळत्या समितीच्या सदस्यांचा पदावधी संपल्यावर तात्काळ नव्याने निवडुन आलेल्या समिती सदस्यांना पद ग्रहण करणे शक्य व्हावे म्हणुन विद्यमान समितीची मुदत संपण्यापुर्वी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे प्रत्येक संस्थेच्या समितीची निवडणूक घेण्यात येईल.**

**पोटकलम (११)**

- ✓ नविनतम तंत्रज्ञान आणि विशेष ज्ञान यांचा वापर करुन निवडणुका घेण्यात येतील.
- ✓ संस्थांची किंवा संस्था वर्गांची उद्दीष्ट्ये, कार्यक्षेत्र, व्यवसायाची मानके, योग्य व्यवस्थापन व सदस्यांचे हितसंबंध या बाबी विचारात घेउन शासनास संस्थांचे वर्गीकरण करता येईल.
- ✓ २५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्थांची निवडणूक प्रक्रिया संबंधीत संस्थांनी संस्था स्तरावर विहीत केलेल्या पद्धतीने पुर्ण करणे क्रमप्राप्त आहे.

**पोटकलम (१२)**

- ✓ राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण संस्थेच्या समिती सदस्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर समिती गठीत झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसांच्या आत पदाधिका-यांची निवडणूक घेईल.

**पोटकलम (१४) सहकारी संस्थांच्या समितीचे निवडणुकीबाबत कर्तव्य -**

- ✓ (अ) समिती तीची मुदत संपण्याच्या किमान सहा (६) महिनांपुर्वी आपला पदावधी संपण्याबाबत प्राधिकरणास कळवेल.
- ✓ (ब) समितीमध्ये किंवा पदाधिका-यांमध्ये नैमित्तिक रिक्त पद निर्माण झाल्यास त्या दिनांकापासुन पंधरा (१५) दिवसांच्या आत प्राधिकरणास कळविण्यात येईल.
- ✓ (क) समिती, प्राधिकरणाने निर्देशित केल्यानुसार प्राधिकरणास आवश्यक असलेल्या नोंदवह्या, अभिलेख आणि माहिती पुरवील.
- ✓ (ड) समिती, प्राधिकरणास मतदार यादी तयार करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत, सहाय्य व सहकार्य पुरवील.

**कलम ७३ आय :- निवडणूक घेण्यासाठी कळविण्याची आणि सहाय्य करण्याची समितीची जबाबदारी**

- ✓ मुदत संपण्यापुर्वी कलम ७३ कब (१४) मध्ये नमुद केल्यानुसार निवडणूक घेणेबाबत प्राधिकरणास कळविणे हे समितीचे कर्तव्य असेल.
- ✓ समितीने प्राधिकरणास तसे कळविण्यात कसुर केला आणि त्यामुळे किंवा कोणत्याही कारणाने मुदत संपण्यापुर्वी निवडणूक घेता आली नाही तर समिती सदस्यांचे अधिकारपद संपुष्टात येईल.
- ✓ उपरोक्त स्थितीत निबंधक कलम ७७-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त करेल.
- ✓ प्राधिकृत अधिकारी तात्काळ निवडणूक घेण्याबाबत प्राधिकरणास कळविल आणि निवडणूक घेण्यासाठी प्राधिकरणास आवश्यक ते सहाय्य करील.

## १.४ अधिनियमातील निवडणूक विषयक तरतुदी

### कलम ७३ अअअ :- समितीची रचना करणे

**पोटकलम (१)**

- ✓ समितीच्या सदस्यांची संख्या एकवीस (२१) पेक्षा अधिक असणार नाही.

**पोटकलम (२)**

- ✓ उपरोक्त २१ सदस्यां व्यतिरिक्त दोन (२) ‘ तज्ञ संचालक’ स्विकृत केले जाऊ शकतात.
- ✓ त्याशिवाय १७ पर्यंत समिती सदस्य संख्या असलेल्या संस्थांना एक आणि १७ पेक्षा अधिक समिती सदस्य संख्या असलेल्या संस्थांना २ ‘कार्यलक्षी संचालक’ नियुक्त करता येतात.
- ✓ शासनाचे भागभांडवल असणा-या संस्थेत शासनाचे २ ‘नामनिर्देशित समिती सदस्य’ असतील.
- ✓ समितीत जर २ कार्यलक्षी संचालक असतील तर त्या पैकी १ मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनेचा प्रतिनिधी असेल.
- ✓ तज्ञ संचालकांना, कार्यलक्षी संचालकांना आणि शासन नामनिर्देशित समिती सदस्यांना मताधिकार नाही.

**पोटकलम (३)**

- ✓ समिती सदस्यांचा आणि तिच्या पदाधिका-यांचा पदावधी ’ निवडणुकीच्या दिनांकापासुन पाच (५) वर्षांचा असेल.
- ✓ पदाधिका-यांची मुदत समितीच्या मुदती इतकीच असेल.
- ✓ संस्थेच्या समितीची निवडणूक, संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणासाठी घेतली जाऊ शकत नसेल तर, समितीचे विद्यमान सदस्य, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, नियमितपणे सदस्य असल्याचे मानन्यात येईल.

**पोटकलम (४)**

- ✓ समितीतील नैमित्तिक रिक्त पदे ज्या प्रवर्गातुन रिक्त झाली त्याच प्रवर्गाच्या क्रियाशील सदस्यांतुन भरता येतील.

**पोटकलम (५)**

- ✓ निवडणूक निर्णय अधिका-याने सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर समितीची रचना झाली नसेल तर दोन तृतियांश किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य निवडुन आल्यास निर्वाचित समिती सदस्यांची नावे त्यांच्या कायम पत्त्यासह निवडणूक निकालाच्या दिनांकापासुन सात (७) दिवसांच्या आत संबंधित निबंधकाकडे पाठविणे बंधनकारक आहे.
- ✓ संबंधीत निबंधकाने त्यास कळविलेली नावे, त्याला प्राप्त झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसांच्या आत सुचना फलकावर प्रसिद्ध केली पाहिजेत.
- ✓ उर्वरीत सदस्य निवडुन आल्यावर त्यांची नावेही त्याच रितीने प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.

**कलम ७३ ब :- समितीवर राखीव जागा आणि त्यासाठी निवडणूक**

- ✓ राज्य शासन विशेष अथवा सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्देश देईल अशा संस्था किंवा संस्थावर्गाच्या बाबतीत पुढील प्रमाणे तीन (३) जागा राखीव असतील-

  (अ) अनुसुचित जाती / जमाती सदस्यांसाठी एक (१) जागा

  (अ-१) इतर मागास प्रवर्गासाठी एक (१) जागा आणि

  (अ-२) विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्गासाठी एक (१) जागा
- ✓ उपरोक्त प्रवर्गातील कोणताही व्यक्तीगत सदस्य किंवा सदस्य सहकारी संस्थेच्या समितीचा सदस्य राखीव जागेसाठी निवडणूक लढविण्यास पात्र असेल.
- ✓ समितीच्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीस राखीव जागेसाठी मत देण्याचा हक्क असेल.
- ✓ राखीव जागेपैकी कोणत्याही जागेवर कोणत्याही व्यक्तीची निवड न झाल्यास सदर जागा त्याच प्रवर्गातुन ‘नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

**कलम ७३ क :- महिलांकरिता राखीव जागा**

- ✓ कोणत्याही संस्थेच्या समितीवर "महिलांकरीता" दोन (२) जागा राखीव असतील.
- ✓ त्यासाठी संस्थेच्या सदस्यांमध्ये "महिला" प्रवर्गातील सदस्य असणे आवश्यक आहे.
- ✓ निवडणुकीत महिला सदस्य निवडुन आले नाही तर, त्या जागा महिला सदस्यांतुन स्विकृत करुन भरण्यात येतील.
- ✓ केवळ महिला सदस्य असलेल्या संस्थेच्या समितीला सदर आरक्षण लागु नाही.

## १.५ अधिनियमातील सभासदत्व विषयक तरतुदी

### कलम ११ : विविक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचा निबंधकांचा अधिकार

- ✓ एखादी व्यक्ती एखाद्या संस्थेची किंवा संस्था वर्गाची ‘सभासद ’ होण्यास पात्र आहे किंवा कसे? या प्रश्नाचा निर्णय देण्याचा अधिकार संस्थेच्या निबंधकास आहे.
- ✓ त्या व्यक्तीस नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन म्हणणे सादर करण्याची संधी दिल्यानंतर निबंधक लेखी आदेशाद्वारे सदर प्रश्नाचा निर्णय देऊ शकतात.
- ✓ सदर कलमान्वये खालील प्रश्नांचा निर्णय देण्याचा अधिकार निबंधकास आहे:-

  १. एखादी व्यक्ती शेतकरी आहे किंवा नाही/

  २. एखादी व्यक्ती संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहते किंवा नाही?

  ३. एखादी व्यक्ती कोणताही पेशा, धंदा किंवा व्यवसाय करीत आहे किंवा नाही?

४. एखादी व्यक्ती कलम २२(१अ) अन्वये घोषित केलेल्या व्यक्तीवर्गापैकी आहे किंवा नाही ?

आणि सदर कलमान्वये त्या व्यक्तीस अपात्रता प्राप्त झाली आहे किंवा नाही?

(कलम २२ (१ अ) :- संस्थेच्या हितसंबंधास बाधा आणणारा किंवा संस्था करित असलेल्या व्यवसायासारखाच व्यवसाय / धंदा / नोकरी करीत असलेला व्यक्ती त्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या सभासदत्वासाठी अपात्र असतो.)

✓ सभासदाच्या पात्रतेबाबतचे वाद अथवा तक्रार ही संस्थेच्या 'निबंधकाच्या' अधिकारितेतील बाब असुन निवडणूक निर्णय अधिकारी अशा प्रश्नांचा निर्णय देण्यास सक्षम नाही.

✓ निवडणूक प्रक्रियेदरम्यान अंतिम प्रमाणित मतदार यादी प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही सभासदाने मतदार यादीतील कोणत्याही सभासदाच्या पात्रतेबाबत प्रश्न उपस्थित केल्यास, अशा सभासदास संबंधित संस्थेच्या निबंधकासमक्ष दाद मागणेबाबत लेखी स्वरुपात तातडीने कळवावे.

## कलम २२ :- जिला सदस्य होता येईल अशी व्यक्ती

**पोटकलम (१)** कलम २४ मधील तरतुदीस अधीन राहुन खालील व्यक्तींना कोणत्याही संस्थेचा सभासद म्हणुन दाखल करु घेता येईल :

अ. भारतीय संहिता अधिनियम, १८७२ अन्वये करार करण्यास सक्षम व्यक्ती

आ. भागीदारी संस्था, कंपनी किंवा कायद्याने नोंदणी झालेला निगमनिकाय किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणी झालेली संस्था

इ. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० खाली नोंदलेली किंवा नोंदणी झाल्याचे समजण्यात येणारी संस्था

ई. राज्यशासन किंवा केंद्रशासन

उ. स्थानिक प्राधिकरण

ऊ. नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था

ऋ. ठेवीदार किंवा वित्तीय सेवा उपभोक्ता

✓ सदर पोटकलमाच्या पहिल्या परंतुकान्वये खंड (अ) मधील करार करण्यास सक्षम व्यक्ती ही तरतुद शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेल्या संस्थाना लागु नाही.

✓ सदर पोटकलमाच्या दुस-या परंतुकान्वये 'कंपनी' किंवा 'भागीदारी संस्था' राज्य शासनाने सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे घालुन दिलेल्या अटी व शर्तीना अधिन राहुन फक्त संघीय संस्था किंवा नागरी संस्था (महापालिका किंवा नगरपालिका क्षेत्रात व्यवसाय करणा-या संस्था) किंवा औद्योगिक संस्था यांचे सभासदत्व स्विकारु शकतात.

**पोटकलम (१अ)** संस्थेच्या हितसंबंधास बाधा आणणारा किंवा संस्था करित असलेल्या व्यवसायासारखाच व्यवसाय / धंदा / नोकरी करित असलेला व्यक्ती त्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या सभासदत्वासाठी अपात्र असतो.

**पोटकलम (१ब)** पोटकलम (१अ) अन्वये एखादा सदस्य अपात्र आहे असा निर्णय संबंधित संस्थेच्या निबंधकाने कलम ११ मधील तरतुदीन्वये दिल्यास, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी अशा अपात्र घोषित सदस्याचे सदस्यत्व आदेशाद्वारे रद्द करु शकतो आणि अशा आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर सदर अपात्र व्यक्ती संबंधित संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होते.

## कलम २४ :- नाममात्र सदस्य व सहयोगी सदस्य

✓ कलम २२ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरीही संस्थेस कोणत्याही व्यक्तीस नाममात्र सदस्य किंवा सहयोगी सदस्य म्हणुन दाखल करुन घेता येईल.

✓ नाममात्र सदस्यास संस्थेच्या नफ्यात किंवा मालमत्तेत कोणत्याही स्वरुपात कोणताही भाग मिळण्याचा हक्क असणार नाही.

✓ नाममात्र सदस्यास सर्वसाधारण सदस्याच्या विशेषाधिकारांपैकी व हक्कांपैकी कोणताही विशेषाधिकार व हक्क असत नाहीत.

- ✓ परंतु, नाममात्र सदस्यास किंवा सहयोगी सदस्यास कलम २७ (८) च्या तरतुदीस अधीन राहुन संस्थेच्या उपविधीत नमुद केलेले विशेषाधिकार व हक्क असतील आणि तो उपविधीतील तरतुदींना अनुसरुन दायीत्वांना बांधिल असेल.
- ✓ कलम २७ (८) मधील तरतुदीप्रमाणे कोणत्याही नाममात्र सदस्यास मतदानाचा अधिकार नाही आणि नाममात्र सदस्य संस्थेच्या समितीचा सदस्य होण्यास किंवा संस्थेचा प्रतिनीधी म्हणुन इतर कोणत्याही संस्थेवर नेमणुकीस पात्र असत नाही.

## कलम २६ :- सदस्यांचे हक्क व कर्तव्ये

### पोटकलम (१)

- ✓ कोणताही सदस्य अधिनियम, नियम आणि उपविधीत तरतुद केल्याप्रमाणे हक्कांचा वापर करण्याचा हक्कदार असेल.
- ✓ कोणत्याही सदस्यास, त्याने सदस्यत्वा बाबत संस्थेच्या उपविधीत तरतुद केल्याप्रमाणे रक्कम संस्थेस चुकती करेपर्यंत किंवा हितसंबंध धारण करेपर्यंत अशा हक्कांचा वापर करता येणार नाही.
- ✓ सदस्यत्वाच्या हक्कांचा वापर करण्यासाठी संस्थेने सदस्याच्या किमान भागभांडवलाच्या रकमेत वाढ केल्यास, संस्थेने तिच्या सदस्यांना यथोचित मागणी नोटिस देणे आणि पुर्ततेसाठी वाजवी कालावधी देणे बंधनकारक आहे.

### पोटकलम (२) सदस्याची कर्तव्ये

- ✓ प्रत्येक संस्थेच्या सदस्याची दोन (२) प्रमुख कर्तव्ये आहेत.

(अ) लागोपाठ पाच (५) वर्षांच्या कालावधीत होणा-या सर्वसाधारण सभांपैकी किमान एका सभेस उपस्थित राहणे. परंतु ज्या सदस्याची अनुपस्थिती ‘सर्वसाधारण सभेने’ क्षमापित केली आहे अशा सदस्यास ‘अक्रियाशील’ म्हणुन वर्गीकृत केले जाणार नाही.

(आ) संस्थेच्या उपविधीत नमुद केल्याप्रमाणे संस्थेच्या सेवांचा किमान मर्यादेत उपभोग घेणे.

- ✓ परंतु जो सदस्य लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत अधिमंडळाच्या किमान एका सभेस उपस्थित राहणार नाही आणि संस्थेच्या उपविधीत नमुद केल्याप्रमाणे संस्थेच्या सेवांचा किमान मर्यादेत उपभोग घेणार नाही अशा सदस्यास ‘अक्रियाशील सदस्य’ म्हणुन वर्गीकृत करण्यात येईल.
- ✓ कोणत्याही सदस्य ‘अक्रियाशील’ म्हणुन वर्गीकृत झाल्यास, ती संस्था वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांका पासुन ३० दिवसांच्या आत, संबंधित सदस्यास अशा वर्गीकरणाबाबत विहित रितीने कळवील.
- ✓ जो अक्रियाशील सदस्य असे वर्गीकरण झाल्यापासुन पुढील पाच वर्षात अधिमंडळाच्या किमान एका सभेस उपस्थित राहणार नाही आणि संस्थेच्या उपविधीत नमुद केल्याप्रमाणे संस्थेच्या सेवांचा किमान मर्यादेत उपभोग घेणार नाही असा सदस्य अधिनियमाचे कलम ३५ अन्वये कार्यवाही करुन संस्थेतुन काढुन टाकला जाण्यास पात्र असेल.
- ✓ अक्रियाशील सदस्य म्हणुन वर्गीकृत झालेल्या सदस्याने उपरोक्त तरतुदीनुसार पात्रता निकषांची पुर्तता केल्यास त्याचे ‘क्रियाशील सदस्य’ म्हणुन पुनःवर्गीकरण होऊ शकते.
- ✓ एखाद्या सदस्याच्या वर्गीकरणाबाबत वाद उपस्थित झाल्यास त्या सदस्यास वर्गीकरण केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांच्या आत संस्थेच्या निबंधकासमक्ष अपील करता येते.

## कलम २७ :- सदस्यांचा मतदानाचा अधिकार

### पोटकलम (१)

- ✓ कोणत्याही सदस्यास एक पेक्षा अधिक मत असणार नाही. ( स्पष्टीकरण: “नामिकेतील एकापेक्षा अधिक उमेदवारांस मते दिल्यास” ते एकच मत समजण्यात येईल. उदा. १५ समिती सदस्य निवडावयाचे असल्यास ती १५ मते म्हणजे एकच मत समजण्यात येते. )
- ✓ मत देण्याच्या अधिकाराचा व्यक्तीशः वापर अनिवार्य आहे. बदली व्यक्तीद्वारे मतदान करता येत नाही.

- ✓ समसमान मते पडल्यास सभापतीस एक निर्णायक मत देता येते. परंतु, प्राधिकरणाने नियुक्त केलेला 'निवडणूक निर्णय अधिकारी' मतदान करु शकत नाही.

**पोटकलम (१अ)**

- ✓ जो क्रियाशील सदस्य संस्थेच्या कामकाजात सहभागी होण्यात आणि उपविधीत नमुद केलेल्या किमान सेवांचा वापर करण्यास कसूर करील तो सदस्य क्रियाशील सदस्य असण्याचे बंद होईल आणि त्याला मतदानाचा हक्क असणार नाही.

**पोटकलम (२) सहयोगी सभासदाचा मतदानाचा हक्क**

✓संस्थेचा भाग एक पेक्षा अधिक व्यक्तींनी संयुक्तपणे धारण केला असल्यास ज्या व्यक्तीचे भाग प्रमाणपत्रात पहिल्या स्थानावर नाव असेल त्या व्यक्तीस मतदानाचा अधिकार असेल.

✓भाग प्रमाणपत्रात पहिल्या स्थानावर नाव असलेली व्यक्ती 'अनुपस्थित' असल्यास तिच्या नंतर दुस-या स्थानावर नाव असलेल्या व्यक्तीस आणि पहिल्या दोन्ही स्थानांवर नाव असलेल्या दोन्ही व्यक्ती अनुपस्थित असल्यास त्यानंतरच्या स्थानावर भाग प्रमाणपत्रात नाव नमुद असलेल्या व्यक्तीस मतदानाचा अधिकार असेल.

**पोटकलम (३) संघीय संस्थेच्या कामकाजातील मताधिकार**

✓संघीय संस्थेचे भाग धारण करणा-या सदस्य संस्थांना त्या संघीय संस्थेच्या कामकाजात मत देण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही क्रियाशील सदस्याची नियुक्ती करता येईल आणि अशा सदस्यास स्वतःच्या संस्थेच्या वतीने त्या संघीय संस्थेच्या कामकाजात मत देण्याचा अधिकार असेल.

- ✓ सदर मताधिकार संघीय संस्थेच्या भाग भांडवलात निधी गुंतविल्याच्या म्हणजेच भाग प्रमाणपत्र धारण केल्याच्या दिनांकापासुन तीन (३) वर्षांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर प्राप्त होईल.
- ✓ कलम ७३ब अन्वये राखीव जागेसाठी निवडणुकीत कोणाही व्यक्तीला एकापेक्षा अधिक मत असणार नाही.

**पोटकलम (३अ) सदस्य झाल्यानंतर मताधिकार प्राप्त होणेसाठी कालावधी**

- ✓ संस्थेच्या व्यक्तीगत सदस्यास 'सदस्य' म्हणुन नावनोंदणी झाल्या नंतर दोन (२) वर्षांचा कालावधी पुर्ण झाल्यावर मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो.
- ✓ **सदर दोन (२) वर्षांच्या कालावधीची अट 'सहकारी गृहनिर्माण संस्था' आणि 'सहकारी व्यापारी संकुल संस्था' यांचे बाबतीत लागु नाही.**

**पोटकलम (४) कंपनी / निगम-निकाय मताधिकार**

- ✓ एखाद्या संस्थेचे सदस्यत्व जर कंपनी किंवा निगम-निकाय यांनी धारण केले असले तर अशा कंपनी किंवा निगम-निकायास संस्थेच्या कामकाजात स्वतःच्या वतीने मत देण्यासाठी स्वतःच्या संचालक किंवा अधिका-यास नियुक्त करता येईल आणि त्याला कंपनी / निगम-निकायाच्या वतीने मत देण्याचा अधिकार असेल.

**पोटकलम (५) भागीदारी संस्थेचा मताधिकार**

- ✓ एखाद्या संस्थेचे सदस्यत्व जर भागीदारी संस्थेने धारण केले असले तर अशा भागीदारी संस्थेस संस्थेच्या कामकाजात स्वतःच्या वतीने मत देण्यासाठी स्वतःच्या भागीदारास नियुक्त करता येईल आणि त्याला भागीदारी संस्थेच्या वतीने मत देण्याचा अधिकार असेल.

**पोटकलम (६) स्थानिक प्राधिकरण / सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांचा मताधिकार**

- ✓ एखाद्या संस्थेचे सदस्यत्व जर स्थानिक प्राधिकरण / सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांनी धारण केले असले तर अशा स्थानिक प्राधिकरण / सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांना संस्थेच्या कामकाजात स्वतःच्या वतीने मत देण्यासाठी स्वतःच्या सदस्यास किंवा विश्वस्तास नियुक्त करता येईल आणि त्याला स्थानिक प्राधिकरण / सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांचे वतीने मत देण्याचा अधिकार असेल.

**पोटकलम (७) संघीय संस्थेच्या सदस्यांचे मताधिकार**

- ✓ संघीय संस्थेच्या सदस्यांचे मताधिकार 'महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१' आणि त्या संस्थेचे उपविधी यातील तरतुदींद्वारे विनियमित करण्यात येतील.

**पोटकलम (८) नाममात्र सदस्याचा मताधिकार**

- ✓ **कोणत्याही नाममात्र सदस्यास मतदानाचा अधिकार नाही आणि नाममात्र सदस्य संस्थेच्या समितीचा सदस्य होण्यास किंवा संस्थेचा प्रतिनीधी म्हणुन ईतर कोणत्याही संस्थेवर नेमणुकीस पात्र असत नाही.**

**पोटकलम (९) नामनिर्देशित समिती सदस्याचा मताधिकार**

- ✓ कोणत्याही संस्थेच्या समितीवर असणा-या शासनाच्या किंवा बँकेच्या नामनिर्देशित व्यक्तीस त्या संस्थेच्या पदाधिका-याच्या कोणत्याही निवडणुकीच्या वेळी मत देण्याचा अधिकार असणार नाही.

**पोटकलम (१०) थकबाकीदाराचा मताधिकार**

- ✓ संस्थेकडुन कर्ज घेणारा सदस्य ज्या वेळी 'थकबाकीदार' ठरेल, त्यावेळी त्यास कलम ७३ कअ (१) (एक) च्या स्पष्टीकरणात तरतुद केल्याप्रमाणे, त्या संस्थेच्या कामकाजात मत देण्याचा कोणताही अधिकार नसेल.
- ✓ परंतु, पणन व प्रक्रिया संस्थांचे बाबतीत सदस्याने संस्थेस आपले विक्रेय उत्पादन पुरविण्याचे दायित्व पार पाडले असेल आणि अशा उत्पादनाचे मुल्य संस्थेस देय रकमेपेक्षा कमी नसेल तर अशा सदस्यास थकबाकीदार म्हणुन समजण्यात येणार नाही.

**पोटकलम (११)**

- ✓ पोटकलम (११) च्या तरतुदीची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ कृषी पतसंस्थेस यथोचित आदेश देता येतील.

**Section** 154B-4. (1) Notwithstanding anything contained in section 22, the society may admit any person as an associate, joint or provisional Member. (2) Right to vote and contest the election shall be subject to the provisions of sub-sections (2), (3) and (4) of section 154B-11.

**Section** 154B-10. (1) A Member shall be entitle to exercise such rights as provided under this Act, rules and bye-laws.

(2) Every Member of a housing society, whether registered before or after the commencement of the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Act, 2019, to whom plot of land or dwelling units have been allotted, shall be issued certificate of allotment by the co-operative housing society under its seal and signature in such form as may be prescribed. Subject to the provisions of the Transfer of Property Act, 1882 or the Registration Act, 1908, any allotment (including re-allotment), of a plot of land or dwelling unit in a building of a co-operative housing society to its Member as per terms of allotment shall entitle such member to hold such plot of land or dwelling unit with such title, right and interest, as the case may be.

(3) Except when there is a contract to the contrary, a Member of cooperative housing society shall not be entitle to any title or interest in any plot of land or dwelling unit in a building of a co-operative housing society until he has made such payment as may be specified by the co-operative housing society towards the cost of such plot of land or, construction of such dwelling unit, as the case may be, to the co-operative housing society.

(4) No Member shall be eligible for being appointed, nominated, elected, co-opted or for being a Member of a Committee, if he is a defaulter of the society.

(5) (i) It shall be the duty of the Member of the society to pay the dues of the society within time as decided by society in its general meeting. (ii) Member shall vacate the flat when required for redevelopment of the building or buildings of the society as decided in its general meeting. (iii) Member shall perform his duties as provided in this Act, rules and bye-laws.

(6) The Associate Member shall have right to contest the election to the Committee with prior written consent of a Member.

(7) Any action contemplated against the original Member in the Act shall be applicable to such an Associate Member.

**Section** 154B-11. (1) No Member of society shall have more than one vote in its affairs : Provided that, every right to vote shall be exercised personally : Provided further that, in the case of an equality of votes, the Chairman shall have a casting vote in the meeting of a society.

(2) The Associate Member shall have right to vote with prior written consent of a Member.

(3) The provisional Member shall have right to vote.

(4) In case of joint Member the person whose name stands first in the share certificate, shall have right to vote. In his absence, the person whose name stands second, and in the absence of both, the person whose name stands next and likewise, who is present and who is not a minor, shall have right to vote.

(5) In case of Association of society, authorised Member of member society shall have right to vote.

(6) In case of company or firm or any other body corporate or local authority or any legal body constituted under any law for the time being in force, the authorised director or person or any one of the partners as appointed by the firm, shall have right to vote.

**त्याच प्रमाणे कलम १५४ बी ०७ ,१९,२०,२१,२२,२३, यातील तरतुदी देखील विचारात घ्याव्यात. तसेच या सुधारणातील इतर तरतुदीदेखील लागुपुरत्या विचारात घ्याव्यात.**

- **कलम १५४ - ब (७) - गृहनिर्माण संस्थेची देणी चुकती केल्याखेरीज, हस्तांतरितीने योग्य कालावधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यत्वासाठी अर्ज केला असल्याखेरीज आणि ते संपादित केल्या असल्या खेरीज : सदस्यांचे वारस किंवा त्याचा नामनिर्देशित यांच्याकडे हस्तांतरणाखेरीज भागाचे किंवा हितसंबंधाचे किंवा भोगवटा हक्कांचे हस्तांतरण हे परिणामकारक होणार नाही.**
- **कलम १५४ - ब (१९) - समिती ही राज्यशासन, राजपत्रातील अधिसुचनेद्वारे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी ठरवील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली असेल.**
- **जेथे निबंधकाद्वारे वेळोवेळी ठरविण्यात येतील इतक्या संख्येच्या समितीच्या सदस्यांच्या २/३ पेक्षा अधिक सदस्य निवडुन आले असतील तेथे संस्थेची समिती निवडणुक निर्णय अधिका-याने निवडणूकीचा निकाल घोषित करण्याच्या दिनांकास गठीत झालेली असेल. परंतु, २/३ सदस्य संख्या अपुर्णांकात असल्यास ती निकटतम उच्च संख्येच्या पुर्णांकात करण्यात येईल.**
- **समितीच्या निर्वाचीत सदस्याचा आणि तिच्या पदाधिका-यांचा पदावधी , नव्याने घटीत केलेल्या समितीच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल. समितीतील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद हे स्वीकृतीद्वारे भरता येईल आणि स्विकृत सदस्यांचा पदावधी समितीच्या मुदतीइतका असेल.**
- **कलम १५४ - ब (२०) - मध्ये नमुद तरतुदीप्रमाणे संस्थेच्या समित्यांमध्ये आणि तिच्या निवडणूकीमध्ये ३ विवक्षित जागा राखीव असतील.**
- **कलम १५४ - ब (२१) - मध्ये नमुद तरतुदीप्रमाणे प्रत्येक संस्थेच्या समित्यांवर महिला सदस्यांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी महिलांकरिता २ जागा राखीव ठेवण्यात याव्यात.**

**कलम १५४ - ब (२२) - कलम १५४ - ब (२०) व कलम १५४ - ब (२१) मधील तरतुदींप्रमाणे सदस्य उपलब्ध होईपर्यंत किंवा निवडून येईपर्यंत, अशा राखीव जागा व्यवस्थापन समितीच्या बैठकीच्या गणपुर्तीकरीताच्या सदस्य संख्येसाठी विचारात घेण्यात येणार नाहीत.**

- **कलम १५४ - ब (२३) - समिती व तिच्या सदस्यांची अनर्हता,**
- **(१) जर कोणतीही व्यक्ती ,**
- **(एक) कोणत्याही संस्थेची कसुरदार असेल,**
- **(दोन) ती ज्या गृहनिर्माण संस्थेची सदस्य आहे त्या गृहनिर्माण संस्थेची सदनिका भाडयाने, पोटभाडयाने देण्याचा किंवा त्यांची विक्री करण्याचा व्यवसाय करीत असेल.**
- **(तीन) ती कलम ७९, ८८ , १५४ ब- ८(२) किंवा १५४ ब- २७ अन्वये जबाबदार धरण्यात आली असेल किंवा कलम ८५ अन्वये चौकशीचा खर्च देण्यासाठी जबाबदार धरण्यात आली असेल.**
- **(चार) या अधिनियमांन्वये किंवा त्याखालील नियमांन्वये कोणत्याही प्रकारे अनर्ह ठरवलेली असेल.**
- **(पाच) कलम ७३ क अ (१) (फ) च्या (७) ,(८) व (९) च्या तरतुदींअन्वये कोणतीही अनर्हता ओढवून घेतलेली असेल.**

**अशी कोणतीही व्यक्ती समिती सदस्य म्हणून नियुक्त, नामनिर्देशित, स्वीकृत केली जाण्यास, निवडून दिली जाण्यास पात्र असणार नाही.**

- (२) **अशाप्रकारे अनहर्ता ओढवून घेतलेली असल्यास समिती सदस्य असल्याचे बंद होईल व ती जागा रिक्त झाली असल्याचे समजण्यात येईल.**
- (३) **उपरोक्त नमुद खंड (दोन), (तीन), (चार) व (पाच) अन्वये ज्या दिनांकास ज्या सदस्याने अनर्हता ओढवून घेतल्यामुळे सदस्य असल्याचे बंद झाले असेल त्या दिनांकापासुन पाच वर्षासाठी समितीचा सदस्य म्हणून पुनर्नियुक्त, पुनर्स्वीकृत, पुनर्नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही.**
- (४) **ज्या सदस्याने पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनर्हतेखेरीज इतर अनर्हता ओढवून घेतल्यामुळे समितीचा सदस्य असण्याचे बंद झाले असेल तर अशी अनर्हता अस्तित्वात असण्याचे बंद झाल्यानंतर लवकरात लवकर समितीचा सदस्य म्हणून पुनर्नियुक्त, पुनर्स्वीकृत किंवा पुनर्नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असेल.**

## १.६. अधिनियमातील समिती सदस्यांच्या अपात्रताविषयक तरतुदी

**कलम ७३ कअ :- समितीची आणि तिच्या सदस्यांची निरर्हता**

**पोटकलम (अ-१)**

✓ यंत्रसामग्री, अवजारे, सामग्री, विक्रेय वस्तु किंवा ईतर माल खरेदी करण्यासाठी सदस्यांना कर्ज देणा-या संस्थाच्या बाबतीत किंवा अशा मालाचा धंदा करणा-या संस्थांच्या बाबतीत खालील व्यक्ती अशा संस्थेच्या समितीचा सदस्य होण्यास ‘अपात्र’ आहेत-

- जो सदस्य किंवा ज्याच्या कुटुंबातील कोणताही सदस्य अशा मालाचा विक्रेता असेल
- अशा मालाचा धंदा करणा-या कंपनीचा संचालक असेल
- अशा मालाचा धंदा करणा-या भागीदारी संस्थेचा भागीदार असेल

**पोटकलम (१)**

✓ **कोणतीही व्यक्ती पुढील बाबतीत संस्थेच्या समितीचा सदस्य म्हणुन नेमणुक होण्यास किंवा नामनिर्दिष्ट होण्यास किंवा निवडुन येण्यास किंवा स्विकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणुन राहण्यास अपात्र असेल-**

**(एक) ती व्यक्ती कोणत्याही संस्थेची कसुरदार असेल**

कसुरदार या संज्ञेत पुढील व्यक्तींचा समावेश होतो-

अ. प्राथमिक कृषी पतसंस्थेबाबत पीक कर्जाची नियत दिनांकास परतफेड करण्यात कसुर करणारा सदस्य

ब. मुदत कर्ज देण्या-या संस्थेबाबत कर्जाचा कोणताही हप्ता थकविणारा सदस्य

क. संस्थेकडुन माल किंवा अग्रीम किंवा सेवा उधारीवर घेऊन मागणी नोटीस मिळाल्यानंतर अग्रीमाची रक्कम किंवा सेवा / मालाची किंमत ३० दिवसांच्या आत परत करण्यास कसुर करणारा सदस्य

ड. बिगर कृषी पत संस्थेच्या बाबतीत कर्जाचा कोणताही हप्ता थकविणारा सदस्य

ई. गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत, संस्थांना देणे असलेल्या रकमांच्या प्रदानाची मागणी करणारी टपाल दाखली पाठविलेली लेखी नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यंच्या आत देय रकमा चुकत्या करण्यात त्याने कसूर केली असेल असा सदस्य.

फ. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा राज्य सहकारी बँक यांचे बाबतीत, सदस्य जर-

(१) विकास संस्थेव्यतिरिक्त अन्य संस्थेचे प्रतिनिधीत्व करणा-या सदस्याच्या संस्थेने ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधी साठी बँकेची देय रक्कम प्रदान करण्यात कसुर केला असेल तर

(२) विकास संस्थेचा कसुरदार असेल किंवा बँकेची कसुरदार असलेल्या विकास संस्थेचा पदाधिकारी असेल तर

(३) ज्या संस्थेची व्यवस्थापक समिती निष्प्रभावित झाली आहे अशा संस्थेचे प्रतिनिधीत्व करणारा सदस्य असल्यास

**(दोन) निबंधकाच्या मते, त्या व्यक्तीने जर पत कर्जाची सहकारी पणन किंवा प्रक्रिया यांच्याशी सांगड घालण्याच्या संदर्भात सहकारी संस्थाविषयक अनुशासनाचा जाणुनबुजुन भंग केला असेल तर.**

**(दोन-अ) कलम २६(२) अन्वये 'अक्रियाशील सदस्य' म्हणुन वर्गीकृत करण्यात आले असेल तर**

**(तीन) एखाद्या व्यक्तीला कलम ७९ किंवा कलम ८८ खाली जबाबदार ठरविले असेल तर किंवा कलम ८५ खाली चौकशीचा खर्च देण्यासाठी जबाबदार धरले असेल तर**

**(चार) जर त्या व्यक्तीवर या अधिनियमान्वये किंवा त्याखालील नियमान्वये कोणतीही निरर्हता ओढवली असेल तर**

**(पाच) संस्था चालवीत असलेला व्यवसाय, एकतर संस्थेच्या कार्यक्षेत्रात चालवित असेल तर किंवा पोटकलम** (अ १) खंड (ब)**च्या तरतुदींचे उल्लंघन करुन चालवीत असेल तर**

**(सहा) जर ती व्यक्ती कोणत्याही संस्थेची पगारी कर्मचारी असेल तर (खुद्द कर्मचा-यांची पतसंस्था वगळुन) किंवा कोणत्याही संस्थेत कोणतेही 'लाभाचे पद' धारण करीत असेल तर**

**(सात) जर त्या व्यक्तीस दोन पेक्षा अधिक मुले असतील तर** (**दि.** ०७.०९.२००२ **नंतर जन्मलेले तिसरे अपत्य असल्यास**)

(**आठ) कलम १४६ खाली अपराधसिध्दी झाली असल्यास आणि कलम १४७ खाली शिक्षा झाली असल्यास**

**(नउ) ईतर कोणत्याही कायद्यातील तरतुदी अन्वये एखाद्या अपराधाकरिता एक वर्षापेक्षा अधिक कालावधीची शिक्षा झाली असेल तर**

**पोटकलम (२)**

✓ पोटकलम (१) अन्वये कोणतीही अपात्रता ओढवली असल्यास, तो व्यक्ती समितीचा सदस्य असणे बंद होईल आणि त्याची जागा रिकामी झाल्याचे मानण्यात येईल.

**पोटकलम (३)**

✓ पोटकलम (अ १) आणि पोटकलम (१) चे खंड (एक) ते (नऊ) अन्वये अपात्रता ओढवल्यामुळे समितीचे सदस्य असण्याचे बंद झालेला सदस्य त्या दिनांकापासुन पुढील पाच वर्षांच्या मुदतीसाठी पुन्हा समिती सदस्य होण्यास अपात्र असेल.

**पोटकलम (४)**

✓ पोटकलम ३ मध्ये नमुद अपात्रते व्यतिरिक्त इतर अपात्रता ओढवल्यामुळे समिती सदस्य होण्यास अपात्र झालेला सदस्य सदर अपात्रता दुर झाल्यानंतर पुन्हा समिती सदस्य होण्यास पात्र असेल.

- **उपविधीतील तरतुदीनुसार समिती सदस्यांची अपात्रता**

i. नामनिर्देशीत व्यक्ती नैतिक अध:पतनाच्या अपराधाबाबत सिध्दापराधी ठरली असेल तर सिध्दपराधी ठरल्यापासून ६ वर्षाचा कालावधी उलटल्याशिवाय.

ii. नामनिर्देशीत व्यक्तीला संस्थेची देय असलेली रक्कम मागणी करणारी, नोंदणीकृत डाकेने अथवा हातबटवडयाने पाठविलेली नोटीस मिळाल्यापासून तिने ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये संस्थेची देय असलेली रक्कम भरण्यास कसूर केला असल्यास.

iii. नामनिर्देशीत व्यक्तीला कलम ७९ किंवा ८८ किंवा १४७ अन्वये जबाबदार धरण्यात आले असेल तर किंवा अधिनियमातील कलम ८५ अन्वये चौकशीचा खर्च देण्यासाठी तिला जबाबदार धरण्यात आले असल्यास.

iv. सहयोगी सदस्यांच्या बाबतीत, त्याने मुळ सदस्याचे उपविधी अन्वये विहित केल्याप्रमाणे ना हरकत प्रमाणपत्र आणि हमीपत्र, सादर केलेले नसल्यास.

v. नामनिर्देशीत व्यक्तीने आपली सदनिका किंवा तिचा कोणताही भाग संस्थेच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय पोटभाडयाने, लिव्ह अँड लायसन्स (परवाना नि संमती) पध्दतीने किंवा काळजीवाहू पध्दतीने दिला असेल किंवा,

vi. संस्थेतील आपले भागभांडवल आणि हितसंबंध विकले असतील तर पात्र ठरणार नाही.

vii. **निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी ज्या संस्थांचे निवडणूक प्रक्रिया पुर्ण करावयाची आहे त्या संस्थांचे मंजूर उपविधीची प्रत या अनुषंगाने अभ्यास करणे आवश्यक आहे.**

**कलम ७५ (५) :- वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत कसुर केल्यामुळे अपात्रता**

✓ विहित कालावधीत वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्यात कसुर केल्यास किंवा वार्षिक सर्वसाधारण सभा विषयक ईतर तरतुदींचे अनुपालन करण्यात कसुर केल्यास, जबाबदार अधिकारी किंवा समिती सदस्य पाच (५) वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी अपात्र घोषित केल्या जाऊ शकतो.

**कलम ७६ (२) :- विशेष सर्वसाधारण सभेबाबत कसुर केल्यामुळे अपात्रता**

- ✓ विहित कालावधीत विशेष सर्वसाधारण सभा बोलाविण्यात कसुर केल्यास किंवा विशेष सर्वसाधारण सभा विषयक इतर तरतुदींचे अनुपालन करण्यात कसुर केल्यास, जबाबदार अधिकारी किंवा समिती सदस्य पाच (५) वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी निबंधक विनिर्दिष्ट करील अशा आदेशान्वये अपात्र घोषित केला जाऊ शकतो.

**कलम ७८ अ (१) (ब) :- समिती सदस्यास वैयक्तीक रितीने निष्प्रभावित केल्यामुळे येणारी अपात्रता**

- ✓ समितीच्या कोणत्याही सदस्याने अधिनियमाच्या उक्त तरतुदीत नमुद केलेल्या बाबतीत कसुर केल्याचे संस्थेच्या निबंधकाचे मत झाल्यावरुन त्या समिती सदस्यास वैयक्तिक रितीने जबाबदार ठरवुन पदावरुन निष्प्रभावित केले असल्यास तो सदस्य समितीच्या पुढच्या एका कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन पुन्हा निवडुन येण्यास अपात्र असेल.

**कलम ७९ अ (३) (अ) :- लोकहितास्तव शासनाने दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करण्यात कसुर केल्यामुळे येणारी अपात्रता**

- ✓ कलम ७९ अ अन्वये शासनास लोकहितास्तव कोणत्याही संस्थेस अथवा संस्थावर्गास निदेश देण्याचे अधिकार आहेत. एखाद्या समिती सदस्याने अशा निदेशांचे अनुपालनात कसुर केल्याची निबंधकाची खात्री झाल्यास निबंधक सदर समिती सदस्यास आदेशाच्या दिनांकापासुन सहा (६) वर्षांच्या कालावधीसाठी अनर्ह घोषित करु शकतो.
- ✓ Section 154 b (17) - "housing society" means a society, the object of which is to provide its Members with open plots for housing, dwelling houses or flats ; or if open plots, the dwelling houses or flats are already acquired, to provide its Members common amenities and services and to demolish existing buildings and reconstruct or to construct additional tenements or premises by using potential of the land ;
- ✓ (a) "tenant ownership housing society" means a society the object of which is to allot the plots to its Members to construct the dwelling unit or flats thereon or to allot the dwelling units already constructed and where land is held either on lease hold or free hold basis by the society and houses are owned or to be owned by the Members ;
- ✓ (b) "tenant co-partnership housing society" means a society the object of which is to allot the flats already constructed or to be constructed to its Members and where both land and building or buildings are held either on free-hold or lease-hold basis by the society ; and
- ✓ (c) "other housing societies" means the house mortgage co-operative societies, house construction co-operative housing societies and premises co-operative societies where all the units are offices or commercial galas

************

# २. मतदार यादी

## २.१ मतदार यादी तयार करणेकरीता निवडणुक नियमामधील तरतुदी -

### नियम ६. व्यक्ती सभासद असणाऱ्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी

(१) ज्या वर्षी प्रत्येक संस्थेची सार्वत्रिक निवडणूक होणार असेल त्या वर्षातील मतदारांची तात्पुरती यादी अशा संस्थांकडून तयार करण्यात येईल. ज्या सभासदाने त्याचे नांव नोंदविल्यापासून (विदयमान समितीचा कार्यकाल संपण्याच्या दिनांकापर्यत) सभासद म्हणून कमीत कमी दोन वर्षे पूर्ण केली असतील व जो क्रियाशील सभासद असेल अशा सभासदाचा, अधिनियमाच्या कलम २६ व २७ अन्वये निर्धारित केल्याप्रमाणे तात्पुरत्या मतदार यादीत समावेश करण्यात येईल. उपविधीमध्ये वेगवेगळया मतदारसंघांची तरतूद करण्यात आली असेल तर, मतदारांची नांवे, उपविधी मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, आवश्यक असेल तर मतदारसंघ निहाय क्रमाने लावण्यात येतील.

स्पष्टीकरण- या उपनियमासाठी " विदयमान समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक म्हणजे विदयमान समिती ज्या दिनांकास, निवडणुकीच्या दिनांकापासुन ५ वर्ष पुर्ण करेल असा दिनांक.

(२) अधिनियमाच्या कलम २७ च्या पोट कलम (३-अ) मध्ये तरतुद केलेल्या दोन वर्षाचा कालावधीची गणना, सभासद म्हणून नावनोंदणी केल्याच्या दिनांकापासून ते ज्या दिनांकास संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक असेल त्या दिनांकापर्यंत करावयाची आहे.

परंतु, असा दोन वर्षाचा कालावधी अधिनियमाच्या कलम २७ च्या पोट कलम (३-अ) च्या परंतुकात नमूद केल्याप्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी गाळे संकुल संस्था यांचेकरीता गणना केली जाणार नाही:

परंतू आणखी असे की, अकल्पीत परिस्थिती किंवा इतर कोणत्याही कारणामुळे समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा संस्थांच्या बाबतीत, तात्पूरती मतदार यादी ही, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या दिनांकाच्या आधारे तयार करण्यात येईल;

परंतू, तसेच, कलम ७३ च्या पोट कलम (१अ) च्या खंड (अ) अन्वये, हंगामी समितीची मुदत संपल्यानंतर संस्थेच्या होणा-या पहिल्या निवडणूकीच्या वेळी, संस्थेच्या तात्पुरत्या मतदार यादीमध्ये निवडणुक नियत दिनांकास असलेल्या सर्व सभासदांचा समावेश होईल.

परंतू, तसेच, ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी अथवा कलम ७८-अ अन्वये प्रशासक नेमलेला असेल अशा संस्थेच्या बाबतीत, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार संस्थेच्या मतदारांची तात्पुरती मतदार यादी तयार करण्यात येईल.

(३) समितीची मुदत संपण्यापूर्वीच्या दिनांकापूर्वी १२० दिवस अगोदर तात्पूरत्या मतदार यादीच्या चार अधिप्रमाणित प्रती छापील तसेच प्राधान्याने डीजीटल नमुन्यात, संस्थेच्या समितीकडून, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पाठविण्यात येतील. अशा यादीच्या प्रती, संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यादया मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत, संस्थेच्या सभासदांकडून दावे व हरकती मागवील.

(४) कोणतीही समिती मतदारांच्या तात्पुरत्या यादीच्या प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी पाठविण्यास कसूर करील तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा संबंधित तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, मतदारांची तात्पुरती यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे समितीकडून किंवा इतर जबाबदार व्यक्तींकडून वसुल करण्यात येईल.

(५) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, लगतच्या पूर्वावर्ती पोटनियमान्वये कार्यवाही करीत असेल तर, तो संस्थेच्या सदस्यांकडून, दावे व हरकती मागविण्यासाठी, संस्थेकडून अशी यादी मिळाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत, त्याच्या सुचनाफलकावर व त्या संस्थेच्या सुचनाफलकावर लावावयाच्या तात्पुरत्या मतदार यादीच्या प्रतींची व्यवस्था करील.

परंतू, अशी यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या व सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येईल.

**नियम ७ व्यक्ती सभासद असणाऱ्या सहकारी संस्थांच्या मतदारांच्या तात्पुरत्या** मतदार **यादीत समाविष्ठ करावयाचा तपशील**

वैयक्तिक भागधारकांच्या बाबतीत, तात्पुरत्या मतदार यादीमध्ये, मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर तपशिलांबरोबर, मतदार म्हणून नोंदणी करण्यास हक्कदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या ‘ नमुना ई-३’ मधील सभासदांच्या नोंदवहीत नोंद केल्याप्रमाणे त्याचे आडनांव, नांव वडीलांचे किंवा पतीचे नांव, (वर्णक्रमानुसार), कोणतेही असल्यास, व पत्ता यांचा समावेश असेल.

**नियम ८ व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीसंबंधातील** व अंतीम मतदार यादी संबधातील **दावे व हरकती**

(१) दावे किंवा हरकती मागविण्यासाठी मतदारांची कोणतीही तात्पुरती यादी प्रसिध्द करण्यात येईल तेव्हा, संस्थेच्या कोणत्याही सदस्यास, यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्या संबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

(२) प्रत्येक दावा किंवा हरकत लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल आणि ज्या कारणावरुन दावा करण्यात किंवा, यथास्थित, हरकत घेण्यात आलेली असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील.

(३) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी याबाबतीत आवश्यक वाटत असेल अशी चौकशी केल्यानंतर, किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार, प्रत्येक दावा व हरकत विचारात घेईल. आणि दावे किंवा हरकती प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांका पासून १० दिवसांच्या आत संबंधित व्यक्तींना त्यावरील त्याचा निर्णय लेखी देईल. त्यानंतर हरकती व दावे प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. सर्व दावे व हरकतींवर निर्णय दिल्यानंतर, निवडणुक अधिका-याकडुन अंतीम रुप दिलेली यादी ही अंतिम मतदार यादी असेल.

(४) मतदारांच्या अंतिम यादीच्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या सूचनाफलकावर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान १० दिवस आणि कोणतीही हरकत व दावे निकालात काढल्यापासून १५ दिवसाहून उशिरा नसेल इतक्या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येतील.

जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याला, अंतिम मतदार यादी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर , असल्यास त्यावर , प्रसिध्द करण्याची व्यवस्था करता येईल.

**नियम ९. व्यक्ती सभासद अथवा व्यक्ती सभासद व संस्था सभासद असलेल्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी**

**१.** ज्या वर्षी प्रत्येक संस्थांच्या निवडणूका घ्यावयाच्या असतील त्या वर्षासाठी मतदारांची तात्पुरती यादी अशा प्रत्येक संस्थेकडून तयार करण्यात येईल. ज्या सभासदांनी त्यांचे नाव नोंदविल्याच्या दिनांकापासून विदयमान व्यवस्थापन समितीच्या कार्यकाल समाप्तीच्या दिनांकास सभासद म्हणून किमान दोन वर्षे पूर्ण केली असतील अशा क्रियाशील सभासदांचा आणि क्रियाशील सभासद असणा-या संस्थेच्या बाबतीत, ज्या संस्थेच्या विदयमान व्यवस्थापन समितीचा कालावधी संपण्याच्या दिनांकापर्यंत नोंदणी केल्याच्या दिनांकापासून किमान ३ वर्षे पूर्ण झालेल्या संस्थाचा, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २७ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, तात्पुरत्या मतदार यादीत समावेश करण्यात येईल. उपविधीमध्ये वेगवेगळया मतदारसंघाची तरतूद करण्यात आली असेल तर, मतदारांची नांवे, उपविधीमध्ये घालून दिल्याप्रमाणे, मतदारसंघ निहाय क्रमाने लावण्यात येतील.

स्पष्टीकरण- या उपनियमासाठी " विदयमान समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक म्हणजे विदयमान समिती ज्या दिनांकास, निवडणुकीच्या दिनांकापासुन ५ वर्ष पुर्ण करेल अशा दिनांक.

२. अधिनियमाच्या कलम २७ च्या पोटकलम (३) मध्ये तरतुद केलेल्या तीन वर्षांच्या कालावधीची गणना, सभासद म्हणून नावनोंदणी केलेच्या दिनांकापासून ते ज्या दिनांकास संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक असेल त्या दिनांकापर्यंत करण्यात येईल.

परंतू, अकल्पीत परिस्थीती किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सहकारी संस्थांच्या समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा संस्थांच्या बाबतीत, तात्पुरती मतदार यादी ही, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाने निश्‍चित केलेल्या दिनांकाच्या आधारे तयार करण्यात येईल.

परंतू, आणखी असे की, कलम ७३(१-अ) (अ) हंगामी समितीची मुदत संपल्यानंतर संस्थेच्या होणा-या पहिल्या निवडणूकीच्या वेळी, संस्थेच्या तात्पुरत्या मतदार यादीमध्ये निवडणुक नियत दिनांकास असलेल्या सर्व सभासदांचा समावेश असेल.

परंतू , तसेच, ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी किंवा कलम ७८-अ अन्वये प्रशासक नेमलेला असेल अशा संस्थेच्या बाबतीत, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार संस्थेच्या मतदारांची तात्पुरती मतदार यादी तयार करण्यात येईल.

३. समितीची मुदत संपण्यापूर्वीच्या दिनांकापूर्वी १२० दिवस अगोदर तात्पुरत्या मतदार यादीच्या मुद्रीत तसेच प्राधान्याने डीजीटल नमुन्यात चार अधिप्रमाणित प्रती, संस्थेच्या समितीकडुन जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पाठविण्यात येतील. अशा यादीच्या प्रती, संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यादया मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत, संस्थेच्या सभासदांकडून दावे व हरकती मागवील.

४. कोणतीही समिती मतदारांच्या तात्पुरत्या यादींच्या प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी पाठविण्यात कसूर करील तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, मतदारांची तात्पुरती यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे जबाबदार समितीकडून वसूल करण्यात येईल.

५. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, लगतच्या पूर्ववर्ती पोटनियमान्वये कार्यवाही करीत असेल तर, तो, संस्थेच्या सभासदांकडून दावे व हरकती मागविण्यासाठी, संस्थेकडून अशी यादी मिळाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत, त्यांच्या सुचना फलकावर आणि संस्थेच्या सुचनाफलकावर लावावयाच्या तात्पुरत्या मतदार यादीच्या प्रतींची व्यवस्था करील.

परंतू, अशी यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या व सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येईल.

**नियम १०. संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीत समाविष्ट करावयाचा तपशील**

(१) क्रियाशील व्यक्ती सभासदांच्या बाबतीत, तात्पुरत्या मतदार यादीमध्ये, मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर तपशिलाबरोबर,मतदार म्हणून नोंदणी करण्यास हक्कदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या नमुना ई-३ मधील सभासदांच्या नोंदवहीत नोंद केल्याप्रमाणे व्यक्तीचे आडनांव ,नांव, तिच्या वडिलांचे किंवा पतीचे नांव, वय, स्त्री-पुरुष (वर्णक्रमानुसार) कोणीही असल्यास व पत्ता यांचा समावेश असेल.

(२) जेथे एखादी संस्था किंवा भागीदारी संस्था ही सहकारी संस्थेची सभासद असेल तेथे, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी हा, समितीची मुदत समाप्तीच्या दिनांकपुर्वी १५० दिवस अगोदर प्रतिनिधीची नावे मागविण्याचा दिनांक प्रसिध्द करेल. अशी संस्था संस्थेच्या किंवा भागीदारी संस्थेच्या वतीने निवडणुकीत मत देण्यासाठी यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे नांव, जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याच्या किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याच्या कार्यालयात

पोहचणे शक्य व्हावे म्हणून समितीची मुदत संपण्याच्या दिनांकापूर्वी किमान १२० दिवस अगोदर त्या कार्यालयाकडे पाठवील. सभासद संस्थेने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी हा, सभासद संस्थेचा क्रियाशील सभासद असला पाहिजे.

(३) प्रतिनिधीचे नाव संस्थेला कळवितांना, संलग्न संस्था ही, जेथे प्रतिनिधीला अशा प्रकारे प्राधिकृत केले असेल तेथे, संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या किंवा तिच्या समितीच्या ठरावाची एक प्रत सोबत जोडील. संस्था ही, जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याने किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याने तात्पूरती मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापूर्वी तिला कळविण्यात येतील अशा सर्व प्रतिनिधींची नावे मतदार यादीत समाविष्ट करील. यादीमध्ये, सलग्न संस्थांची नावे, त्यांचे नोंदणी क्रमांक व पत्ते आणि प्रतिनिधीची नावे कोणतीही असल्यास यांचा नावाचा समावेश असेल.

(४) ज्या संस्थेने तिच्या प्रतिनिधीचे नाव कळविलेले असेल त्या संस्थेला, केवळ प्रतिनिधीचा मृत्यू झाला असेल किंवा जेथे नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी पाच दिवसाच्या आत सभासद संस्थेची समिती नव्याने निवडून आली असेल त्याबाबतीत, ठरावाव्दारे, पाठविलेल्या प्रतिनिधीचे नांव बदलण्याची परवानगी असेल.

**नियम ११. संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीसंबंधातील व अंतिम मतदार यादी संबंधातील दावे व हरकती**

(१) दावे किंवा हरकती मागविण्यासाठी मतदारांची कोणतीही तात्पुरती यादी प्रसिध्द करण्यात येईल तेव्हा, मतदार असणाऱ्या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सदस्यास किंवा अशा संस्थेच्या वतीने मत देण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्रतिनिधीस, यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या लेखी निदर्शनास आणून देता येईल.

(२) दावा करणा-या किंवा हरकत घेणा-या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सभासदाला, स्वतंत्र विनंती अर्ज करुन तसे करता येईल, असा विनंतीअर्ज हा दावे किंवा हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केलेल्या शेवटच्या दिनांकापूर्वी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत सादर करण्यात येईल. असे दावे किंवा हरकती लेखी स्वरुपात दाखल करण्यात येतील आणि ज्या कारणावरुन दावा करण्यात किंवा, यथास्थिती, हरकत घेण्यात आलेली असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील.

(३) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, याबाबतीत आवश्यक वाटत असेल अशी चौकशी केल्यानंतर, प्रत्येक दावा व हरकत यावर विचार करील आणि दावे किंवा हरकती प्राप्त होण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकापासून १० दिवसांच्या आत संबंधित व्यक्तिंना त्यावरील त्याचा निर्णय लेखी देईल, आणि दावे व हरकती प्राप्त होण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली पाहिजे. सर्व दावे व हरकतींवर निर्णय दिल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी-याने अंतिम रुप दिलेली यादी ही, मतदारांची अंतिम मतदार यादी असेल.

(४) मतदारांच्या अंतिम यादीच्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान १० दिवस अगोदर आणि कोणतीही हरकत व दावे निकालात काढल्यापासून पंधरा दिवसांहून उशिरा नसेल इतक्या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येतील

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याला, अंतिम यादी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोणतेही असल्यास प्रसिध्द करण्याची व्यवस्था करता येईल.

(५) नियम १०, पोटनियम ४ अन्वये अंतिम मतदार यादीत बदल करणे आवश्यक असेल तर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी त्याला आवश्यक वाटेल ती चौकशी करुन, अंतिम यादीत आवश्यक ते बदल करील.

- **प्रारुप मतदार यादी कार्यक्रम "क" वर्ग संस्था**

संस्थेने प्रारुप मतदार यादी मुदत संपण्यापूर्वी १८० अगोदर मुदत संपण्याची पूर्वसूचना देऊन क्रियाशील सभासदांची यादी ४ प्रतीमध्ये तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना देणे.

- तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्रारुप मतदार यादी प्राप्त झाल्याच्या ७ दिवसांत मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करणे.

- **प्रारुप मतदार यादी कार्यक्रम "ड" वर्ग संस्था**

- संस्थेने प्रारुप मतदार यादी मुदत संपण्यापूर्वी **किमान** ६० अगोदर तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना देणे
- तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्रारुप मतदार यादी प्राप्त झाल्याच्या ७ दिवसांत मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करणे.

## २.२ मतदार यादी तयार करण्याकरीता स्त्रोत -

**निवडणूकीस पात्र असलेल्या ज्या सहकारी संस्थाच्या बाबतीत मतदार यादीच्या अनुषंगाने दप्तर उपलब्ध होऊ शकत नाही अशा संस्थाच्या बाबत खालील स्त्रोताचा वापर करुन मतदार यादी कच्च्या स्वरुपात तयार करावयाची आहे. असे करीत असतानां देखील सदरच्या प्रक्रियेस व्यापक प्रसिध्दी दयावयाची आहे जेणे करुन संस्थेच्या सभासदास मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी संधी मिळेल.**

- सभासद नोंदवही "आय"- नमुना.
- सभासद यादी "जे" - नमुना.
- सभासदांना वाटप केलेले भाग दाखले.
- लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेली सभासद यादी.
- नोंदणी धारीकेसोबत ("अ" धारीका) जोडलेली सभासद यादी.

## २.३ प्रारुप व अंतिम मतदार यादी प्रसिध्दी

**ज्या त्या वर्गातील सहकारी संस्थाचे मतदार यादी तयार करीत असतांना नियम ६ ते १० व नियम ७५ आणि ७६ तरतूदींचे तंतोनत पालन करावयाचे आहे.**

- "अ" व "ब" वर्गातील सहकारी संस्थेच्या निवडणूकी करीता प्रारुप व अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचे अधिकार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्राप्त आहेत.
- "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थेच्या निवडणूकी करीता प्रारुप व अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचे अधिकार तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्राप्त आहेत.

## २.४ अर्हता दिनांक

- **संचालक मंडळाची मुदत संपण्यापुर्वी काही अपरिहार्य कारणास्तव संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरू होऊ न शकल्यास अथवा संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती झालेली असल्यास अशा संस्थेच्या निवडणूकीकरीता प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अर्हता दिनांकावर मतदार यादी तयार करणे बंधनकारक आहे.**
- **निवडणूक नियम ६(२) चे ३ ऱ्या परंतुकानुसार नोंदणीनंतरच्या पहिल्या सार्वजनिक निवडणूकीकरीता सर्व सभासद पात्र राहतील,**
- **दोन वर्षाच्या सभासदत्वाची अट सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहकारी व्यापारी संकुल संस्थांना लागु नसल्यामुळे अशा संस्थांच्या निवडणूकीकरीता अर्हता दिनांक देण्याची आवश्यकता नाही.**

## २.५ मतदार यादीचा कार्यक्रम

- अ. प्रवर्ग "अ" व "ब"

१. संस्थेने समितीची मुदत संपण्यापुर्वीच्या दिनांकापुर्वी १२० दिवस अगोदर तात्पुरत्या मतदार यादीच्या ४ अधिप्रमाणित प्रती जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडे सादर कराव्यात. तसेच अशा यादीच्या प्रती संस्थेच्या सुचना फलकावर लावण्यात येतील. सदर यादया मिळाल्यापासुन १० दिवसाचे आत, जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करील

| अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी करणे. | प्रारुप मतदार यादी मिळल्यापासुन १० दिवसाचे आत |
| २. | प्रारुप मतदार यादीवर हरकती / आक्षेप मागविणे. | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यापासुन १० दिवसाचे आत |
| ३. | प्रारुप मतदार यादीवर हरकती / आक्षेप वर निर्णय | प्रारुप मतदार यादीवरील दावे, हरकती / आक्षेप प्राप्त होण्यासाठी विहीत केलेल्या अंतीम दिनांकापासुन १० दिवसाचे आत |
| ४. | अंतीम मतदार यादी प्रसिध्द करणे. | दावे, आक्षेप व हरकतीवरील निर्णय दिल्यानंतर ५ दिवसाचे आत |

"अ" व "ब" वर्गातील सहकारी संस्था बाबतीत संस्था व जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना जा क्र. १५७४, दि. २२/५/२०२० अन्वये प्राधिकरणाने निर्गमीत केलेल्या आहे.

ब. प्रवर्ग "क"

- १. संस्थेने समितीची मुदत संपण्यापुर्वीच्या दिनांकापुर्वी १८० दिवस अगोदर तात्पुरत्या मतदार यादीच्या ४ अधिप्रमाणित प्रती तालुका/ प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडे सादर कराव्यात तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी प्रारुप मतदार यादी प्राप्त झाल्याच्या ७ दिवसाचे आत खालील कार्यक्रम प्रसिध्द करील
- २. प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम

| अ क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी | कार्यक्रम जाहीर करण्याच्या वेळेस घोषीत करावयाचा दिनांक |
| २. | प्रारुप मतदार यादीवर हरकती / आक्षेप मागविणे. | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यापासुन ७ दिवसाचे आत |
| ३. | प्रारुप मतदार यादीवर हरकती / आक्षेप वर निर्णय | प्रारुप मतदार यादीवरील हरकती / आक्षेप करण्याच्या शेवटच्या दिनांकापासुन ७ दिवसाचे आत |
| ४. | अंतीम मतदार यादी जाहीर करणे | आक्षेप व हरकतीवरील निर्णयाचे तारखेस |

"क" वर्गाच्या सहकारी संस्था बाबत प्राधिकरणाने जा क्र. १५७१, दि. २०/५/२०२० अन्वये मार्गदर्शनपर सुचना जारी केलेली आहे.

- **प्रवर्ग “ड”**
- **१. संस्थेने तिची प्रारुप मतदार यादी तयार करावी आणि त्याची एक प्रत तालुका/ प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-यास समितीचा कार्यकाल संपण्यापुर्वी कमीत कमी ६० दिवस अगोदर सादर करावी.**
- **२. प्रारुप मतदार यादी प्राप्त झाल्याच्या ७ दिवसाचे आत तालुका /प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-याने अंतीम मतदारयादीचा कार्यक्रम प्रसिध्द करावा.**

| अ क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी | कार्यक्रम प्रसिध्द करण्याच्या वेळेस दिनांक घोषीत करावा. |
| २. | प्रारुप मतदार यादीवर हरकती / आक्षेप मागविणे. | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यापासुन ७ दिवसाचे आत |
| ३. | प्रारुप मतदार यादीवर हरकती / आक्षेप वर निर्णय | प्रारुप मतदार यादीवरील हरकती / आक्षेप करण्याच्या शेवटच्या दिनांकापासुन ७ दिवसाचे आत |
| ४. | अंतीम मतदार यादी प्रसिध्द करणे. | आक्षेप व हरकतीवरील निर्णयाच्या पुढचा दिनांक |

**याबाबत प्राधिकरणाने सविस्तर मार्गदर्शनपर आदेश जा क्र. १६७५, दि. १५/६/२०२० अन्वये निर्गमीत केलेला आहे.**

*********************

# ३. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या

- निवडणूक कार्यक्रम मुदतीत प्रसिध्द होण्याच्या दृष्टीकोनातुन निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियुक्तीनंतर निवडणूक कार्यक्रम जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत मान्यतेस्तव प्राधिकरणास सादर करणे अनिवार्य.
- मान्यता प्राप्त निवडणूक कार्यक्रमास जाहिर प्रसिध्दी देणे अनिवार्य.
- पुरेशी मतदान केंद्रे निश्चित करणे अनिवार्य.
- नामनिर्देशन पत्र मंजूर/नामंजूरीच्या नोंदी नामनिर्देशन पत्रावर नोंदवून स्वाक्षरी करणे बंधनकारक.
- नामनिर्देशन नामंजूरीची कारणमीमांसा नामनिर्देशीत व्यक्तीस कळविणे बंधनकारक.
- मतदान व मतमोजणीची प्रक्रिया पारदर्शकपणे पुर्ण करणे अनिवार्य.
- निवडणूक निकाल घोषित करुन, निवडणूकीचा निकाल ३ दिवसांच्या आत जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयात सादर करणे अनिवार्य.
- निवडणूक खर्चाचा प्रस्ताव साक्षांकीत देयकांसह जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयात मुदतीत सादर करणे बंधनकारक.
- उमेदवारांची अनामत रक्कम संबंधीतांस परत करणे अनिवार्य.
- उमेदवारांनी सादर केलेला खर्चाचा तपशील जिल्हा/ प्रभाग/ तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयात सादर करणे बंधनकारक.
- जप्त उमेदवार अनामत रक्कम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक.

## ३.१ निवडणूक प्रक्रियेसाठी अधिकारी/कर्मचारी नियुक्ती (नियम १२ ते १९ )

- **नियम १२** १) प्राधिकरण निवडणुक निर्णय अधिकारी, सहायक निवडणुक निर्णय अधिकारी (एक/ अधिक व्यक्ती) , प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करील.
- २) सहायक निवडणुक निर्णय अधिकारी,नामनिर्देशन पत्राच्या छाननीशी संबंधित असतील अशी, निवडणूक निर्णय अधिका-यांची कोणतीही कार्ये, तो करण्यास निवडणूक निर्णय अधिका-यास अपरिहार्यपणे प्रतिबंध केला नसेल तर, पार पाडणार नाही.
- **नियम १३** प्राधिकरण निरीक्षकाची नेमणूक करेल. निरीक्षक यांनी करावायाचे कामकाजाबाबत दि. १७/३/२०२० पत्र जा. क्र. १४२५ अन्वये प्राधिकरणाने आदेश निर्गमीत केलेले आहेत.
- **नियम १४** निवडणुक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक नियम, संस्था उपविधी प्रमाणे कार्यक्षमपणे निवडणूक घेण्यासाठी सर्व कृती आणि गोष्टी करणे हे त्यांचे सर्वसाधारण कर्तव्ये असेल.
- **नियम १५** निवडणुक निर्णय अधिकारी मतदार संघामध्ये पुरेशा प्रमाणात मतदान केंद्राची तरतूद करील व ती मतदान क्षेत्र निहाय यादी संस्थेच्या सुचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा अन्य रितीने

  अनुक्रमे प्रसिध्द करेल
- **नियम १६** १) निवडणुक निर्णय अधिकारी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिका-यांची नेमणूक करेल संस्थेने निवडणूकीसाठी कामावर लावलेली असेल किंवा त्या निवडणूकीत किंवा उमेदवारांसाठी काम करणारी व्यक्तीस नेमता येणार नाही. परंतु मतदान अधिकारी गैरहजर असल्यास वरीलप्रमाणे मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या व्यक्तींमधून मतदान अधिकारी नेमेल व तसे निवडणुक निर्णय अधिकारी यांना कळवेल.

  २) मतदान केंद्राध्यक्ष याने निर्देश दिला असेल तर मतदान अधिकारी मतदान केंद्राचे काम पार पाडेल.

  ३) मतदान केंद्राध्यक्ष आजारपणामुळे/अपरिहार्य कारणामुळे गैरहजर असल्यास मतदान केंद्राध्यक्षाकडून यापूर्वी ज्यास प्राधिकृत करण्यात आली असेल अशा मतदान अधिका-याकडून मतदान केंद्राध्यक्षाची कार्ये पार पाडता येतील.

- **नियम १७** १) कायदा व सुव्यवस्था राखणे, मतदान योग्य प्रकारे होत आहे हे पाहणे मतदान केंद्राध्यक्ष यांचे कर्तव्य असेल.

  २) मतदान केंद्राध्यक्ष यांना कामे पार पाडण्याकरिता मदत करणे हे मतदान केंद्रावरील मतदान अधिकारी यांचे कर्तव्य असेल.

  ३) निवडणुक निर्णय अधिकारी , सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि या नियमांच्या कोणत्याही प्रयोजनासाठी नेमण्यात आलेल्या इतर व्यक्ती, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा याबाबतीत ते प्राधिकृत करेल असा अधिकारी यांच्या सर्वसाधारण मार्गदर्शन, देखरेख आणि नियंत्रण यानुसार काम करतील.

## ओळख पत्र

**जिसनिअ/तासनिअ/ निनिअ यांचेकडून फोटो साक्षांकीत**

**मतदान अधिकारी यांचे नाव** :- ----------------------------------------
**पदनाम (कार्यालय )** :- ----------------------------------------
**वय वर्ष** :- ----------------------------------------
**संस्थेचे नाव व पत्ता** :- ----------------------------------------
**निवडणूक दिनांक** :- / /
**ओळख पत्र दिल्याचा दिनांक** :- / /

## ओळख पत्र

**जिसनिअ/तासनिअ/ निनिअ यांचेकडून फोटो साक्षांकीत**

**केंद्राध्यक्ष यांचे नाव** :- ----------------------------------------
**पदनाम (कार्यालय )** :- ----------------------------------------
**वय वर्ष** :- ----------------------------------------
**संस्थेचे नाव व पत्ता** :- ----------------------------------------
**निवडणूक दिनांक** :- / /
**ओळख पत्र दिल्याचा दिनांक** :- / /

## ३.२ निवडणूक प्रक्रियेसाठी मदतनीस नियुक्ती

**"अ" व "ब" प्रवर्ग संस्थाकरीता निवडणुक निर्णय अधिकारी यांचे आवश्यकेतेप्रमाणे मदतनीस नेमता येतील.**

**प्राधिकरणाच्या परिपत्रकाच्या अधिन राहुन प्रत्यक्ष मतदानासाठी मतदान पथकातील अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती- निवडणुक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणाकडील परिपत्रकाप्रमाणे करावी.**

(i) **केंद्राध्यक्ष**

(ii) **मतदान अधिकारी**

(iii) **मदतनीस / शिपाई**

| | |
|---|---|
| **४ ते ५ मतदार संघाच्या मतपत्रिकेसाठी** | **८ कर्मचारी** |
| **२ ते ३ मतदार संघाच्या मतपत्रिकेसाठी** | **६ कर्मचारी** |
| **०१ मतदार संघाच्या मतपत्रिकेसाठी** | **५ कर्मचारी** |

## ३.३ मतमोजणी अधिकारी /कर्मचारी नियुक्ती

**निवडणुक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणाकडील परीपत्रकाप्रमाणे -**

| मतपत्रिका संख्या | टेबल | कर्मचारी संख्या | राखीव कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ ते ४०० | १ | ४ | ०१ |
| ४०१ ते ८०० | २ | ८ | ०२ |
| ८०१ ते १२०० | ३ | १२ | ०३ |

## ३.४ पोलीस बंदोबस्त मागणी

**निवडणुक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणाकडील जाक रासनिप्रा /अभि. धा क्र ३८/ निवडणुक निधी / पों ब खर्च ८२५७/१७ दि. ७/१२/१७ प्रमाणे कार्यवाही करावी.**

## ३.५ निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीस प्राधिकरणाकडून मंजूरी

१. "अ", "ब", "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता निवडणूक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त.

२. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्याला मदत करण्यासाठी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ओळखल्या जाणा-या एका किंवा अधिक व्यक्तींची नेमणूक करेल.

३. प्रत्येक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निर्वाचन अधिका-याच्या नियंत्रणाधीन राहून आणि सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण नियंत्रणाधिन निवडणूक निर्णय अधिका-याची सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडण्यास सक्षम असेल.

४. परंतु, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशन पत्राच्या छाननीशी संबंधित असतील अशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची कोणतीही कार्ये, ती करण्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास अपरिहार्यपणे प्रतिबंध केला नसेल तर, पार पाडणार नाही.

५. परंतु, आणखी असे की, राज्य सहकारी निवडणूक निर्णय प्राधिकरणाला, आवश्यकता भासल्यास, निवडणूक निर्णय अधिका-याला बदलता येईल.

६. निनिअ प्रस्ताव सादर करताना प्राधिकरणाकडील जा क्र. ५८७६ दि. १९/७/१९ चे परीपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

७. संस्था प्रकार निहाय नियुक्त करावायाचे निनिअ / प्रा. अधि. यांचे बाबत जा क्र. १५५२ दि. १५/५/२०२० प्राधिकरणाने आदेश निर्गमीत केलेले आहेत.

***********

# ४. निवडणूक कार्यक्रम तयार करणे, मंजूरी व प्रसिध्दी

## ४.१ "अ" व "ब" प्रवर्ग सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे.

निवडणूक निर्णय अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने, निवडणुकीच्या विविध टप्प्यांचा कार्यक्रम आखून संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १० ते २० दिवसांच्या आत जाहीर करेल. हा कार्यक्रम पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १. | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | (ज्या दिनांकास कार्यक्रम प्रसिद्ध करावायाचा आहे तो दिनांक टाकावा.) |
| २. | नामनिर्देशन दाखल करण्याचा शेवटचा दिनांक | निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिनांका पासून कार्यालयीन कामकाजाचे ५ दिवस |
| ३. | *मिळालेल्या* नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत जसजशी मिळतील त्याप्रमाणे |
| ४. | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकानंतरच्या दुसऱ्या दिवशी |
| ५. | छाननीनंतरच वैध नामनिर्देशन पत्रांच्या यादीचा प्रसिद्धीचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतरच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी |
| ६. | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक | छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत |
| ७. | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या अंतिम यादीची प्रसिद्धी व चिन्हांचे वाटप याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या निकट अनुवर्ती दिवस |
| ८. | आवश्यक असल्यास, ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदान घेण्यात येईल ती दिनांक, ती वेळ व ते ठिकाण/ठिकाणे | निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या अंतिम यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ०७ दिवस अगोदरचा नाही व १५ दिवसांनंतरचा नाही असा दिनांक (निवडणूक निर्णय अधिकारी वेळ व ठिकाण निश्चित करतील.) |
| ९. | मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण | ज्या दिनांकास मतदान घेण्यात येईल त्या दिनांकापासून तिसऱ्या दिवसाच्या आत (निवडणूक निर्णय अधिकारी वेळ व ठिकाण निश्चित करतील.) |
| १०. | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक | मतमोजणीनंतर लगेच. |

**स्पष्टीकरण :-**

**(अ)** वरील प्रकरणांत विनिर्दिष्ट केलेल्या मोजावयाच्या ताराखांमधील तारीख, सार्वजनिक सुट्टीचा दिवस असेल तर, तिचा निकट अनुवर्ती कामाचा दिवस, त्या - त्या कारणांसाठी निश्चित करण्यात येईल.

**(ब)** मतदारांच्या संख्येनुसार मतदान केंद्राची संख्या व त्यांची ठिकाणे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करुन, निश्चित करण्यात येतील. संपूर्ण जिल्हयात किंवा त्या जिल्हयाच्या शहरात अथवा गावात मतदान केंद्रे विखुरली असतील त्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी, त्याच्या कार्यालयात संबंधित निबंधकाच्या अथवा संस्थेच्या कार्यालयात किंवा त्यास योग्य वाटेल अशा सुरक्षित ठिकाणी सर्व मतपेट्या किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मिळण्याची व्यवस्था करील.

## ४.२ "क" प्रवर्ग सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे.

१. प्राधिकरणाने नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी लवकरात लवकर निवडणूक कार्यक्रम तात्काळ तयार करून तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याकडून मंजुरी घेईल.

२. निवडणूक कार्यक्रम खाली नमूद केलेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात येईल.

| अ.क्र. | बाब | कालावधी | दिवस |
|---|---|---|---|
| | **निवडणुक कार्यक्रम प्रसिध्द दिनांक** | (ज्या दिनांकास कार्यक्रम प्रसिद्ध करावयाचा आहे तो दिनांक टाकावा.) | |
| १. | **नामनिर्देशन** करण्याचा शेवटचा दिनांक | अंतिम मतदार यादीच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासुन कार्यालयीन कामकाजाचे **५ दिवस** | ५ |
| २. | **नामनिर्देशनपत्राची यादी** प्रसिध्दी | **नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिनांकास** आणि नामनिर्देशनाची वेळ समाप्त झाल्यानंतर | ५ |
| ३. | **छाननीचा** दिनांक | नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या **पुढील दिनांकास** | ६ |
| ४. | **वैध नामनिर्देशनपत्राची** यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | नामनिर्देशपत्राची **छाननी पूर्ण झाल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी** | ७ |
| ५. | **उमेदवारी मागे** घेण्याचा दिनांक | वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून **१५ दिवस** | २१ |
| ६. | निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची **अंतिम यादी** प्रसिध्दी करण्याचा व **निशाणी नेमून** देण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्याकरिता निश्चित केलेल्या अंतिम दिनांकाच्या लगतच्या **पुढील दिनांकास** (निवडणूक निर्णय अधिका-याने निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी) | २२ |
| ७. | **मतदान** घ्यावयाचा दिनांक, वेळ व ठिकाण | उमेदवारी मागे घ्यावयाच्या **दिनांकानंतर किमान ५ दिवस पूर्ण झाल्यानंतर** | २६ |
| ८. | **मतमोजणीचा** दिनांक, वेळ व ठिकाण | **मतदानानंतर लगेचच** | २६ |
| ९. | निकाल जाहीर करण्याचा दिनांक | मतमोजणी समाप्त झाल्यानंतर लगेचच | २६ |

**(३)** नियम २० ते ७४ च्या तरतुदी, त्या जशा आहे त्याप्रमाणे, अशा संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी लागू होतील.

**(४)** (अ) निवडणूक निर्णय अधिका-याने नामनिर्देशन पत्र फेटाळले असेल तर, उमेदवारास नामनिर्देशन पत्र फेटाळल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या कालावधीत निबंधकाकडे अपील दाखल करता येईल. निबंधक असे अपील, ते अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत निकाली काढेल.

(ब) निवडणूक निर्णय अधिकारी निकाल जाहीर करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत संबंधीत निकाल तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करील.

(क) या प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणुका या नियमात विहित केल्याप्रमाणे वेळ आणि दिनांक वगळता या नियमांत घालून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार घेण्यात येतील.

## ४.३ "ड" प्रवर्ग सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे.

१. या भागातील तरतुदी नियम ४(चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ' ड ' प्रकारच्या संस्थांना लागू होतील.

२. या प्रकारच्या संस्थांच्या निवडणूका या प्रयोजनार्थ बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात येईल. अशी सभा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली होईल. अशा सभेची नोटीस निवडणुक निर्णय अधिकारी किंवा असा अधिकारी लागु असेल त्याप्रमाणे अशा सभेसाठी निश्चित दिनांकाच्या किमान पंधरा दिवस आधी देईलः

३. निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती, सभेस उपस्थित राहील आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे ज्या प्रयोजनार्थ अशी सभा झाली त्या सभेनंतर दोन दिवसांच्या आत आपला अहवाल सादर

## ४.४ "अ" व "ब" प्रवर्ग सहकारी संस्था निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी

(१) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी नियम १८ अन्वये नमुना इ-४ अन्वये काढलेल्या आदेशाची प्रत, एकतर संस्थेस जातीने देईल किंवा संस्थेच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर, नोंदणीकृत टपालाने किंवा विशेष संदेशाव्दारे पाठवील आणि संस्थेच्या सूचना फलकावर किंवा संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निदेश देईल. त्याशिवाय उक्त निवडणूक कार्यक्रम, *राज्य* सहकारी निवडणूक प्राधिकरणातर्फे त्यांच्या सूचना फलकावर किंवा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष मतदानाची वेळ निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेली असेल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी निवडणुकीच्या वेगवेगळया टप्प्यांकरिता जेथे जेथे *आवश्यक* असेल तेथे तेथे वेळ, तारीख आणि ठिकाण निश्चित करील व त्याने जाहिर करावयाच्या निवडणूक कार्यक्रमांमध्ये नमूद करण्यात येईल.

(४) निवडणूक निर्णय अधिकारी , राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा यथास्थिती संस्थेकरिता किंवा संस्थांच्या वर्गाकरिता निवडणुकीचा कार्यक्रम किमान एका स्थानिक वृत्तपत्रातदेखील प्रसिद्ध करील.

(५) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय, अन्यथा या नियमान्वये निश्चित केलेली तारीख, मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत बदलता येणार नाही.

## ४.५ "क" व "ड" प्रवर्ग सहकारी संस्था निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी

(१) 'क' आणि 'ड' वर्गीकरण प्रकारच्या संस्थांबाबत निवडणुकीचा कार्यक्रम त्या संस्थेच्या किंवा यथास्थिती त्या त्या कार्यक्षेत्रात स्थित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. प्राधिकरणाने 'अ' व 'ब' वर्ग संस्थाबाबत जा क्र. १५७४ दि. २२/५/२०२० व 'क' वर्ग संस्थाबाबत जा क्र. १५७१ दि. २०/५/२०२० अन्वये मार्ग दर्शक सुचना निर्गमीत केलेले आहेत.

********

# ५. निवडणूक प्रक्रीया सुरु होणेपुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही.

**१.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश प्राप्त करुन घ्यावे. सदर आदेशात नमूद केल्याप्रमाणे व निवडणूक नियमातील तरतूदी अन्वये कामकाज करावे.

**२.** सदर संस्थेची अंतिम मतदार यादी प्राप्त करुन घ्यावी. सदर यादी संबंधितांनी सांक्षाकित केली असल्याची आणि अधिकृत असल्याची निश्चीत खात्री करावी.

**३.** सदर मतदार यादीचे वाचन करुन मतदार यादीतील नावाची / मतदाराची संख्या पाहावी. सदर मतदार यादीची मुळ/ स्पष्ट प्रत स्व:ताजवळ ठेवावी.

**४.** प्राप्त मतदार यादीतील / निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आदेशीत केलेली सहकारी संस्था ही निवडणूक नियम ४ अन्वये कोणत्या वर्ग प्रकारात मोडते याची खात्री करावी.

**५.** संबंधीत संस्थेची प्राप्त अंतिम मतदार यादी संस्थेचे सचिव यांनी संस्थेच्या नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द केलेली असल्याची खात्री करावी अथवा पंचनामा केल्याची खात्री करावी अन्यथा सदर कार्यवाही पुर्ण करुन पुरावा स्व:ताच्या दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. तसेच संबंधीत ता.स.नि.अ. / जि.स.नि.अ. यांना सदर प्रत द्यावी.

**६.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी प्राप्त अंतिम मतदार यादीवर योग्य त्या न्याय प्राधिकरणाकडे अथवा मा. न्यायालयात अपील / दावे दाखल केलेले आहेत काय ? याची खात्री करावी.

**७.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांना आदेश प्राप्त झाल्यावर अंतिम मतदार यादी ही प्रसिध्द झाल्यापासून विहीत मुदतीत विविध टप्प्याचा निवडणूक कार्यक्रम ("अ","ब" व "क" वर्गीय संस्था) जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे वेळ, तारीख व ठिकाण निश्चित करुन महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १९ (३) प्रमाणे जाहिर करावयाच्या कार्यक्रमात नमुद करेल.

**८.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी प्रत्यक्ष मतदानाची वेळ निवडणूक कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १९ (२) प्रमाणे नमुद केलेली असावी.

**९.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १८,१९ व ७५ प्रमाणे निवडणूक कार्यक्रम तयार करुन ता.स.नि.अ. / जि.स.नि.अ. यांचेमार्फत प्राधिकरणाकडे मान्यतेस्तव सादर करावा. तसेच सदर निवडणूक कार्यक्रम सुरु होणेपूर्वी निवडणूक कार्यक्रमास मान्यता वेळेपुर्वी मिळणेसाठी पाठपुरावा करावा.

**१०.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी मंजूर निवडणूक कार्यक्रम हा नमूद केलेल्या दिनांकास संस्था कार्यालयात समक्ष उपस्थित राहून पंचासमक्ष प्रसिध्द करावा व त्याचा पुरावा आपल्या दप्तरी ठेवावा. (सदर संस्थेचे कार्यक्षेत्र, गाव असल्यास ग्रामपंचायत / तलाठी कार्यालय, तालुका असल्यास पंचायत समिती / तहसिल कार्यालय व जिल्हा कार्यक्षेत्र किंवा एकापेक्षा जास्त जिल्हे असल्यास जिल्हा परीषद / जिल्हाधिकारी कार्यालयात प्रसिध्द करावा. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १९ चे ही पालन करावे.

**११.** निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी हे सदर निवडणूक कार्यक्रम किमान एका स्थानिक वृत्तपत्रात देखील महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १९ (४) प्रमाणे प्रसिध्द करील.

**१२.** निवडणूक निर्णय अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी सहाय्यकांची नियूक्ती निवडणूक नियम १२ (१) प्रमाणे झाली असल्यास सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे निवडणूक नियम १२ (२) प्रमाणे कामकाज करतील. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियम १२(२) प्रमाणे कामकाज करीत असतांना अपरिहार्य कारणास्तव निवडणूक निर्णय अधिकारी हे गैरहजर राहणार असतील तर संबंधीत बाब जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मार्फत प्राधिकरणाचे निदर्शनास आणावे.

**१३.** निवडणूक प्रक्रियेचा पहिला टप्पा सुरु करणेसाठीचे सर्व कागदपत्रे, अंतिम मतदार यादी प्रत, निवडणूक कार्यक्रम प्रत, सर्व साहित्य, सर्व स्टेशनरी विहीत पध्दतीने खरेदी करावी. संस्थेच्या उपविधीची प्रत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

**१४.** सदर संस्थेचा निवडणूक कार्यक्रम मंजूर झाल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान केंद्र जाहिर करावे. सदर केंद्र आरक्षीत करण्यासाठी पाठपुरावा करावा. ( उदा. जि.प. शाळा मिळणेसाठी संबंधीताशी पत्र व्यवहार करावा. तसेच सदर केंद्र हे कंपनी, संस्थेचे वैयक्तिक सभासद मालकीचे कार्यालय नसावे.)

*********

# ६. नामनिर्देशन

(१) अधिनियम, नियम आणि संबंधित संस्थेचे उपविधी यांच्या तरतुदी अन्वये एखादी जागा भरण्यासाठी एखादा सदस्य निवडला जाण्यास अर्हताप्राप्त असेल आणि त्याचे नाव अंतिम मतदार यादीत नमूद केलेले असेल तर, ती जागा भरण्यासाठी निवडणुकीतील उमेदवार म्हणून, अशा कोणत्याही सभासदास नामनिर्देशित करता येईल.

परंतु , अधिनियमाच्या कलम ७३ ब आणि ७३ क मधील तरतूदीनुसार कोणत्याही संस्थेच्या समितीवरील राखीव जागेसाठी, त्या संस्थेचा कोणताही एक सभासद, किंवा सदस्य संस्थेचा कोणताही समिती सदस्य, मग तो निवडून आलेला, स्विकृत केलेला किंवा नामनिर्देशित केलेला असा, निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून निर्देशित केला जाण्यास पात्र असेल.

**परंतु आणखी असे की, ज्या संस्थेच्या मतदार संघात अंतीम मतदार यादीमध्ये केवळ पाच पात्र सदस्य उपलब्ध आहे अशा संस्थेतील इतर मतदार संघातील कोणतीही व्यक्ती जीचे नाव अंतीम मतदार यादीत समाविष्ट आहे, सुचक किंवा अनुमोदक असु शकेल.**

परंतु आणखी असे की, सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी गाळे संकुल संस्था यांचेबाबत ज्या सदस्याचे नाव भाग प्रमाणपत्रात प्रथम असेल, असा सदस्य निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल. अशा सदस्याच्या अनुपस्थितीत ज्याचे नाव सहयोगी सभासद म्हणुन दुस-या क्रमांकावर आणि या दोन्हीच्या अनुपस्थीतीत त्या पुढे ज्या व्यक्तींचे नाव असेल या प्रमाणे लगतपुर्वीच्या अनुपस्थीत व्यक्ती बाबत ज्याचे नांव भाग प्रमाणपत्रात पुढे असेल व जो अल्पवयीन नसेल असा सदस्य निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल.

(२) नियम २१ अन्वये सादर केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र, नमुना ई -५ मध्ये पूर्णपणे भरण्यात येईल.

परंतु, नामनिर्देशन पत्रातील निशाणी संबंधातील प्रतिज्ञापत्र भरण्यातील कसूर, किंवा ते पुर्ण करण्यातील दोष हा या नियमाच्या अर्थानुसार महत्वाचा दोष असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) मतदारांच्या यादीमध्ये जिचे नाव नोंदविण्यात आलेले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, निवडणुकीसाठी एखादया उमेदवाराचे नामनिर्देशन करण्यासाठी सूचक किंवा अनुमोदक होता येईल.

परंतु संस्थांच्या मतदारसंघातील निवडणुकीबाबत कलम ७३ ब व कलम ७३ क अन्वये राखीव मतदार संघाव्यतिरिक्त इतर मतदार संघांमध्ये त्याच मतदार संघांमधील सूचक व अनुमोदक असला पाहिजे.

(४) कोणत्याही मतदारास, त्याने मागणी केल्यावर नियम २३ मध्ये नमूद केलेले शुल्क भरल्यानंतर आणि राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने केलेल्या बदलाच्या अधिनतेने निवडणुक निर्णय अधिका-याकडुन नामनिर्देशनपत्र पुरविण्यात येईल.

(५) राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाने जा.क्र. ५४४/२०१४ दि. १०/१०/२०१४ व जा.क्र.१३९५/२०१४ दि. ३१/१२/२०१४ रोजीच्या पत्राने पाठविलेल्या त्या निशाणीचा नमूना निवडणूक निर्णय अधिका-याकडून पुरविणेत येईल.

## ६.१ नामनिर्देशन पत्र स्वीकृती व प्रसिध्दी (नियम २० व २१)

- निवडणूक कार्यक्रमात नामनिर्देशन पत्र स्वीकृती व प्रसिध्दीचा दिनांक, वेळ व ठिकाण नमुद केलेला असून संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्र स्वीकारताना दिनांक, वेळ व ठिकाणाचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.
- उमेदवारी अर्ज विक्री व स्विकृती पहिल्या दिवसापासुन मंजूर वेळेनुसार प्राधीकृत व्यक्तींनीच कामकाज सुरु करावे.
- संस्थेची सभासद संख्या व संवेदनाशिलता विचारात घेऊन नामनिर्देशन पत्र उपलब्ध करावे. सदर नामनिर्देशन पत्र संस्थेचा गोल शिक्का , अ. क्र. व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेले असावे.
- अंतिम मतदार यादीतील मतदारासच नामनिर्देशन पत्र उपलब्ध करणे आवश्यक आहे.
- निवडणूक कार्यक्रमानुसार जशी - जशी नामनिर्देशन पत्र प्राप्त होतील तशी तशी प्रसिध्द होणे अनिवार्य आहे.
- तथापी “क” वर्ग संस्थांच्या बाबत नामनिर्देशन पत्र सादर करणेच्या शेवटच्या दिवशी प्रसिद्ध करावीत.

- त्यामुळे प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी संबंधीत दिवशी व निर्धारीत वेळी नोटीस बोर्डावर पंचासमक्ष प्रसिध्द होणे क्रमप्राप्त आहे. तसेच प्राधिकरण/ मा सहकार आयुक्त यांचे संकेतस्थळावर प्रसिध्दी बाबत प्राधिकरणाच्या वेळोवेळी सुचना नुसार कार्यवाही करावी.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राप्त नामनिर्देशन पत्रांवर अनुक्रमांक, वेळ व दिनांक नमुद करुन स्वत:ची स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.
- प्राधिकरणाने उमेदवारी अर्जासोबत सादर करावयाचे प्रतिज्ञापनाचा नमुना जा क्र. १५३३ दि. ५/५/२०२० रोजीच्या आदेशान्वये निर्गमीत केलेला आहे.

## ६.२ उमेदवारी अर्ज विक्री / स्वीकृती रजिस्टर

| अ. क्र. | नामनिर्देशन पत्र घेणा-या सभासदाचे नाव | त्याचा अंतिम मतदार यादीतील क्र. | एकूण नामनिर्देशन संख्या | रक्कम रु. | सभासदाचे ओळख पत्र क्रमांक | दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्र घेणा-या सभासदाची दिनांकीत सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | | | | | | | | |

वरील रजिस्टर रोजच्या-रोज पंचासमक्ष बंद करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी करावी.

१. उमेदवारी अर्ज स्विकृती तक्ता रजिस्टरमध्ये तयार करावा. सोबत नमुना (१ ते १० रकाने) पुढील प्रमाणे

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा अंतिम मतदार यादीतील क्र. | मतदार संघ | सुचकाचे नाव | सुचकाचा अंतिम मतदार यादीतील क्र. | अनुमोदकाचे नाव | अनुमोदकाचा अंतिम मतदार यादीतील क्र. | दिनांक व वेळ | सादर करणा-या उमेदवार / सुचकाची दिनांकीत सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** |
| | | | | | | | | | |

२. नामनिर्देशन पत्र स्विकृती शेवटच्या दिवशी ठरलेल्या वेळी दुपारी ३ .०० वा उपस्थित सर्व उमेदवार यांचेकडून घेणेकरीता शेवटुन चिठ्ठ्या देणेत याव्यात. त्या अगोदर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची वेळ संपत आल्याची दुपारी २.५० ते २.५५ चे दरम्यान घोषणा करावी. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची वेळ संपल्यानंतर वरील प्रक्रियेनंतर कोणाचाही अर्ज स्विकारु नये.

३. अर्ज स्विकारतांना खालील प्रमाणे काळजी घ्यावी.

- मतदार यादीतील उमेदवार,सुचक व अनुमोदक यांचे नाव व क्रमांक तपासावे.
- सही आहे किंवा नाही ते तपासावे. अर्जातील किरकोळ दोष (टेकनिक्ल) दुर करणेकरीता संधी देणेत यावी.
- अनुसूचीत जाती / अनुसूचीत जमाती प्रवर्गाबाबत, प्रतिज्ञापत्र (Declaration), जातप्रमाण पत्राची सत्य प्रत आहे काय हे तपासावे.
- अर्जासोबत नियमामध्ये नमुद सर्व घोषणापत्र सोबत जोडलेले आहेत काय हे देखील तपासावे.
- निवडणूक कार्यक्रमात नमुद वेळेस अंतिम नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती यादी प्रसिध्द करावी. त्याची प्रत संबंधीत संस्था, तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी / जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना देण्यात यावी.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संचालक मंडळावर कलम ७३ ब व क अन्वये राखुन ठेवलेल्या जागाबाबत अभ्यास करणे आवश्यक आहे. सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील एकूण राखीव जागांची संख्या - ५ आहे.

## ६.३ नामनिर्देशन पत्र अनामत रक्कम व अर्ज शुल्क - (नियम २३)

१. प्राधिकरणाचे आदेश जा क्र.१५४१/२०२० दि.०६/०५/२०२० अन्वये "ड" वर्गामध्ये समाविष्ट होणाऱ्या सहकारी संस्थाच्या निवडणूकीसाठी उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत अनामत रक्कम भरण्यापासून सुट दिलेली आहे.

२. उमेदवारांची अनामत रक्कम जप्त करणेबाबत निवडणूक नियम २०१४ चे नियम ७० नुसार कार्यवाही करावी.

३. जप्त उमेदवार अनामत रक्कम प्राधीकरणाचे बॅक खात्यावर तात्काळ जमा करणे अनिवार्य आहे.

| अ. क्र. | संस्था प्रकार | एससी / एसटी उमेदवारा व्यतिरीक्त इतर उमेदवारां करीता अनामत रक्कम | एससी / एसटी उमेदवारांकरीता अनामत रक्कम | नामनिर्देशन पत्र शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | शिखर सहकारी संस्था | रु. ५०००/- | रु. १०००/ | रु. २००/ |
| २. | जिल्हा किंवा त्यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणारी सहकारी संस्था | रु. २०००/ | रु. ५००/ | रु. १००/ |
| ३. | तालुका किंवा तालुक्यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणारी मात्र जिल्हयापेक्षा जास्त कार्यक्षेत्र नसणारी सहकारी संस्था | रु. १०००/ | रु. ३००/ | रु. १००/ |
| ४. | एका गावापेक्षा जास्त मात्र तालुक्यापेक्षा कमी कार्यक्षेत्र असणारी सहकारी संस्था | रु. ७५०/ | रु. २५०/ | रु. ७५/ |
| ५. | गाव किंवा प्रभाग यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र नसणारी सहकारी संस्था | रु. ५००/ | रु. २००/ | रु. ५०/ |

## ६.४ नामनिर्देशन पत्राची छाननी (नियम २५)

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम २५ प्रमाणे, नियम १८ अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत प्राप्त उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे अनिवार्य आहे.

१. उमेदवाराच्या प्राप्त नामनिर्देशन अर्जाच्या छाननी वेळी उमेदवार व लेखी प्राधिकृत केलेल्या एक सुचक उपस्थित राहील या व्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहता येणार नाही. तसेच उपस्थित उमेदवारांचे रजिष्टरमध्ये स्वाक्षरी घेणे अनिवार्य आहे.

२. सदर सहकारी संस्था संवेदनशील वाटल्यास पोलीस बंदोबस्त व व्हिडीओ रेकॉर्डीगची व्यवस्था करण्यात यावी.

३. उमेदवारांच्या नामनिर्देशन अर्जाची छाननी मतदार संघ निहाय करण्यात यावी.

४. नामनिर्देशन पत्रावर हरकती प्राप्त झाल्यास त्यावर निवडणुक नियम २५ अन्वये निर्णय दयावे.

५. नामनिर्देशन अर्जाची छाननी करीत असताना संबधित कागदपत्रे तपासावेत ज्यांचे अर्जामध्ये त्रुटी आढळतात त्या अर्जावर निवडणूक निर्णय अधिका-यांनी अभिप्राय नोंदवावेत व स्वाक्षरी करावी.

६. जे नामनिर्देशन अर्ज नामंजूर आहेत त्या अर्जाबाबतचा निर्णय निवडणुक नियम २५ अन्वये संबधीतांना कळविणे अनिवार्य आहे. निवडणूक निर्णय अधिकारी गंभीर स्वरुपाचा नसेल अशा कोणत्याही दोषावरून नामनिर्देशन पत्र फेटाळणार नाही.

➢ नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आल्यानंतर आणि ते स्विकारल्याच्या किंवा फेटाळल्याच्या निर्णयाची नोंद केल्यानंतर लगेचच निवडणूक निर्णय अधिकारी, ज्यांची नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची यादी तयार करील, छाननी संपल्यानंतर लगेच पुढील दिवशी मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे नामनिर्देशन पत्र मंजूर असलेल्या पात्र उमेदवाराची यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणूक कार्यालयात, संस्थेच्या कार्यालयात, संबधित निबंधकांच्या कार्यालयात, व संस्थेचे कार्यक्षेत्र गाव असल्यास गावातील ग्रामपंचायत/ तलाठी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर डकवून त्याचा पंचनामा करणे आवश्यक आहे. त्याचा पुरावा दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. तसेच प्राधिकरण/ मा सहकार आयुक्त यांचे संकेतस्थळावर नामनिर्देशन पत्र मंजूर असलेल्या पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्दी बाबत प्राधिकरणाच्या वेळोवेळी सुचना नुसार कार्यवाही करावी.

७. नामनिर्देशन पत्राच्या छाननीकरीता छाननी नोटीस नामनिर्देशन पत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस देऊन त्याची पोहच निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जतन करणे अनिवार्य आहे.

८. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत: छाननी करणे अनिवार्य आहे.

९. याबाबत प्राधिकरणाने जा क्र. ४२१३ दि. ११/६/२०१८ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमीत केलेल्या आहेत.

## ६.४ . उमेदवारी अर्ज मागे घेणे (नियम २७)

१. उमेदवारांना आपल्या सहीनिशी पाठविलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम २७ मधील नमुना ई - ६ मधील लेखी नोटीसीव्दारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

२. नोटीस एकतर उमेदवारास स्वत: किंवा त्याचे नाव सुचविणा-या व्यक्तीस (उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेल्या सुचकास) समक्ष लेखी स्वरुपात निवडणूक निर्णय अधिका-यांना स्विकारता येईल.

३. निवडणूक कार्यक्रमामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उमेदवारी मागे घेणेसाठी नियम १८ (१) अन्वये निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजण्यापुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे अर्ज करता येईल.

४. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी शेवटच्या दिवशी ३.०० वाजेपर्यंत जेवढे उमेदवार येतील त्यांना शेवटपासून चिटया वाटप करून नमुना ई - ६ मधील लेखी नोटीसीव्दारे अर्ज स्विकारले जातील.

५. निवडणूक निर्णय अधिकारी , उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या नोटीसीचा खरेपणा आणि ती देणा-या व्यक्तीची ओळख पटणेसाठी अर्जामध्ये सादर करणा-या व्यक्तीचे ओळखपत्र, सभासदांचे मतदारयादीतील अनुक्रमांक व स्वाक्षरी तपासणे अनिवार्य आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटी आवश्यक तेथे व्हिडीओ शुटींग ठेवता येईल.

## ६.५. निवडणुक लढविण्या-या उमेदवारांची यादी तयार करणे आणि निवडणूक बोध चिन्हांचे वाटप

१. उमेदवारी मागे घेणेकरीता निश्चित करणेत आलेल्या शेवटच्या तारखेच्या लगतनंतरच्या दिवशी निनिअ निवडणूक लढविणा-या उमेदवारांची , म्हणजे ज्यांची नामनिर्देशनपत्रे अंतिम रित्या स्विकारण्यात आली असतील आणि विहीत मुदतीत उमेदवारी अर्ज मागे घेतले नसतील अशा उमेदवारांची यादी नमूना ई ७ मध्ये तयार करून त्यांचे कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करेल व तसा पंचनामा करुन दप्तरी ठेवील.

२. उक्त यादीत, मतदार यादी ज्या भाषेत व रितीने तयार केली त्या भाषेतील वर्णानुक्रमानुसार व त्यारितीने त्यांची आडनांवे, नावे आणि अन्य उमेदवारांची योग्य नावे तसेच निवडणूक लढविणा-या उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रामध्ये दिल्याप्रमाणे उमेदवारांचे पत्ते नमूद असतील.

३. मतदान आवश्यक असेल तर त्याबाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी आपापल्या नामनिर्देशन पत्रामध्ये व्यक्त केलेल्या निशाण्यांच्या पसंतीवर विचार करील. ( नियम २८ (३)

**अ.** निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास व्यवहार्य असेल तेथवर त्याच्या पसंतीनुरुप वेगवेगळे चिन्ह नेमून देईल.

**आ.** निवडणूक लढविणा-या एकाहून अधिक उमेदवारांनी एकाच निशाणीवर एकाच निशाणी साठी आपली पसंती दर्शविली असेल तर प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्वावर निशाणी नेमून देईल आणि असे नियतवाटप अंतिम असेल .

**इ.** जर निवडून दयायच्या एकून जागांच्या ३० % पेक्षा अधिक उमेदवारांनी गट तयार करून सर्व संबधित उमेदवारांनी सहया केलेल्या लेखी सामूहिक अर्जाव्दारे एकाच निशाणीची मागणी केल्यास त्यांना निवडणूक निर्णय अधिका-यांनी एक सामायिक निशाणी दयावी.

४. प्रत्येक उमेदवारास त्याला नेमून देण्यात आलेल्या निशाणीबाबत तात्काळ कळविणेत येईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाने जा.क्र. ५४४/२०१४ दि. १०/१०/२०१४ व जा.क्र.१३९५/२०१४ दि. ३१/१२/२०१४ रोजीच्या पत्राने पाठविलेल्या त्या निशाणीचा नमूना निवडणूक निर्णय अधिका-यांकडून पुरविणेत येईल.

५. प्राधिकरणास निवडणूक नियम २२(१) अन्वये निवडणूकीसाठी निवडणूक चिन्ह विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

६. प्राधिकरणाकडून भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेले मूक्त चिन्ह सहकारी संस्थांचे निवडणूकीसाठी प्रसिद्ध.

७. राजकीय पक्षांना प्रदान केलेली निवडणूक चिन्हे कोणत्याही व्यक्तीस/गटास देण्यावर निर्बंध आहेत.

८. बोधचिन्हा बाबत प्राधिकरणाने जा.क्र. ५४४/ दिनांक. १०.१०.२०१४ व जा.क्र. १३९५ दिनांक ३१.१२.२०१४ अन्वये निर्गमित केलेले परिपत्राकाचे अवलोकन करावे.

**तसेच वर नमुद परिपत्रक व्यतिरिक्त मा. केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेली मुक्त चिन्हांची यादी पुढीलप्रमाणे,**

# (LIST OF FREE SYMBOLS)


Baby Walker


Bangles


Bead Necklace


Bench


Bicycle Pump


Binoculars



Biscuit


Box


Bread Toaster


Bricks


Can


Capsicum


CCTV Camera


Chain


Chakki


Chapati Roller


Chimney


Clip


Coconut Farm


Colour Tray & Brush


Computer


Computer Mouse


Crane


Cube


Diamond


Door Bell


Door Handle


Drill Machine


Dumbbells


Ear Rings


Extension Board


Football


Football Player


Fountain


Ganna Kisan


Gift Pack



Ginger Gramophone Hand Cart Head Phone Helicopter Hour Glass



Immersion Rod Jackfruit Key Kitchen Sink Lady Finger Laptop



Latch Lighter Ludo Lunch Box Man Blowing Turha Matchbox



Mike Noodles Bowl Pants Peanuts Pears Pen Drive



Pencil Box Pendulum Pestle and Mortar Petrol Pump Phone Charger Pillow



Pineapple Plastering Trowel Plate Containing Food Punching Machine Road Roller Robot



Room Cooler Room Heater Rubber Stamp Ship Shoe Shutter


Sitar

Skipping Rope

Soap Dish

Socks

Sofa

Spanner


Stapler

Stumps

Swing

Switch Board

Syringe

T.V. Remote


Tea Filter

Telephone

Tennis Racket & Ball

Throwing a Javelin

Tiller

Toffees


Tongs


Tooth Paste

Tray

Triangle

Truck

Tube light


Typewriter

Vacuum Cleaner

Wall Hook

Wallet

Walnut


Melon

Water Tank

Well

Wheel Barrow

Winnower

Wool and Needle

## ६.६ . बिनविरोध/ अविरोध निवडणूक

नियम २७ अन्वये ज्या मुदतीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल ती मुदत संपल्यानंतर ज्यांचे नामनिर्देशन स्वीकारण्यात आले आहे अशा उमेदवारांची संख्या ही, त्या मतदारसंघामध्ये भरावयाच्या जागांच्या संख्येएवढी अथवा त्यापेक्षा कमी असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती जागा किंवा यथास्थिति त्या त्या प्रमाणातील जागा भरण्यासाठी असे सर्व उमेदवार यथोचितरीत्या बिनविरोध निवडून आले असल्याचे तात्काळ जाहीर करील आणि नमुना ई-९ मध्ये प्रतिज्ञापत्र करुन ते प्रमाणित करील.

********

# ७. आचार संहिता

- आचार संहितेबाबत प्राधिकरणाने जा क्र. १६७४ दि. १५/६/२०२० परिपत्रक निर्गमीत केलेले आहे.
- प्राधिकरणाने आचार संहिता निर्धारीत केलेली असून सदर आचार संहितेचे पालन संबंधीत उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींकडून होणे आवश्यक.
- सहकारी संस्थांच्या निवडणूकीची आचारसंहिता संबंधीत सहकारी संस्थेचे नामनिर्देशन सुरू होणेचे तारखेपासून मतदान संपेपर्यंत लागू.
- मतदान सुरू होण्यापुर्वी २४ तास अगोदर जाहिर प्रचार बंद होणे बंधनकारक.

## ७.१ मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई

ज्या तारखेस किंवा तारखांस मतदान घेण्यात येईल त्या तारखेस किंवा तारखांस मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासुन १०० मीटर अंतरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पुढील कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करता कामा नये.-

अ. मते मिळविण्यासाठी प्रचार करणे ; किंवा

ब. कोणत्याही मतदारास मत देण्याची विनंती करणे; किंवा

क. कोणत्याही विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

ड. निवडणुकीत मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

ई .निवडणुकीसंबंधी कोणतीही नोटीस किंवा चिन्ह (अधिकृत नोटिशीखेरीज इतर ) प्रदर्शित करणे;

## ७.२ मतदान केंद्रामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तणूक केल्याबददल शास्ती

(१) (अ) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशव्दाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यांसारखे, कोणतेही साधन वापरता कामा नये,

(ब) कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत ओरडता कामा नये किंवा इतर प्रकारे बेशिस्त रीतीने वागता कामा नये.

(२) मतदान केंद्राध्यक्षास एखादी व्यक्ती हया कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने केला आहे असे सकारण वाटत असेल तर त्यास, अशा व्यक्तीस अटक करण्याबद्दल कोणत्याही पोलीस अधिका-यास निदेश देता येईल

(३) कोणत्याही पोलीस अधिका-यास, पोटनियम (१) च्या तरतुदीच्या कोणत्याही उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील व अशा बलाचा वापर करता येईल आणि अशा उल्लंघनाकरिता वापरण्यात आलेले कोणतेही साधन जप्त करता येईल.

## ७.३ . मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती

(१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेमध्ये गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर त्या व्यक्तीस, मतदान केंद्रातून काढून टाकता येईल.

(२) मतदारास उक्त केंद्रात मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने उपबंध (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करता येणार नाही.

## ७.४ मतदान केंद्रावरून मतपत्रिका बाहेर नेणे हा अपराध असणे

(१) कोणतीही व्यक्ती, मतदान केंद्रावरून मतपत्रिका बाहेर नेत आहे किंवा बाहेर नेण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा व्यक्तीस, तिने मतदान केंद्र सोडण्यापूर्वी, अटक करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि अशा व्यक्तीची झडती घेता येईल किंवा पोलीस अधिका-यांकडून तिची झडती घेवविता येईल.

**परंतु,** जेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेण्याची आवश्यकता असेल तेंव्हा सदर झडती दुस-या स्त्रीकडून, सभ्यतेचे दक्षतापूर्वक पालन करून घेण्यात येईल.

(२) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची झडती घेण्यात आल्यावर तिच्याजवळ कोणतीही मतपत्रिका सापडल्यास ती, मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षित अभिरक्षेसाठी, पोलीस अधिका-याच्या स्वाधीन करील .

## ७.५ इतर अपराध व त्याबद्दलच्या शास्ती

(अ) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(ब) निवडणूक निर्णय अधिका-याच्या प्राधिकाराव्दारे किंवा तद्न्वये लावलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे, किंवा ते काढून टाकणे; किंवा

(क) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह किंवा ओळख पटवून देण्याबाबतचे प्रतिज्ञापन किंवा डाकेने मतपत्रिका पाठविण्यासंबंधात वापरलेले अधिकृत पाकीट लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(ड) योग्य प्राधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीस मतपत्रिका पुरविणे किंवा कोणत्याही व्यक्तीकडून मतपत्रिका स्वीकारणे किंवा कोणतीही मतपत्रिका जवळ बाळगणे; किंवा

(ई) मतपेटीत जी मतपत्रिका टाकण्याचा कायद्याने अधिकार असेल त्या मतपत्रिकेव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू लबाडीने तीत टाकणे; किंवा

(फ) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्यावेळी उपयोगात आणलेल्या कोणत्याही मतपेट्यांचा किंवा मतपत्रिकांचा योग्य प्राधिकारावाचून नाश करणे किंवा त्या घेऊन जाणे किंवा उघडणे किंवा त्यात इतर रीतीने हस्तक्षेप करणे; किंवा

(ग) लबाडीने किंवा यथास्थिती, योग्य प्राधिकारावाचून कोणतीही पूर्वोकृत कृत्ये करण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी कृत्ये करण्यास जाणूनबुजून मदत करणे किंवा अशी कृत्ये करण्यास अपप्रेरणा देणे.

निवडणुकीचे काम किंवा निवडणुकीच्या कामाचा भाग पार पाडताना त्यात भाग घेणे किंवा निवडणुकीनंतर अशा निवडणुकांच्या संबंधात वापरलेल्या मतपत्रिका व इतर कागदपत्रे यांच्याबद्दल जबाबदार राहणे हे एखादया व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, ती व्यक्ती अधिकृत कामावर आहे असे मानण्यात येईल.

*********

# ८. मतदान

## ८.१ मतदानापुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही

१. मतपत्रिका तपासून बरोबर असल्याची खात्री करावी.

२. संस्थेच्या सभासद संख्येनुसार मतदान केंद्राची व्यवस्था करावी.

३. मतदानासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी यांना आदेश काढून त्यांच्या नियुक्ती आदेशांची बजावणी करावी. तसेच सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सर्व सुचना देऊन वेळेत उपस्थित राहणेस सुचित करावे व कामकाज नेमुन द्यावे.

४. प्रत्येक केंद्रातील सर्व प्रकारचे साहित्य, स्टेशनरी,विहित नमुन्यातील फॉर्म केंद्राध्यक्ष यांना देण्यात यावे.

५. आवश्यक पोलिस बंदोबस्त साठी पत्रव्यवहार करावा.

६. मतदान केंद्र सुरू करण्याबाबतची परवानगी घ्यावी.

७. मतदान केंद्रातील सर्व उपाययोजना व व्यवस्था करावी.

८. मतदान केंद्रापर्यंत अधिकारी - कर्मचारी पोहचणेसाठी व साहित्य वाहतुक करणेकामी वाहन व्यवस्था करावी.

९. मतदान प्रतिनिधी यांची नियुक्ती उमेदवारांनाकडून ई-८ नमुन्यातील नोटीस प्राप्त करुन घेवून नियुक्ती करणे आवश्यक आहे. (नियम २९)

## ८.२ मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी यांचेसाठी मार्गदर्शक सुचना

### अ. मतदान साहित्य ताब्यात घेणे

- नेमणूक आदेशात नमुद दिनांकास व वेळेवर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहुन निश्चित करुन दिलेल्या टेबलवरुन आपल्या मतदान केंद्रासाठीचे साहित्य व मतपत्रिका ताब्यात घेतील.
- मतदान साहित्यांच्या यादीप्रमाणे सर्व साहित्य, फॉर्म, लिफाफे, मतपत्रिका, व मतदार याद्या असल्याची खात्री करतील.
- मतदान केंद्रासाठी देण्यात आलेल्या मतपत्रिका ताब्यात घेतल्यानंतर सदर मतपत्रिका मोजून व तपासून घेईल, मतपत्रिकांचे अनुक्रमांक बरोबर असल्याची खात्री करुन घेईल.
- मतदान केंद्रासाठी देण्यात आलेली मतदार यादी त्याच मतदान केंद्रासाठीची असल्याची खात्री करुन घेईल, मतदार यादीत सर्व पाने व मतदार यादीतील अनुक्रमांक अनुक्रमाने असल्याची खात्री करुन घेण्यात येईल.
- मतदान साहित्यात पुरविण्यात आलेला विभेदक चिन्हाचा शिक्का त्याच मतदान केंद्रांसाठीचा असल्याची खात्री करुन घेईल.
- वरील प्रमाणे सर्व साहित्य, मतपत्रिका व मतदार यादी याबाबत खात्री झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष विहित नमुन्यातील दाखला स्वाक्षरी करुन निश्चित करुन दिलेल्या टेबलवर जमा करेल. त्याशिवाय मतदान केंद्राकडे प्रयाण करणार नाही.
- मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडीत असेल अशा प्रत्येक अधिका-याने, लिपिकाने, अभिकर्त्याने, किंवा इतर व्यक्तीने मतदानासंबंधी गुप्तता राखली पाहिजे.

### ब. निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करणे

- (१) एखाद्या उमेदवारास, स्वत:चा निवडणूक प्रतिनिधी म्हणून एखाद्या व्यक्तीची नेमणूक उप नियम (३) च्या तरतूदीच्या अधीन राहून नमुना "ई-८" मध्ये करता येईल.
- (२) उमेदवार, स्वत:ची सही असलेले एक लेखी प्रतिज्ञापत्र निवडणूक निर्णय अधिका-याकडे दाखल करुन निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक कोणत्याही वेळी रद्द करु शकेल.
- (३) उमेदवारास जिचे नाव मतदार यादीत आहे अशा व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येईल.

**क. मतदान / मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक**

- **(१)** निवडणूक लढविणा-या कोणत्याही उमेदवारास, प्रत्येक मतदान केंद्रावर, अशा उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी एक प्रतिनिधी आणि एक बदली प्रतिनिधी ज्यांचे नांव मतदार यादीत आहे यांची नेमणूक करता येईल.
- (२) उमेदवार नेमणुकीचे पत्र मतदान प्रतिनिधीला देईल व तो प्रतिनिधी ते मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेस मतदान केंद्राध्यक्षास सादर करील आणि त्याच्या समक्ष, त्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिज्ञापनावर सही करील. मतदान केंद्राध्यक्ष, त्याला सादर केलेले पत्र स्वतःच्या ताब्यात ठेवील. मतदान प्रतिनिधीने या नियमाच्या तरतूदींचे पालन केलेले असल्याखेरीज, त्याला कोणतेही काम पार पाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
- (३) मतदान प्रतिनिधींना, उमेदवाराने, नमुना "ई-८अ" मध्ये दिलेल्या प्राधिकारानुसार मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करता येईल.
- (४) मतमोजणीस प्रारंभ करण्यापूर्वी उमेदवार, अशा मतमोजणी प्रतिनिधींच्या नेमणुकीबाबतची नोटीस, निवडणूक निर्णय अधिका-याला, नेमणुकीबाबतचे पत्र त्या अधिकाऱ्याकडे अग्रेषित करुन देईल. उमेदवारास नेमणूक पत्राची दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीलाही देईल. मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणीकरिता निश्चित केलेल्या तारखेस, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास ती प्रत सादर करील आणि तिच्यात अंतर्भूत असलेल्या प्रतिज्ञापत्रावर त्याच्यासमक्ष सही करील. मतमोजणी प्रतिनिधीस, त्याने या तरतूदींचे पालन केलेले असल्याखेरीज, कोणतेही कार्य पार पाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## ८.३. मतदानापूर्वी उमेदवाराचे निधन होणे

- निवडणूक लढविणा-या एखादा उमेदवाराचे निधन झाल्यास आणि त्याच्या मृत्युची बातमी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मिळाली असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराच्या मृत्युच्या वस्तुस्थितीबद्दल खात्री पटल्यावर, मतदानाबाबत प्रत्यादेश देईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना निवडणुकीच्या कार्यवाहीसह त्याबाबत कळविल आणि निवडणुकी संदर्भातील सर्व कामकाजास, नवीन निवडणूक असल्याप्रमाणे सर्व बाबतीत, नव्याने प्रारंभ करण्यात येईल.

**********

# ९. निवडणुकीच्या वेळी मतदानाची रीत (नियम ३३ ते ३५)

- मतदान गुप्त मतदान पद्धतीने किंवा इलेक्ट्रॅनिक मतदान यंत्राने मते देण्यात येतील आणि कोणतीही मते बदली व्यक्ती मार्फत स्वीकारण्यात येणार नाही.

## ९.१ मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र

- प्रत्येक मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येईल अशा स्वरुपाचे असेल.

## ९.२ मतपत्रिकेचा नमुना

- प्रत्येक मतपत्रिका नमुना "ई-१०" मध्ये असेल. उमेदवारांची नावे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत ती ज्या क्रमाने असतील त्या क्रमाने मतपत्रिकेवर लावण्यात येतील. टोपण नाव असल्यास त्याचा समावेश करण्यात येईल. तथापि दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांचे नाव सारखेच असेल तर, त्याचा व्यवसाय किंवा निवासस्थान याची त्यापुढे भर घालून किंवा, निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील अशा इतर कोणत्याही रीतीने त्यातील फरक दाखविला जाईल.

## ९.३ मतदानाबाबत दक्षता (नियम ३३ ते ५४)

- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नमुना मतपत्रिका अचुक असल्याचे संबंधीत उमेदवार / प्रतिनिधींकडून खात्री झाल्यानंतर मतपत्रिकांची छपाई करणे आवश्यक.
- मतपत्रिकांची छपाई नमुना मतपत्रिकांप्रमाणे झाली आहे किंवा कसे याची निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदानापुर्वी खात्री करणे आवश्यक.
- पुरेशा मतपत्रिकांची छपाई करणे आवश्यक.
- मतदानाकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग नियुक्त करणे आवश्यक.
- मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्याच्या दृष्टीने पुरेश्या मतदान केंद्रांचे नियोजन करणे अनिवार्य.
- मतदान केंद्राबाहेर मतपत्रिकांचा नमुना व मतदार यादी नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे अनिवार्य.
- मतदान केंद्रावर पूर्वपरवानगी दिलेल्या व्यक्तींचे उपस्थितीस परवानगी अनिवार्य.
- मतदारांची ओळख पटल्यानंतरच मतदान करण्यास परवानगी देणे बंधनकारक.
- मतदानापुर्वी मतपेटी रिकामी असल्याची पंचासमक्ष खात्री करणे अनिवार्य.
- मतदान केंद्रावर गर्दी झाल्यास एकापेक्षा जास्त मतदान कक्ष उपलब्ध करणे आवश्यक.
- मतदान संपण्याच्या विहीत वेळेस गर्दी झाल्यास रांगेत उपस्थित शेवटच्या मतदारापासुन सुरूवात करून सर्व मतदारांना चिठ्ठया देऊन सर्वांचे मतदान होणेबाबत दक्षता घेणे आवश्यक.
- मतदान ठरलेल्या वेळेत सुरू करणे व पुर्ण करणे अनिवार्य.
- मतदान संपल्यानंतर प्रतिनिधींना मतपत्रिकांचा हिशोब ई १५ नमुन्यात देणे बंधनकारक.

# मतदान केंद्राकरीता फलक

रासनिप्रा

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

| | |
|---|---|
| विभाग /जिल्हा / तालुका नाव | :- ------------------------------------------- |
| संस्थेचे नाव | :- ------------------------------------------- |
| संस्थेचा पत्ता | :--------------------------------------------- |
| | --------------------------------------------- |
| निवडणूक दिनांक. | :- / / |
| मतदान केंद्र नाव | :- ------------------------------------------- |
| मतदान केंद्र क्र. | :- ------------------------------------------- |
| मतदार यादीतील सभासद क्र. | :- ------------------------------------------- |

## ९.४ मतदानाच्या पुर्वसंध्येला करावयाची पुर्व तयारी

- मतदान केंद्रामध्ये मतदारांना दृष्टीआड राहुन आपली मते नोंदविता येतील अशा एक किंवा अधिक मतदान कक्षाची उभारणी करण्यात येईल.
- मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांना बसण्यासाठी टेबल व खुर्च्यांची मांडणी करण्यात येईल. त्याचप्रमाणे मतदान प्रतिनिधी यांचे बसण्यासाठीची व्यवस्था करेल.
- मतपत्रिकेच्या मागील बाजुस निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्या मतदान केंद्रासाठी पुरविलेले विभेदक खुणेचा शिक्का सर्व मतपत्रिकांवर मारण्यात येऊन त्याशेजारी केंद्राध्यक्ष स्वाक्षरी करेल.
- विभेदक खुणेचा शिक्का मतपत्रिकेच्या मागील बाजूस काऊंटर व वापरावयाची मतपत्रिका असा दोन्ही भागावर अर्धा-अर्धा येईल आणि मध्यभागी ठसविण्यात येईल. जेणे करुन मतपत्रिकेची घडी केल्यावर देखील सदर शिक्का दिसुन येईल.

## ९.५ मतदान केंद्रावरील व्यवस्था (नियम ३६)

- मतदान केंद्राचा क्रमांक व मतदान केंद्राचे ठिकाण यांचा तपशिल मतदान केंद्राचे प्रवेशव्दारावर प्रदर्शित करण्यात येईल.
- मतदान केंद्रात समाविष्ट मतदारांचे अनुक्रमांक ---- पासुन ----- पर्यंत व मतदान केंद्रात समाविष्ट मतदारांची संख्या यांचा तपशिल मतदान केंद्राचे दर्शनी भागामध्ये प्रदर्शित करण्यात येईल.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे यादीची मतदान साहित्या सोबत पुरविलेली एक नमुना मतपत्रिका मतदान केंद्रा बाहेर मतदारांना दिसुन येईल, अशा ठिकाणी प्रदर्शित करण्यात येईल.
- मतदारांना त्यांची ओळख पटविणेसाठी आवश्यक असलेल्या ओळखपत्रांची यादी मतदान केंद्राबाहेर प्रदर्शित करण्यात येईल.
- मतदान कक्षात मतदारांना मतपत्रिकेवर विभेदक खुणा उमटविण्यासाठी शिक्का व शाईचा पॅड ठेवण्यात येईल. शिक्का व पॅड सुस्थितीत असल्याची मतदान केंद्राध्यक्ष वेळोवेळी खात्री करतील.

➢ याशिवाय मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, मतदान कक्ष इत्यादी पुरविण्यात आलेले फलक भिंतीवर योग्य ठिकाणी लावण्यात येतील.

➢ वरील प्रमाणे सर्व पुर्वतयारी करुन मतदान केंद्राध्यक्ष सर्व मतदान अधिकारी व कर्मचारी मतदानाचे दिवशी सकाळी ०७.०० वाजता मतदान केंद्रावर मतदानासाठी सज्ज झालेले असतील.

## ९.६ मतदान अधिकारी यांची कामे

मतदान केंद्राध्यक्ष यांनी नियुक्त मतदान अधिकाऱ्याकडे खालील प्रमाणे कामाची जबादारी सोपविणे आवश्यक आहे.

**अ) मतदान अधिकारी क्र. ०१ :-** मतदारांची ओळख पटविणे, ओळखपत्र तपासणे, मतदारांचे नांव आणि इतर तपशिल मतदारांच्या यादीतील सबंधीत नोंदीशी पडताळुन पहाणे, त्यानंतर मतदाराचा अनुक्रमांक व नांव उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी यांना ऐकु येईल अशा रितीने पुकारणे.

**ब) मतदान अधिकारी क्र. ०२ :-** मतदान अधिकारी क्रमांक ०१ हा मतदाराचा अनुक्रमांक पुकारेल त्यावेळी त्या मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक मतदार नोंदवही (वोटर रजिष्टर) मध्ये नोंदविल, त्यापुढील स्तंभात तो मतदाराने दिलेल्या ओळखीच्या पुराव्याचा क्रमांक नमुद करेल (जसे आधार कार्ड क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक, लायसन्स क्रमांक इत्यादी) आणि त्यापुढील स्तंभात मतदारास मतपत्रिका मिळालेबाबत स्वाक्षरी / अंगठा घेईल.

**क) मतदान अधिकारी क्र. ०३ व ०४ :-** मतदान अधिकारी क्रमांक ०१ जेव्हा मतदाराचा अनुक्रमांक पुकारेल तेव्हा मतदान अधिकारी क्रमांक ०३ व ०४ हे तो अनुक्रमांक मतपत्रिकेच्या काऊंटरवर विहित ठिकाणी नमुद करतील, त्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक ०३ व ०४ हे त्या मतदारास सर्वसाधारण, महिला राखीव व अनुसूचित जाती / जमाती या मतदार संघाच्या प्रत्येकी एक प्रमाणे एकुण ०३ मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे विहित रितीने घडी करुन मतदाराकडे मत नोंदविणे कामी सुपूर्द करतील.

**ड) मतदान अधिकारी क्र. ०५ :-** मतपत्रिका मतदारांच्या ताब्यात दिल्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक ०५ किंवा मतदान कर्मचारी मतदारांच्या डाव्या हाताच्या अंगठ्यास पक्क्या शाईची खुण करेल. (काही मतदान केंद्रावर मतदान अधिकारी ०५ नियुक्त केलेला नसल्याने हे काम मतदान अधिकारी क्रं. ०४ यांनी पार पाडायचे आहे.)



मतदान अधिकारी नेमणूक आदेशात मतदान आधिकारी ०१, ०२, ०३ व ०४ यांचा काहीही क्रम असला तरी देखील केंद्राध्यक्ष कामकाजाचे सोयीचे दृष्टीने सदर क्रमात बदल करुन चांगल्या अधिकाऱ्याकडे मतदान अधिकारी क्रमांक ०१ ची जबाबदारी सोपवु शकतील.

## ९.७ मतदानासाठी मतपेटी तयार करणे (नियम ३८) ईव्हिएममार्फत मतदान प्रक्रियेसाठी तयारी करणे. (नियम ३९)

- मतपेटीच्या सुरक्षिततेसाठी मतपेटीवरील समोरील बाजूस कुलूपाचे खाली व पेटीच्या आतील बाजूस अशा दोन्ही ठिकाणी निवडणूक साहित्यासोबत पुरविलेली **खुण चिठ्ठी** लावण्यात येईल, अशा खुण चिठ्ठीवर मतदान केंद्रांचा क्रमांक, मतदान केंद्राचे ठिकाण, मतदान पेटीचा क्रमांक, मतदान दिनांक इत्यादी तपशिल नमुद करुन केंद्रासाठी देण्यात आलेला रबरी शिक्का ठसवून केंद्राध्यक्ष अशा खुण चिठ्ठीवर स्वाक्षरी करेल.
- मतदानास प्रांरभ होण्याच्या लगतपूर्वी मतदान केंद्राध्यक्ष उपस्थित मतदान प्रतिनिधी / उमेदवार आणि इतर व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे आणि तिच्यावर विनिर्दिष्ट केलेल्या खुणचिठ्ठ्या लावण्यात आल्याचे दाखवील.
- त्यानंतर मतपेटी बंद करुन कुलूप लावण्यात येईल, सदर कुलूपास कॉटन टेप विहित रितीने बांधून मोहोरबंद आणि सुरक्षित करण्यात येईल.
- मतपेटीचे झाकण कुलूपाने मोहोरबंद केल्या नंतर, पेटीचे झाकण व पेटीच्या अर्ध्या भागावर कागदी मोहोर लावण्यात येईल, तत्पूर्वी कागदी मोहोरवर उपस्थित प्रतिनिधी / उमदेवार यांना स्वाक्षरी करण्यास सांगण्यात येईल, कागदी मोहोर डिंकाने चिटकवण्यात येईल, कागदी मोहोरला लावलेला डिंक सुकल्या नंतर कागदी मोहोर निखळु नये यासाठी बाजूने टेक्सोटेप लावुन सुरक्षित करण्यात येईल.
- मतपेटी मोहोरबंद करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतपेटी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधी यांच्या नजरेसमोर राहील अशा जागी ठेवण्यात येईल.
- मतपेटी मोहोरबंद करण्याची कार्यवाही सकाळी ०७.३० ते ०७.४५ च्या दरम्यान सुरु करुन कोणत्याही परिस्थिती ०८.०० वाजण्यापुर्वी पुर्ण करण्यात येईल.
- मतपेटी मोहोरबंद करण्याची प्रक्रिया चालु असतांना मतदान केंद्राध्यक्ष मतदानापूर्वीचे घोषणापत्रावर उपस्थित उमेदवार / उमेदवाराचे प्रतिनिधी यांच्या स्वाक्षऱ्या घेईल, मतपेटी मोहोरबंद झाल्यानंतर शेवटी सदरचे घोषणापत्र त्यासाठी निश्चित करुन दिलेल्या लिफाफा क्रमांक ०१-**'मतदान पेटी मोहोरबंद करण्यापुर्वीचे प्रतिज्ञापत्र'** या लिफाफ्यात मोहोरबंद करेल.
- मतपेटीबाबत प्राधिकरणाने जा क्र.६८३ दि. १५/११/२०१४ व मतदान यंत्राबाबत जा क्र.६५१६ दि. ५/११/२०१६ अन्वये आदेश पारीत केलेले आहे

### मतदान कक्षाचे दर्शनी भागावर

रासनिप्रा

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

| | | |
|---|---|---|
| विभाग /जिल्हा / तालुका नाव | :- -------------------------------------------- | |
| संस्थेचे नाव | :- -------------------------------------------- | |
| संस्थेचा पत्ता | :---------------------------------------------- | |
| | ---------------------------------------------- | |
| निवडणूक दि. | :- / / | |
| मतदान केंद्र नाव | :- -------------------------------------------- | |
| मतदान केंद्र क्र. | :- -------------------------------------------- | |
| मतदार यादीतील सभासद क्र. | :- -------------------------------------------- | |

मतदान कक्षाचे दोन्ही बाजूस

रासनिप्रा

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

**मतदान कक्ष**

State Co-operative Election Authority

**Voting Compartment**

## ९.८ मतदारांची ओळख पटविणे (नियम ४०)

(१) मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी किंवा मतदान घेताना त्याला सहाय्य करण्या साठी, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

(२) भारत निवडणूक आयोग केंद्र व राज्यशासन यांनी ठरवून दिलेला छायाचित्र असलेला ओळखीचा पुरावा किंवा संस्थेने संस्थेच्या उपविधीतील तरतुदींनुसार दिलेले छायाचित्र असलेले ओळखपत्र स्वत:जवळ बाळगिल.

(३) एखाद्या व्यक्तीच्या मतपत्रिका मिळविण्याच्या अधिकाराबाबत निर्णय घेताना, मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिति, मतदान अधिकारी, मतदार यादीतील कोणत्याही नोंदीतील केवळ लेखन व मुद्रण दोषांकडे, ज्या मतदाराशी ती नोंद संबंधित आहे तो मतदार आणि ती व्यक्ती एकच आहे याबाबत त्यांची खात्री झाली तर, दुर्लक्ष करील.

- प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करील तेव्हा तो फोटो असलेला ओळखीचा पुरावा स्वत:जवळ बाळगेल, व मतदान अधिकारी क्रं. ०१ यांना दाखवेल. याबाबत प्राधिकरणाने जा क्र. १४२५ दि. ६/०५/२०२० अन्वये आदेश परीत केलेले आहे.
- मतदान अधिकारी क्रं. ०१ मतदारांचे नांव आणि इतर तपशिल मतदारांच्या यादीतील सबंधीत नोंदीशी पडताळुन पाहिल आणि त्यानंतर मतदाराचा अनुक्रमांक व नाव उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी यांना ऐकू येईल अशा रितीने पुकारील.
- एखाद्या व्यक्तीच्या मतदारांच्या अधिकाराबाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी क्रमांक ०१ मतदारांच्या यादीतील नोंदीतील केवळ लेखन व मुद्रण दोषांकडे, अशा नोंदीशी सबंधीत असलेल्या मतदारांशी अशा व्यक्तीचे साम्य आहे याबाबत खात्री झाली तर दुर्लक्ष करील.

## ९.९ मतदारास मतपत्रिका देणे. (नियम ४३)

- मतदानाच्या प्रारंभासाठी निश्चित केलेल्या वेळेआधी कोणत्याही मतदारास कोणतीही मतपत्रिका देता कामा नये.
- मतदारास मतपत्रिका देणेपुर्वी मतपत्रिकेच्या मागील बाजुस निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्या मतदान केंद्रासाठी पुरविलेले विभेदक खुणेचा शिक्का मारण्यात येऊन त्याशेजारी केंद्राध्यक्ष यांनी स्वाक्षरी केलेली असल्याची खात्री करण्यात येईल.

- विभेदक खुणेचा शिक्का मतपत्रिकेच्या मागील बाजूस काऊंटर व मतपत्रिका असा दोन्ही भागावर अर्धा येईल आणि मध्यभागी ठसविण्यात येईल. जेणे करुन मतपत्रिकेची घडी केल्यावर देखील सदर शिक्का दिसुन येईल.
- मतदारास मतपत्रिका देतेवेळी, मतदान अधिकारी क्रमांक ०१ त्यांचेकडे नोंद करण्यासाठी स्वतंत्रपणे ठेवलेल्या मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये मतदारांच्या नावाखाली स्केचपेनने अधोरेखित करेल.
- महिला मतदाराच्या बाबतीत मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये मतदारांच्या नावाखाली स्केचपेनने अधोरेखित करेल आणि अनुक्रमांकास गोल करेल. जेणे करुन महिला व पुरुष मतदारांची विगतवारी करणे सोईस्कर होईल.
- तद्नंतर मतदान अधिकारी क्रमांक ०१ हा त्या मतदारांचा मतदार यादीतील अनुक्रमांक मतदार नोंदवही (वोटर रजिष्टर) मध्ये नोंदविल, त्यापुढील स्तंभात तो मतदाराने दिलेल्या ओळखीच्या पुराव्याचा क्रमांक नमुद करेल (जसे आधार कार्ड क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक, लायसन्स क्रमांक इत्यादी) आणि त्यापुढील स्तंभात मतदारास मतपत्रिका मिळाले बाबत स्वाक्षरी / अंगठा घेण्यात येईल,
- मतदान अधिकारी क्रमांक ०१ जेव्हा मतदाराचा अनुक्रमांक पुकारेल तेव्हा मतदान अधिकारी क्रमांक ०२ व ०३ हे तो अनुक्रमांक मतपत्रिकेच्या काऊंटरवर विहित ठिकाणी नमुद करतील, मतदाराची मतदार नोंदवहीत स्वाक्षरी झाल्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक ०२ व ०३ त्या मतदारास मतदार संघनिहाय मतपत्रिका विहित रितीने घडी करुन मतदाराच्या ताब्यात देतील.
- मतपत्रिका मतदारांच्या ताब्यात दिल्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक ०४ किंवा मतदान कर्मचारी मतदारांच्या डाव्या हाताच्या अंगठ्यास पक्क्या शाईची खुण करेल.

## ९.१० मतदानाची कार्यपध्दती (नियम ४४)

- मतपत्रिका मिळताच मतदार ताबडतोब मतदान कक्षांपैकी एका कक्षाकडे जाईल,
- तेथे ज्या उमेदवाराला मत देण्याची त्यांची इच्छा असेल त्यांच्या मतपत्रिकेवरील निशाणीवर किंवा तिच्या जवळ, त्याला त्या प्रयोजनासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने खुण करील.
- आपले मत दिसु नये यासाठी मतपत्रिकेची घडी करील. आवश्यक वाटल्यास, मतपत्रिकेवरील विभेदक चिन्ह मतदान केद्राध्यक्षास दाखविल.
- घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील आणि मतदान केंद्रा बाहेर जाईल.
- मतदार मतदान कक्षात असतांना दुसऱ्या मतदारास मतदान कक्षाच्या आत प्रवेश करण्यास परवानगी देऊ नये.

## ९.११ मतदान केंद्रात प्रवेश (नियम ३७)

- मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्रात कोणत्याही एका वेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांच्या संख्येचे नियमन करील आणि पुढील व्यक्तीच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींना मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.
- (१) मतदान अधिकारी, (२) निवडणुकीशी सबंधीत अशा कामावर असलेले लोकसेवक, (३) निवडणूक निर्णय अधिकारी, (४) निर्वाचन अधिकारी यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती, (५) उमेदवार, (६) उमेदवाराने नियुक्त केलेला मतदान प्रतिनिधी, (७) मतदाराबरोबर असलेले कडेवरील मूल, (८) मदतीशिवाय ज्याला हालचाल करता येत नाही अशा अंध किंवा अपंग मतदाराबरोबर असलेली एखादी व्यक्ती, (९) निवडणूक निर्णय अधिकारी मतदारांची ओळख पटविण्याच्या प्रयोजनासाठी नियुक्त करील अशी इतर व्यक्ती.

## मतदान केंद्राची रचना




## ९.१२ तोतयेगिरीविरुध्द खबरदारी घेणे (नियम ४२)

- मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या हेतूने, ज्याच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिती मतदान अधिकारी क्रमांक ०१ यांची खात्री पटेल, अशा मतदारास मतपत्रिका ताब्यात दिल्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक ०४ किंवा मतदान कर्मचारी मतदारांच्या डाव्या हाताच्या अंगठ्यास पक्क्या शाईची खुण करेल.
- कोणताही मतदार डाव्या हाताच्या अंगठ्याचे निरिक्षण करुन देण्यास किंवा खुण करुन देण्यास नाकारील किंवा त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्यावर अगोदर पक्क्या शाईची खुण केलेली असेल, किंवा पक्क्या शाईची खुण काढुन टाकण्याच्या हेतुने तो कोणतेही कृत्य करील तर त्यास मतपत्रिका देण्यात येणार नाही किंवा मतदान करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.
- मतदाराच्या डाव्या हाताच्या अंगठ्यास पक्क्या शाईने खुण करण्याच्या सबंधीचे निर्देश हा, मतदारास डाव्या हाताचा अंगठा नसेल तेव्हा त्याच्या डाव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटासबंधीचा आणि त्यांच्या डाव्या हाताची सर्व बोटेच नसतील त्या बाबतीत, त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा किंवा इतर कोणतेही बोट यासंबंधीचा आणि दोन्ही हातांची बोटे नसतील त्या बाबतीत त्याला असलेल्या त्यांच्या डाव्या किंवा उजव्या हाताचे टोक या सबंधीचा आहे असे समजण्यात येईल.

## ९.१३ ओळखीबाबत आक्षेप घेणे. (आव्हानीत मते) (नियम ४१)

- कोणत्याही मतदान प्रतिनिधीस, आपण विशिष्ट मतदार आहोत असा दावा करणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या ओळखी बाबत मतदान केंद्राध्यक्षाकडे प्रत्येक आक्षेपासाठी प्रथम रुपये ५०/- रोख ठेवून आव्हान देता येईल.
- अशी रक्कम ठेवल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष मतदारांच्या यादीतील सबंधीत नोंद संपूर्णपणे वाचील आणि त्या नोंदीत विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती तीच आहे किंवा काय याबाबत तिच्याकडे विचारणा करील.
- **आक्षेपीत** मतांच्या यादीत तिचे नांव आणि पत्ता नोंदवील.
- उक्त यादीत तिची सही करण्यास तिला भाग पाडील.

- त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष संक्षिप्त चौकशी करील आणि त्यास त्या प्रयोजनासाठी ओळखीचा पुरावा सादर करण्यास भाग पाडेल. ओळख पटविणेसाठी आवश्यक असे प्रश्न विचारले आणि शपथेवर उत्तरे देण्यास तिला भाग पाडेल, आव्हान दिलेल्या व्यक्तीकडून आणि साक्ष देऊ करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून शपथ घेता येईल.
- चौकशीनंतर मतदान केंद्राध्यक्षास असे वाटले की, **आक्षेप** सिध्द झालेले नाही तर तो **आक्षेप** घेतलेल्या व्यक्तीस मतदानाची परवानगी देईल, आणि त्यास असे वाटेल की, ते **आक्षेप** सिध्द झालेले आहे तर त्यास **आक्षेप** घेतलेल्या व्यक्तीस मतदान करण्यास मनाई करता येईल.
- मतदान केंद्राध्यक्षाच्या मते **आक्षेप** शुल्लक स्वरुपाचा असेल किंवा सदभावनापुर्वक दिलेले नसेल तर, अनामत रक्कम निवडणूक निधी म्हणून जप्त करेल, आणि इतर कोणत्याही बाबतीत ती चौकशी करुन **आक्षेप** देणाऱ्या व्यक्तीस ती परत करील.
- सायंकाळी मतदान बंद झाल्यानंतर **आक्षेपीत** मतांची यादी, पावती पुस्तक, व जप्त केलेली अनामत रक्कम (असल्यास) त्यासाठी निश्चित केलेल्या लिफाफा क्रमांक ०२ - **आक्षेपीत** मतांच्या यादी या स्वंतत्र लिफाफ्यात मोहोरबंद करेल.

## ९.१४ अंध किंवा अपंग मतदारांच्या मतांची नोंदणी (नियम ४६)

- अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगतेमुळे एखाद्या मतदारास मतपत्रिकेवरील निशाण्या ओळखणे अशक्य आहे किंवा सहाय्याशिवाय मतपत्रिकेवर खूण करणे अशक्य आहे याविषयी मतदान केंद्राध्यक्षांची खात्री पटली असेल तर, त्या मतदारास त्यांच्या इच्छेनुसार मतपत्रिकेवर मत नोंदविण्यासाठी आणि मतपत्रिकेची घडी करुन मतपत्रिका मतदान पेटीत टाकण्यासाठी ज्याचे वय १८ वर्षाहून कमी नाही असा एखादा सोबती मतदान कक्षात त्याच्याबरोबर देण्यास केंद्राध्यक्ष परवानगी देईल.
- परंतु कोणत्याही व्यक्तीस एकाहून अधिक मतदारांचा सोबती म्हणून त्याच दिवशी काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
- तत्पूर्वी सोबत्याकडून नोंदविलेले मत गुप्त ठेवील व दुसऱ्या एखाद्या मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही, असे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात करुन घेण्यात येईल.( नमुना ई - १२)
- केद्रांध्यक्ष अशा अंध व अपंग मतदाराची नोंद त्या प्रयोजनासाठी दिलेल्या विहित नमुन्यात ठेवील. ( नमुना ई - १३)
- मतदान संपल्यानंतर अंध व अपंग मतदाराची यादी व त्यांचे प्रतिज्ञापत्र लिफाफा क्र. ------- मध्ये मोहोरबंद करेल.

## ९.१५ खराब झालेल्या व परत केलेल्या मतपत्रिका (नियम ४७):-

- एखाद्या मतदाराकडून अनावधानाने आपली मतपत्रिका सोयीस्करपणे वापरता येणार नाही इतकी खराब झाली असेल तर त्यास ती केंद्राध्यक्षाकडे परत करता येईल आणि सदर बाब अनावधानाने घडल्याबद्दल केंद्राध्यक्षाची खात्री पटल्यावर त्यास दुसरी मतपत्रिका देईल. अशा परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष हे "खराब झालेली / रद्द केलेली मतपत्रिका" असा मजकूर लिहिल.
- अशा खराब झालेल्या / रद्द केलेल्या मतपत्रिकांची नोंद मतपत्रिकांच्या हिशोबात लिहिण्यात येईल व अशा मतपत्रिका लिफाफा क्रमांक ----- मध्ये मोहोरबंद करण्यात येतील.

## ९.१६ दुबार नोंदलेली मते (नियम ४८)

- आपण अमुक एक मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करुन गेल्यानंतर, जर दुसरी एखादी व्यक्ती आपण तोच विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर त्या व्यक्तीस स्वत:ची ओळख पटवून देण्यासंबंधात, मतदान केंद्राध्यक्ष प्रश्न विचारील, अशा प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर, त्यास इतर कोणत्याही मतदाराप्रमाणे मतपत्रिकेवर खुण (मतदान) करण्याचा हक्क राहील.
- अशी व्यक्ती दुबार नोंदलेली मतपत्रिका मिळण्यापूर्वी, दुबार नोंदलेल्या मतांच्या यादीतील सूचीत तिच्यासबंधात असलेल्या नोंदी समोर स्वत:ची सही करील. (नमुना ई - १४)
- दुबार मतपत्रिका ही मतदान केंद्रावर उपयोगात आणण्यासाठी देण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठयातील शेवटच्या क्रमांकाची असेल.

- अशा मतपत्रिकेच्या मागच्या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षाने दुबार नोंदलेल्या मतपत्रिका असे स्वत: लिहुन त्यावर स्वत:ची सही केलेली असेल.
- दुबार नोंदलेल्या मतपत्रिकेवर मतदान कक्षात जाऊन खुण केल्यावर मतपत्रिकेची घडी घालुन, मतदार ती मतपत्रिका, मतदान पेटी न टाकता मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल व मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्यासाठी राखून ठेवलेल्या लिफाफ्यात मोहोबंद करेल. (लिफाफा क्रमांक -----)

## ९.१७ मतदान बंद करणे (नियम ४९)

- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रमाव्दारे मतदानासाठी मंजूरी दिलेल्या दिनांकास, वेळ निश्चित करुन दिलेली असते. त्यामुळे सायंकाळी निश्चित केलेल्या वेळेत केंद्राध्यक्ष मतदान बंद करील आणि त्यानंतर कोणाही मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.
- परंतु मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी तेथे असलेल्या सर्व मतदारांना रांगेत उभे करुन रांगेतील शेवटच्या मतदारापासुन १, २, ३, ४, ५.. अशा उलट्या क्रमाने चिठ्या रांगेतील मतदारांना देण्यात येतील आणि अशा सर्व मतदारांचे मतदान होई पावेतो मतदान केंद्र बंद करणार नाही. अशा सर्व मतदारांना मतदान करु देण्यात येईल.
- मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता कि नाही असा प्रश्न उद्भवल्यास त्या बाबतीत मतदान केंद्राध्यक्ष निर्णय घेईल आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल.

## ९.१८ मतपेटी मोहोरबंद करणे (नियम ५०)

- मतदान बंद झाल्यानंतर व्यवहार्य होईल तितक्या लवकर मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही उमेदवारांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत मतपेटीची फट बंद करील आणि तो ती फट मोहोरबंद करील तत्पूर्वी अशा कागदी मोहोरवर मतदान प्रतिनिधीलाही त्यांची स्वाक्षरी करण्यास परवानगी देईल.
- त्यानंतर मतपेटीस कापडी टेपने चारही बाजुने बांधुन कापडी टेप मोहोरबंद करण्यात येईल,
- त्यानंतर मतपेटी कापडी पिशवीत ठेवण्यात येईल व कापडी पिशवी देखील सुई दोऱ्याने शिवून मोहोरबंद करण्यात येईल.
- कापडी पिशवी ओळखण्यासाठी कापडी पिशवीवर संस्थेचे नांव, मतदान केंद्र क्रमांक व मतदानाचे ठिकाण इत्यादी तपशिल मार्करने स्पष्टपणे नमुद करील.
- पहिली मतपेटी भरल्यामुळे दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करणे भाग पडले तर दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करण्यापूर्वी प्रथम पहिली मतपेटी वर नमुद कार्यपध्दती प्रमाणे मोहोरबंद करुन सुरक्षित ठेवण्यात येईल. त्यानंतर दुसरी मतपेटी विहित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे मतदानासाठी तयार करण्यात येईल.

## मतपेटी मोहोरबंद करणेबाबतचा नमुना

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव :- | |
| निवडणूक दिनांक :- | |
| मतदान केंद्र क्रमांक :- | |
| मतदार संख्या :- क्र.१ ---- ते ------ | |
| केंद्राध्यक्षाचे नाव :- | स्वाक्षरी/ दिनांक/वेळ |
| उमेदवाराचे नाव :- | स्वाक्षरी/ दिनांक/वेळ |
| प्रतिनिधीचे नाव :- | स्वाक्षरी/दिनांक/वेळ |

## ९.१९ मतपत्रिकांचा हिशोब (नियम ५१)

- मतदान संपल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष मतपत्रिकांच्या हिशोबाची नोंद विहित नमुन्यात करेल, व तो नमुना त्यासाठी निश्चित करुन दिलेल्या लिफाफ्यात मोहोरबंद करेल. (नमुना ई - १५)
- एखाद्या मतदान प्रतिनिधीची मतपत्रिकांच्या हिशोबात केलेल्या नोंदीची सत्यप्रत घेण्याची इच्छा असेल तर मतदान केंद्राध्यक्ष त्याला ती पुरवेल.
- तसेच मतपत्रिकांच्या हिशोबाची एक खुली प्रत व मतदानाची टक्केवारी विहित नमुन्यात मतदान साहित्य जमा करताना निवडणूक कक्षाकडे सुपूर्द करेल.

## ९.२० पाकिटे मोहोरबंद करणे (नियम ५२)

मतदान संपल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष खालील प्रमाणे लिफाफे तयार करुन ते मतपेटीसोबत निवडणूक कक्षाकडे सुपूर्द करेल.

१) मतपत्रिकांचा हिशोब -
२) मतपेटीची चावी -
३) दुबार नोंदलेल्या मतपत्रिका आणि दुबार नोंदलेल्या मतपत्रिकांची यादी -
४) आक्षेपीत मतांची यादी -
५) मतदार नोंदवही (वोटर रजिष्टर) -
६) चिन्हांकित मतदार यादी -
७) चिन्हांकित नसलेली मतदार यादी -
८) वापरलेल्या मतपत्रिकांच्या स्थळप्रती -
९) न वापरलेल्या को-या मतपत्रिका -
१०) रद्द केलेल्या व खराब झालेल्या मतपत्रिका -
११) मतपेटी मोहोरबंद करण्यापुर्वी केंद्राध्यक्षांनी केलेले घोषणापत्र -
१२) मतदान बंद करतांना केंद्राध्यक्षांनी केलेले घोषणापत्र -

## ९.२१ मतपेटी व साहित्य निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सुपूर्द करणे (नियम ५३)

- मतदान संपल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष वर नमुद केलेल्या कार्यपध्दती प्रमाणे मतपेटी व लिफाफे मोहोरबंद करेल.
- त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केलेल्या वाहनातूनच मतपेटी व साहित्य निश्चित केलेल्या ठिकाणी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे सुपूर्द करेल.
- निश्चित करुन दिलेल्या ठिकाणी मतपेटी सुरक्षितपणे पोहोचविण्याची जबाबदारी मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांची व्यक्तीशः व सामुदायिक राहील.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेले वाहन मतदान केंद्रावर पोहोचेपर्यंत केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी / कर्मचारी कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्र सोडणार नाही.
- कोणत्याही परिस्थितीत स्वत:च्या वाहनातून, खाजगी वाहनातुन अथवा अन्य प्रकारे मतपेटी व साहित्य आणणार नाही.

वरील प्रमाणे निवडणुकीचे कामकाज सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी पार पाडावे,

## गोडाऊन सिलबंद करण्या बाबतचा नमुना

| | |
|---|---|
| मतपेटी ठेवलेल्या गोडाऊनचे नाव व पत्ता :- | |
| संस्थेचे नाव :- | |
| मतदान केंद्र क्रमांक : .... पासून ....... पर्यंत | |
| निवडणुक निर्णय अधिकारी यांचे नाव :- | स्वाक्षरी/ दिनांक/ वेळ |
| उमेदवाराचे नाव :- | स्वाक्षरी/ दिनांक/ वेळ |
| प्रतिनिधीचे नाव :- | स्वाक्षरी/ दिनांक/ वेळ |

## ९.२२ मतपेट्या नष्ट इत्यादी झाल्यास नव्याने मतदान घेणे. (नियम ५४)

(१) जर एखाद्या निवडणुकीच्या वेळी ,-

(अ) एखाद्या मतदान केंद्रावर उपयोगात आणलेली कोणतीही मतपेटी, मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अभिरक्षेतून बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ करण्यात आली किंवा त्या मतदान केंद्रावर निकाल निश्चित ठरवणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तीत ढवळाढवळ करण्यात आली; किंवा

(ब) जिच्यामूळे मतदानावर अनिष्ट परिणाम घडण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्यता कार्यपद्धतीत घडली

तर निवडणूक निर्णय अधिकारी ती गोष्ट जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना ताबडतोब कळवील.

(२) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी असा अहवाल मिळाल्यावर वर उल्लेखिलेली परिस्थिती स्वत: विचारात घेवून आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सामान्य अथवा विशेष आदेशाव्दारे ,

(अ) एकतर त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर नव्याने निवडणूक घेण्यासाठी एखादा दिवस नेमील आणि वेळ निश्चित करील. त्यास योग्य वाटेल अशा रीतीने नेमलेला दिवस व निश्चित केलेली वेळ अधिसूचित करील, किंवा

(ब) त्या मतदान केंद्रावर नव्याने घेतलेल्या मतदानाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही किंवा कार्यपद्धतीमधील चूक किंवा नियमबाह्यता महत्वाची नाही याबद्दल खात्री झाल्यास, तो निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास निवडणुकीसाठी त्यास योग्य वाटतील असे निदेश देईल किंवा कार्यवाही करील.

(३) या अधिनियमाचे किंवा त्या अन्वये केलेले नियम किंवा उपविधी हे मूळ मतदानास ज्याप्रमाणे लागू होतात, त्याप्रमाणे अशा प्रत्येक मतदानाला लागू होतील.

*********

# १०. मतमोजणी / फेर मतमोजणी

निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी आणि त्याचे मतमोजणी प्रतिनिधी यांस मतमोजणीच्या वेळी उपस्थित रहाण्याचा अधिकार असेल. निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींना मुक्त, नि:पक्ष व पारदर्शक रितीने मतमोजणी प्रक्रिया चालावी म्हणून मुभा देईल.

# मतमोजणीकरीता फलक

रासनिप्रा

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

विभाग /जिल्हा / तालुका नाव :- -------------------------------------------

संस्थेचे नाव :- -------------------------------------------

संस्थेचा पत्ता :--------------------------------------------

-------------------------------------------

मतमोजणी दिनांक. :- / /

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव :- -------------------------------------------

## १०.१ मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी प्रवेश

(१) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी, -

(अ) मतमोजणीत त्याला सहाय्य करण्यासाठी तो नेमणूक करील अशा व्यक्ती ;

(ब) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती ;

(क) निवडणूकीच्या संबंधात कामावर असलेले लोकसेवक ; आणि

(ड) उमेदवार व त्यांचे आणि मतमोजणी प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना प्रवेश देणार नाही.

(२) खंड (अ) अन्वये, निवडणुकीत संस्थेद्वारा कामावर लावण्यात आलेल्या किंवा अन्यथा उमेदवारासाठी काम करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही.

(३) मतमोजणीच्या कोणत्याही विशिष्ट टेबलावरील किंवा टेबलांच्या गटावरील मतमोजणीवर कोणत्या मतमोजणी प्रतिनिधीने किंवा प्रतिनिधींनी लक्ष ठेवावे हे निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील.

(४) मतमोजणीच्या वेळी स्वत: गैरवर्तणूक करणाऱ्या किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, जेथे मतमोजणी चालू असेल त्या जागेतून, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून किंवा कर्तव्य बजावणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा निवडणूक निर्णय अधिकारी या बाबतीत प्राधिकृत करील अशा कोणत्याही व्यक्तीकडून काढून लावण्यात येईल.

## १०.२ मतपेट्यांची छाननी व त्या उघडणे

(१) एका किंवा अधिक मतदान केंद्रात वापरलेल्या मतपेट्या एकाच वेळी उघडून त्यातील मतपत्रिकांची मोजणी करुन घेता येईल.

(२) मतपेटी उघडण्यापूर्वी, मतपेटीवर लावण्यात आली असेल अशी कागदी मोहोर किंवा इतर कोणतीही मोहोर तपासून पाहण्यास व ती जशीच्या तशीच आहे याबद्दल स्वतःची खात्री करुन घेण्यास परवानगी देण्यात येईल.

(३) कोणत्याही मतपेटीत खरोखरच फेरफार करण्यात आलेली नाही याबद्दल स्वत:ची खात्री करुन घेईल. कोणत्याही मतपेटीत अनधिकृत फेरफार करण्यात आलेली आहे याबद्दल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, तो त्या मतपेटीतील मतपत्रिकांची मोजणी करणार नाही आणि त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियम ५४ मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरील.

## १०.३ मतपत्रिकांची छाननी व आक्षेपीत मतपत्रिका बाद करणे

(१) प्रत्येक मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांचे सोयीस्कर असे गठ्ठे करण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल.

(२) (अ) मतपत्रिकेवर, मतदार ओळखणे शक्य होईल अशा प्रकारची कोणतीही खूण किंवा लिखाण असेल,

किंवा

(ब) तीवर मत नोंदविलेले नसेल, किंवा

(क) एकच उमेदवार निवडावयाचा असेल त्यावेळी, त्या मतपत्रिकेवर एकापेक्षा अधिक मतदारांना मते दिली असतील, किंवा

(ड) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडावयाचे असतील त्या वेळी, मतदाराने मतपत्रिकेवर जेवढी मते देण्याचा त्याचा हक्क असेल त्याहून अधिक मते नोंदवलेली असतील, किंवा

(इ) कोणत्या मतदारास मत देण्यात आले आहे याबद्दल शंका निर्माण व्हावी अशा रीतीने मतपत्रिकेवरील मत दर्शवणारी खूण केलेली असेल, किंवा

(फ) ती मतपत्रिका बनावट असेल, किंवा

(ग) ती मतपत्रिका खरीखुरी मतपत्रिका म्हणून ओळखता येणार नाही इतकी खराब झाली असेल किंवा छिन्नविछिन्न झाली असेल, किंवा

(ह) त्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक किंवा तिचे स्वरुप हे, मतदान केंद्रावर वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकेच्या अनुक्रमांकापेक्षा किंवा, यथास्थित, स्वरुपापेक्षा भिन्न असेल, किंवा

(आय) नियम ४३ च्या उपनियम (३) च्या तरतूदीन्वये मतपत्रिकेवर असावयास हवी अशी खूण तीवर नसेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती मतपत्रिका बाद ठरवील:

(अ) खंड (ह) किंवा (आय) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असणारा कोणताही दोष हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी यांच्या कोणत्याही चुकीमुळे किंवा कसुरीमुळे निर्माण झाला आहे याविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, केवळ अशा दोषाच्या कारणास्तव ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येणार नाही ;

(ब) दिलेले मत हे विशिष्ट उमेदवारासाठीच आहे हा हेतू मतपत्रिकेवर केलेल्या खुणेमुळे स्पष्ट होत असेल तर, मत दर्शवणारी खूण ही अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा केली आहे, केवळ याच कारणास्वत ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येणार नाही.

(३) मतपत्रिका बाद ठरविण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असलेल्या प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस मतपत्रिका तपासण्याची वाजवी संधी देईल.

(४) बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर निवडणूक निर्णय अधिकारी 'बाद' अशी अक्षरे लिहील आणि स्वत:च्या हाताने किंवा रबरी ठशाच्या सहाय्याने बाद केल्याची कारणे मतपत्रिकेच्या मागील बाजुस संक्षिप्तपणे नमूद करील.

(५) बाद केलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठयात एकत्रितपणे एकत्रीत करण्यात येतील.




## १०.४ मतमोजणीची कार्यपद्धती

(१) नियम ५८ अन्वये बाद करण्यात न आलेली प्रत्येक मतपत्रिका एक वैध मत म्हणून मोजण्यात येईल.

परंतु, दुबार नोंदलेल्या (प्रदत्त) मतपत्रिका असलेला लिफाफा उघडला जाणार नाही आणि अशा मतपत्रिकेची मोजणी केली जाणार नाही.

(२) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना ई-१६ मधील निकालपत्रकात नोंद करील आणि तपशील जाहीर करील.

(३) वैध मतपत्रिकांचा नंतर एकत्रित गठ्ठा करण्यात येईल आणि बाद मतपत्रिकांच्या गठ्याबरोबरच तो एका वेगळया पाकिटात ठेवण्यात येईल. ते पाकिट मोहोर लावून बंद करण्यात येऊन त्यावर पुढील तपशील नमूद करण्यात येईल:-

(अ) मतदारसंघाचे नाव ;

(ब) ज्या मतदान केंद्रावर मतपत्रिकांचा उपयोग करण्यात आला त्या केंद्राचा तपशील, आणि

(क) मतमोजणीची तारीख.

## १०.५ मतमोजणी सतत चालू ठेवणे

व्यवहार्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील मतमोजणी तहकूब करावी लागणार असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणूकीच्या संबंधातील इतर कागद, मोहोर बंद करील आणि मध्यंतरामध्ये ते अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी खबरदारी घेण्याची व्यवस्था करील.

## १०.६ स्वतंत्र मतदारसंघ नसतील किंवा एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील अशा बाबतीतील मतमोजणीची कार्यपद्धती

उप विधीमध्ये व्याख्या केलेले मतदारसंघ नसतील अशा बाबतीत किंवा एका मतदारसंघासाठी उपविधीमध्ये एकापेक्षा अधिक जागा देण्यात आल्या असतील अशा बाबतीत या जागासंबंधीच्या मतांची मोजणी पुढील रीतीने करण्यात येईल:

(१) मतांची मोजणी निवडणुक निर्णय अधिकारी मतमोजणीत सहाय्य करण्यासाठी नियुक्त करेल अशा व्यक्तीच्या सहाय्याने निवडणुक निर्णय अधिका-या कडुन आणि त्याच्या परिवेक्षणाखाली करण्यात येईल .

(२) प्रत्येक मतपेटी उघडल्यानंतर अवैध व संशयास्पद मतपत्रिकांतून स्पष्टपणे वैध असलेल्या मतपत्रिका वेगळया करण्यात याव्यात. अवैध व संशयास्पद मतपत्रिका निर्णयासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करण्यात येतील. त्यानंतर वैध मतपत्रिका मतमोजणीस घेण्यात येतील आणि मतमोजणीत सहाय्य करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींच्या मदतीने प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने नोंदलेली मते मोजण्यात येतील.

(३) **उपस्थित असलेल्या उमेदावारांना आणि त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींना, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मते "बाद" करण्यास पात्र असतील अशा सर्व मतपत्रिकांची तपासणी करण्याची वाजवी संधी देईल. पंरतु त्यांना त्या किंवा इतर कोणत्याही मतपत्रिका हाताळता येणार नाहीत.** बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर 'बाद' असे पृष्ठांकित करील. कोणताही उमेदवार किंवा त्याचा मतमोजणी प्रतिनिधी बाद केल्याच्या निर्णयाच्या अचूकतेबद्दल प्रश्न उपस्थित करील तर, निवडणूक निर्णय अधिकारी अशा मतपत्रिकेवर ती बाद केल्याचे कारणही थोडक्यात नमूद करील.

(४) सर्व मतपेटयातील सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, मोजणी केलेल्या आणि बाद केलेल्या मतपत्रिकांच्या प्रत्येक पाकिटावर वर्णन पृष्ठांकित करुन त्या मतपत्रिका वेगवेगळया पाकिटात मोहोरबंद करण्याची व्यवस्था करील.

(५) व्यवहार्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील आणि मतमोजणी तहकूब करावी लागली असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणुकीच्या संबंधातील कागद, स्वत:ची मोहोर लावून उमेदवारांची किंवा मतमोजणी प्रतिनिधींची मोहोर लावून मोहोरबंद करील आणि मध्यंतरामध्ये ते सुरक्षित अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी सावधगिरी बाळगण्याची व्यवस्था करील.

(६) सर्व मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमधील मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करणारे एक एकत्रीत विवरणपत्र तयार करील.

## १०.७ नव्याने मतदान घेण्यात आल्यानंतर मतमोजणीस पुन्हा सुरुवात करणे

(१) नियम ५४ अन्वये नव्याने मतदान घेण्यात आल्यास, ते मतदान पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, त्याने त्याबाबतीत निश्चित केलेल्या तारखेस, वेळेस व त्या ठिकाणी मतमोजणीस पुन्हा सुरूवात करील आणि त्याबद्दल उमेदवारांना पूर्वीच सूचना देण्यात आलेली असेल.

(२) नियम ५८ आणि ५९ च्या तरतूदी शक्य असतील तेथवर अशा नंतरच्या मतमोजणीस लागू होतील.

## **१०.८ मतांची फेरमोजणी**

**(१)** मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, नमुना ई-१६ मधील निकाल पत्रकात प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करील आणि ती घोषित करील.

परंतु, राखीव किंवा बिनराखीव जागांवरील कोणत्याही उमेदवारांना सारखी मते पडली आहेत आणि कोणताही एक उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यासाठी एका ज्यादा मताची आवशकता आहे असे आढळून येईल तेव्हा कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना असे ज्यादा मत देण्यात आल्याचे समजण्यात येईल याची निश्चिती , उपस्थित राहण्याची ज्यांची इच्छा असेल असे उमेदवार यांच्या उपस्थितीत चिठठया काढून, करण्यात येईल.

(२) असे जाहीर करण्यात आल्यानंतर, उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, फेर मतमोजणीची मागणी तो का करीत आहे याची कारणे नमूद करून, अगोदर मोजणी केलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा अनामत रक्कमेसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करता येईल.

(३) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, त्या बाबतीत निर्णय देईल आणि त्यास, तो अर्ज संपूर्णत: किंवा अंशत: मान्य करता येईल किंवा असा अर्ज क्षुल्लक किंवा गैरवाजवी आहे असे त्यास दिसून आल्यास, तो पूर्णत: फेटाळता येईल.

(४) उपनियम (३) खालील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा प्रत्येक निर्णय लेखी असेल आणि त्याची कारणेही त्यात नमूद केलेली असतील.

(५) उपनियम (३) अन्वये अर्जास संपूर्णत: किंवा अंशत: मान्यता देण्याचे ठरवील तर तो-

(अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची फेरमोजणी करील;

(ब) अशा फेरमोजणीनंतर, नमुना ई-१६ मधील निकालपत्रकात आवश्यक त्या मर्यादेपर्यंत सुधारणा करील; आणि

(क) त्याने केलेली सुधारणा जाहीर करील.

(६) प्रत्येक मतदाराला देण्यात आलेल्या एकूण मतांची संख्या पोटनियम (१) किंवा पोटनियम (५) अन्वये जाहीर करण्यात आल्यानंतर, नमुना ई-१६ मधील निकालपत्रक पूर्ण करुन त्यावर स्वाक्षरी करील आणि त्यांनतर फेरमोजणीसाठी कोणताही अर्ज स्वीकारण्यात येणार नाही :

परंतु, मतमोजणी पूर्ण झाली असेल त्या वेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांनी फेरमोजणी मागणी केल्यास अथवा त्याबाबत संधी देईपर्यंत ई-१६ मधील निकालपत्र पुर्ण करता कामा नये.

********

# ११ . निवडणुक निकालाची घोषणा व प्रसिध्दी (नियम ६४)

निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीनंतर ज्याला सर्वात अधिक वैध मते देण्यात आली असतील असा उमेदवार निवडून आला असल्याचे घोषित करील आणि नमुना ई-१७ शक्य  तितक्या लवकर विवरणाच्या सही केलेल्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे  पाठवील. असे घोषणापत्र मिळाल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, समितीच्या सर्व निर्वाचित सदस्यांची नावे  प्रसिध्द करील व संस्था व निबंधकाला पाठविल . अशी यादी प्राप्त झाल्यावर अधिनियमाचे कलम ७३ अअअ चे उपकलम ५ प्रमाणे निबंधक न चुकता समिती गठीत करण्याची आवश्यक कार्यवाही करेल.  आणि त्यांचे कायमचे पत्ते व ज्या मतदार संघातून ते निवडून आले असतील त्या मतदारसंघांची नावे यासहीत त्यांच्या नावांची सूची त्याच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करील आणि संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यासाठी एक प्रत पाठवील.

- नियम ३२ व नियम ६४ मधील तरतुदीनुसार बिनविरोध व मतदान झालेल्या निवडणूकीचा निकाल अनुक्रमे “ई” ९ व “ई” १७ नमुन्यात निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहिर करणे आवश्यक.
- निवडणूक निकाल जाहिर केल्यानंतर २ दिवसांच्या आत निवडणूक निकाल जिल्हा/ प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक.
- निवडणूक नियम ३२ अन्वये बिनविरोध निवडणूक निकाल ई -९ मध्ये नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याच्या अंतिम दिनांकालगतच्या दिवशी घोषित करणे आवश्यक .
- नियम ७५ (४) (क) अन्वये तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांनी निवडणुक निकाल मिळाल्यापासुन ३ दिवसाचे आत अधिसुचना जाहीर करुन पुढील १० दिवसाचे आत पदाधिकारी निवडणुक प्रक्रिया पुर्ण करणेबाबत निर्देशीत करेल.

*******

# १२. अनामत रकमा परत करणे किंवा जप्त करणेबाबत (नियम ७०)

१. नियम २३ अन्वये ठेवलेली अनामत रक्कम, एक तर ती ठेवणा-या व्यक्तीला अथवा तिच्या वैध प्रतिनिधीला, वारसाला परत करण्यात येईल

२. नियमात ज्या प्रकरणांचा उल्लेख करण्यात आला आहे त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

३. जर निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत उमेदवारांचे नाव नसेल अथवा मतदान सुरू होण्याअगोदर तो मरण पावला असेल तर, त्याची अनामत रक्कम, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, परत करण्यात येईल.

४. मतदान झाले असेल त्या निवडणुकीत जर उमेदवार निवडून आला नसेल व त्याला पडलेल्या वैध मतांची संख्या, सर्व उमेदवारांना पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, अथवा निवडणुकीत एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून येतील त्याबाबतीत पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येला निवडावयाच्या उमेदवाराच्या संख्येने भागल्यानंतर ती एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, त्याची अनामत रक्कम जप्त होईल.

५. उमेदवारी अर्ज माघारी घेणाऱ्या नामनिर्देशीत व्यक्तीस उमेदवारी अर्ज माघारी घेतल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत अनामत रक्कम परत करणे अनिवार्य.

६. उमेदवारास निवडणुकीत आवश्यक मते मिळालेली नसल्यास अशा उमेदवाराची अनामत रक्कम जप्त करून प्राधिकरणाच्या बँक खात्यावर जमा करणे आवश्यक.

*********

# १३. उमेदवार खर्चांचे लेख्यांचे सनियंत्रण व तरतूदी

(१) नियम ६५ अन्वये उमेदवाराकडून अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून ठेवण्यात यावयाच्या निवडणुक विषयक खर्चाच्या हिशेबात, दिवसागणिक होणा-या खर्चाच्या प्रत्येक बाबीसंबंधातील पुढील तपशील अंतर्भूत असेल.

(अ) ज्या दिनांकाला खर्च करण्यात आला अथवा त्यास परवानगी देण्यात आली तो दिनांक;

(ब) खर्चाचे स्वरूप (उदा. प्रवास खर्च, टपाल खर्च किंवा मुद्रण खर्च व तत्सम खर्च);

(क) खर्चाची रक्कम (एक), दिलेली रक्कम (२), अदत्त रक्कम;

(ड) प्रदानाचा दिनांक;

(ई) आदात्याचे नाव व पत्ता;

(फ) रक्कम दिली असेल तर, प्रमाणकाचा अनुक्रमांक;

(ग) कोणतीही रक्कम अदत्त असेल, तर बिलांचे (प्रमाणकाचा) अनुक्रमांक ;

(ह) अदत्त रक्कम जिला देय असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता ;

(२) खर्चाच्या हिशोबासह सर्व प्रमाणके दाखल करण्यात येतील व ती, प्रदानाच्या तारखेनुसार लावण्यात येतील व उमेदवार व प्रतिनिधी यांच्याकडून त्यावर अनुक्रमांक घालण्यात येईल आणि असे अनुक्रमांक, पोटनियम (१) ची बाब (फ) खाली हिशेबात नमूद करण्यात येतील.

(३) ज्याकरीता प्रमाणके मिळविण्यात आली नसतील अशा पोटनियम (१) च्या बाब (क) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या खर्चाच्या बाबीसंबंधात त्याचा तपशील देणे आवश्यक असणार नाही.निवडणुकीतील प्रत्येक उमेदवार स्वत: किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, निवडणूक घेण्याच्या आदेशाचा दिनांक व तिच्या निकालाचा दिनांक या दोन्ही दिनांक धरून त्या दिनांका दरम्यानच्या कालावधीमध्ये निवडणूकीच्या संबंधात त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या संपूर्ण खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशोब ठेवील.

(२) या लेख्यात नियम ६७ मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असेल.

(३) उपरोक्त खर्चाची एकूण बेरीज ही, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने सहकारी संस्थानिहाय उमेदवारांच्या निवडणूक खर्चाकरीता अधिसूचित केलेल्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

(४) उमेदवार त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशोब नियम-६७ मध्ये ठरवून दिलेल्या रीतीने व मुदतीत **(निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे कालावधीच्या आत)** निवडणूक निर्णय अधिका-यामार्फत जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे सादर करील. याबाबत प्राधिकरणाने जा क्र. १५७० दि. २०/५/२०२० अन्वये अधिसुचना निर्गमीत केलेली आहे.

(५) जर जिल्हा / तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याची अशी खात्री होईल की, एखादया व्यक्तीने -

अ) आवश्यक असेल अशा मुदतीत व रीतीने निवडणुक खर्चाचा हिशोब सादर करण्यात कसूर केला आहे ; आणि

ब) अशा कसुरी बद्दल उक्त व्यक्तीपाशी कोणतीही उचित किंवा समर्थनीय कारणे नाहीत, तर जिल्हा /तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी संबंधीत सहकारी संस्थेच्या निबंधकाना अहवाल सादर करील आणि असा अहवाल प्राप्त झाल्यावर संबधीत निबंधक बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्याला योग्य वाटेल अशा इतर रीतीने, तिला अनर्ह घोषित करील आणि अशी कोणतीही व्यक्ती, निवडून येण्यासाठी अथवा कोणत्याही सहकारी संस्थेचा सदस्य म्हणून चालू राहण्यासाठी त्या आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षे मुदतीपर्यंत अनर्ह ठरेल.

नियम ६५ अन्वये उमेदवाराकडून निवडणूक विषयक खर्चाचा हिशोब सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन दिवसात, त्याच्या सूचना फलकावर नोटीस लावण्याची व्यवस्था करील, तीमध्ये-

(अ) ज्या दिनांकाला हिशोब सादर करण्यात आला तो दिनांक -

(ब) उमेदवाराचे नाव; आणि

(क) ज्या ठिकाणी अशा हिशोबाचे निरीक्षण करता येईल, ते ठिकाण व वेळ निर्दिष्ट करण्यात येईल.

********

# १४.     निवडणूक निधीचे व्यवस्थापन

प्रत्येक उमेदवाराने निवडणूकीच्या निकालाच्या दिनांकापासून ६० दिवसाचे कालावधीचे आत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक.

- जे उमेदवार ६० दिवसात खर्चाचा हिशोब सादर करणार नाहीत अशा उमेदवारांना पुढील तीन वर्षाकरीता अपात्र ठरवण्याचे अधिकार संस्थेच्या निबंधकास प्राप्त.
- सदर बाबीची खात्री करुन प्रस्ताव जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडून संस्थेच्या निबंधकास सादर होणे आवश्यक.
- निवडणूक निकाल घोषित झाल्यापासून दोन महिन्याच्या आत निवडणूक खर्चाचा हिशोब पुर्ण होणे अनिवार्य.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचा परिपुर्ण प्रस्ताव दाखल करणे अनिवार्य.
- निवडणूक खर्चाच्या प्रस्तावासोबत नमुना १ ते २१,  नमुना १ ते २८ व नमुना १ ते ३१ मधील परिपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य.
- निवडणूक खर्चाच्या प्रस्तावासोबत जोडलेली देयके साक्षांकीत करणे आवश्यक.
- प्राधिकरणाने बाबवार खर्चाची कमाल मर्यादा निर्धारीत केलेली असून जादा खर्च झालेला असल्यास कमाल मर्यादेपेक्षा वाढीव खर्च मंजूरीचा प्रस्ताव प्राधिकरणास मंजूरीकरीता सादर करणे आवश्यक.
- निवडणूक खर्च कमाल खर्चाच्या मर्यादेमध्ये झालेला असल्यास खर्चाचा प्रस्ताव जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक.
- प्राधिकरणाकडील जा क १६८८ दि. १६/०६/२०२० मधील परिपत्रकान्वये निवडणुक निधीचे अंदाज घेवुन निवडणुक निधीची मागणी संस्थेकडे करावी.

********

# १५. पदाधिकारी निवड

- **निवडणूक दिनांक, समितीचा कालावधी व पदाधिकारी निवड**

- निवडणूक दिनांक म्हणजे ज्या दिवशी संस्थेच्या निवडणूकीचा निकाल जाहिर करण्यात आला तो दिवस.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल २ दिवसांच्या आत जिल्हा / तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांना सादर करणे आवश्यक. त्यांनी ०३ दिवसात अधिसुचना प्रसिध्द करुन पुढील १० दिवसात पदाधिकारी निवड करणेबाबत निवडणूक निर्णय अधिका-यांना कळवावे.
- निवडणूकीचा निकाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा / तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांनी नवनिर्वाचित समिती सदस्यांची नावे निवडणूक नियम ६९ नुसार जाहिर करणे अनिवार्य.
- तद्नंतर निवडणूक नियम ६९ (२) (ii) व कलम ७३ अअअ (५) अन्वये निबंधकाने व्यवस्थापन समिती गठन करणेबाबत ७ दिवसांच्या आत पुढील यथोचित कार्यवाही करणे आवश्यक.
- निवडणूक नियम ७७ अन्वये तसेच उप-विधींमध्ये तरतूद केल्याप्रमाणे समिती सदस्यांची निवड झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत पदाधिकाऱ्यांची निवड करणे आवश्यक.
- उपविधीतील तरतूदीप्रमाणे “पदाधिकारी निवड” या एकाच विषयाकरीता निवडणूक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांनी नोटिस निर्गमित करुन सभेचे आयोजन करावे. विषय पत्रिकेत निवडणूक कार्यक्रम नमूद करावा.
- नोटीस निर्गमित केल्याच्या दिवशी अथवा लगतच्या दिवशीच पदाधिकारी निवडीकरीता संचालकमंडळ सभेची नोटीस समिती सदस्यांना RPAD पत्राने हस्तपोहोच Email/Whatsapp इत्यादीद्वारे पोहोच करावे.
- सभेस नवनिर्वाचित / निर्वाचीत संचालक, निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांचे सहाय्यक व सदर सभेकरिता उपविधीप्रमाणे संस्थेचे अधिकारी उपस्थित असतील.
- निवडणूकीतील चुरस पदाधिकारी निवडीचा संस्थेचा पुर्वइतिहास इत्यादी बाबी लक्षात घेऊन आवश्यकतेप्रमाणे पोलीस बंदोबस्त/ व्हिडीओ शुटींगचे नियोजन करावे.
- सभेची गणपुर्ती झाली असल्यास, उपस्थितांची स्वाक्षरी घेऊन कामकाज सुरु करावे. तत्पुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी (सभेचे अध्यासी अधिकारी ) याने समिती सभा इतिवृत्त पुस्तक / नोंदवही ताब्यात घेतलेली असावी.
- पदाधिकारी निवडीकरीता मतदान घेण्याची आवश्यकता असल्यास गुप्त मतदान पध्दतीने पदाधिकारी निवडीची प्रक्रिया पुर्ण करावी. जर निवडुन दयावयाचे जागेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास प्राप्त अर्जांवर आक्षेप प्राप्त झाल्यास संक्षिप्त चौकशी करुन निर्णय पारीत करावे. मतदानानंतर मतमोजणी करुन निकाल जाहीर करावा. तद्नंतर इतिवृत्त लिहून त्याची प्रत जिल्हा / तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांना सादर करावे.
- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३-अअअ (३) मधील तरतूदीप्रमाणे निवडणूकीचे निकालाचे दिनांकापासुन समितीचा कालावधी ५ वर्षे असेल.
- पदाधिकारी निवड करणेबाबत प्राधिकरणाने जा क्र. १४४७ दि. १९/३/२०२० अन्वये आदेश जारी केलेले आहे.

*********

# १६. निवडणूकीसंबधीचे विवाद

- **निवडणूक विषयक विवाद (नियम ७८)**

- निवडणूकविषयक विवाद मा. सहकार न्यायालयात दाखल करण्याची संस्थेच्या सभासदांना मुभा.
- निवडणूकीसारख्या संवेदनशील कामकाजात कसुर केल्यास निवडणूक प्रक्रियेशी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त.
- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ मध्ये घालून दिल्याप्रमाणे, सहकारी न्यायालयाकडे विनंती अर्ज सादर करुन असेल त्याखेरीजकरुन, सहकारी संस्थेच्या कोणत्याही निवडणुकीस आव्हान देता येणार नाही.

**********

# १७. भ्रष्टाचार आणि निवडणूक विषयक अपराध (नियम ७९)

- उमेदवारी किंवा मतदानाकरीता प्रवृत्त करण्यासाठी एखादया सभासदास बक्षिस / देणगी / परितोष देणे किंवा देण्याचे अभिवचन.
- मतदानाबाबत गैरवाजवी दडपण आणणे.
- निवडणूकीत वाहन किंवा गलबताचा वापर मतदारांना मोफत ने-आण करण्यासाठी करणे.
- निवडणूक प्रयोजनार्थ संस्थेच्या मालकीच्या वाहनांचा वापर करणे.
- निवडणूक कार्यक्रम घोषणेचा दिनांक आणि निवडणुकीच्या निकालाचा दिनांक या दरम्यानच्या काळात कोणत्याही मतदारास किंवा मतदारांच्या गटास विशेष आगाऊ कर्जे देणे.

*********

# १८. निवडणूकीच्या संबंधातील भ्रष्टाचार / अपराध आणि त्याची शास्त

या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी भ्रष्टाचार असल्याचे समजण्यात येईल.

१) लाचलुपत म्हणजे उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे,-

- निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याविषयी किंवा उभे न राहण्याविषयी किंवा निवडणूकीतून उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा उमेदवारी मागे न घेण्याविषयी एखाद्या व्यक्तीस प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने; किंवा
- निवडणूकीत मते देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी एखाद्या मतदारास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने; किंवा
- एखाद्या व्यक्तीस निवडणूकीत अशा प्रकारे उभे राहिल्याबद्दल किंवा न राहिल्याबद्दल किंवा आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल किंवा मागे न घेतल्याबद्दल; किंवा
- एखाद्या मतदारास मत दिल्याबद्दल किंवा मत न दिल्याबद्दल बक्षिस म्हणून, कोणतीही देणगी देणे, देऊ करणे किंवा कोणतेही परितोष देण्याचे अभिवचन देणे;
- आर्थिक परितोष सर्व प्रकारच्या सरबराईचा व सेवायोजनाच्या सर्व प्रकारांचा समावेश होतो. परंतु तीत कोणत्याही निवडणूकीत किंवा निवडणूकीसाठी खरोखर केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात ज्याची यथोचित रीतीने नोंद करण्यात आली आहे अशा प्रदान केलेल्या रकमांचा समावेश होत नाही.

२) गैरवाजवी दडपण, म्हणजे उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने केलेला कोणताही हस्तक्षेप किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न:

परंतु,-

(एक) कोणत्याही व्यक्तीविषयी उमेदवारास किंवा मतदारास आस्था आहे अशा व्यक्तीस समाजबहिष्कृत व जातीबहिष्कृत करणे किंवा तिला जातीतून किंवा जमातीतून काढून टाकणे यासह कोणत्याही प्रकारची इजा पोचवण्याची धमकी देईल,

(दोन) उमेदवारावर किंवा मतदारावर किंवा तो ज्या व्यक्तीविषयी आस्था बाळगतो त्या व्यक्तीवर दैवी अवकृपा होईल किंवा तिला पाप लागेल किंवा ती अशा अवकृपेस पात्र ठरवली जाईल किंवा पापी ठरवली जाईल या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास कोणत्याही उमेदवाराला किंवा मतदाराला प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील,

(ब) सार्वजनिक धोरण जाहीर करणे अथवा सार्वजनिक कृती करण्याचे अभिवचन देणे.

३) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने कोणतेही वाहन किंवा गलबत, पैसे देऊन किंवा अन्य रितीने, भाडयाने घेणे किंवा मिळवीणे किंवा (स्वत: उमेदवार, त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी याव्यक्तीरिक्त) इतर कोणत्याही मतदारास कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा अशा केंद्रापासून मोफत ने-आणीसाठी अशा वाहनाचा किंवा गलबताचा उपयोग करणे:

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी त्यास किंवा त्यांना अशा कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा मतदान केंद्रापासून ने-आणीच्या प्रयोजनासाठी त्याच्या किंवा त्यांच्या सामाईक खर्चाने एखादे वाहन किंवा गलबत, कोणत्याही रेल्वेचा डबा भाड्याने घेणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही.

**'स्पष्टीकरण'** वाहन या संज्ञेचा अर्थ, मग ते यांत्रिक शक्तीने चालणारे असो किंवा अन्य रितीने वापरण्यात येतो असा

४. कोणत्याही निवडणूकीच्या प्रयोजनार्थ संस्थेच्या मालकीच्या वाहनांचा वापर.

५. नियम ६५ चे उल्लंघन करून खर्च करणे किंवा खर्च प्राधिकृत करणे.

६. निवडणुकीसंबंधीच्या कार्यक्रमाच्या घोषणेचा दिनांक तारीख आणि निवडणुकीच्या निकालाचा दिनांक या दरम्यानच्या काळात कोणत्याही मतदारास किंवा मतदारांच्या गटास विशेष आगाऊ कर्जे देणे किंवा त्यावर अन्यथा अनुग्रह करणे.

********

# १९. निवडणुकांमधील अधिकारी इत्यादींनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे.

(१) निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल किंवा निवडणुकीच्या संबंधात कोणतेही कर्तव्य पार पाडण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांजकडून नेमण्यात आलेला एखादा अधिकारी किंवा लिपिक असेल अशा व्यक्तीने निवडणुकीचे संचालन किंवा व्यवस्था करीत असताना, उमेदवारांच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्यासाठी कोणतेही कृत्य करता कामा नये.

(२) वर निर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीने आणि पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीने-

(अ) निवडणुकीत आपले मत देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(ब) निवडणुकीत आपले मत न देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(क) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीच्या मतदानावर कोणत्याही रीतीने दडपण आणण्याचा प्रयत्न करता कामा नये.

(३) निवडणुक प्रक्रियेदरम्यान उमेदवार व त्याचे प्रतिनिधी, संस्थासेवक यांनी पालन करावयाचे आचारसंहितेबाबत प्राधिकरणाने जा क्र. १६७४ दि. १५/६/२०२० अन्वये परिपत्रक निर्गमीत केलेले आहे.

*********

# २०. निवडणुक निर्णय अधिकारी यांनी  सादर करावयाचे अहवाल

**ई-९, ई-१६, व ई-१७, नमुना १ ते २८ मधील माहिती, जप्त केलेल्या अनामतची माहिती, अनामत रक्कम परत केलेची उमेदवारांच्या / प्राधीकृत व्यक्तीच्या सहीसह माहिती, पदाधिकारी निवडीचा अहवाल. निवडणुक प्रक्रिया पुर्ण करीत असताना झालेल्या खर्चाबाबत सविस्तर आदेश प्राधिकरणाने जा क्र. १६८८ दि. १६/०६/२०२० अन्वये निर्गमीत केलेले आहे.**

**********

# २१.  निवडणूक संबंधीत कागदपत्रांची अभिरक्षा आणि विल्हेवाट

- नियम ७१ व नियम ७२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे निवडणूक निकाल घोषित झाल्यापासून ६ महिन्यापर्यंत संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जतन करणे अनिवार्य.
- सहा महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर कागदपत्रांची विल्हेवाट राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा मा. न्यायालयाकडील आदेशास अधिन राहुन करणे अनिवार्य.
- नियम ७२ मध्ये न वापरलेल्या मतपत्रिका, वापरलेल्या मतपत्रिका, रेखांकीत मतदार यादीसह इतर सर्व कागदपत्रांचा समावेश.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियम ७२ मधील न वापरलेल्या मतपत्रिका, वापरलेल्या मतपत्रिका, रेखांकीत मतदार यादी ही कागदपत्रे मा. न्यायालयाकडील आदेशाखेरीज तपासणी करीता कोणत्याही व्यक्ती वा प्राधिकरणासमोर खुली करण्यास प्रतिबंध.
- निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियम ७२ मधील इतर सर्व कागदपत्रे सार्वजनीक तपासणीकरीता खुली करणे अनिवार्य.

## २१.१ निवडणुकीसंबंधीची कागदपत्रे अभिरक्षेत ठेवणे

- निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक निकाल जाहीर करण्याच्या दिनांकपासून ६ महिने इतक्या कालावधीपर्यंत किंवा निवडणूकीसंबंधीच्या विवादाच्या बाबतीत न्यायालयाने निदेश दिला असेल अशा कालावधी पर्यंत अभिरक्षेत ठेवील.

## २१.२ .निवडणूक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी (नियम ७२)

- (१)   निवडणूक निर्णय अधिका-यांच्या अभिरक्षेत असताना :-
- (अ) न वापरलेल्या मतपत्रिकांची  पाकीटे ;
- (ब)  वैध, दुबार नोंदलेली अथवा नाकारलेल्या अशा वापरलेल्या मतपत्रिकांची पाकीटे;
- (क) मतदारांच्या यादीच्या चिन्हांकित प्रतीची पाकीटे  उघडण्यात येणार नाहीत, आणि न्यायालयाच्या आदेशाखेरीज, त्यातील कागदपत्रांचे तपासणी करण्यात येणार नाही
- (२)   निवडणुकीशी संबंधित असलेली इतर सर्व कागदपत्रे लोकांना तपासणीसाठी खुली असतील.

## २१.३ निवडणूकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे (नियम ७३)

- नियम ७२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकीटे, नियम ७१  प्रमाणे  सहा महिन्यापर्यत ठेवण्यात येतील व त्यानंतर ती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा न्यायालय यांच्याकडून असा कोणताही निदेश देण्यात आला असेल तर त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.
- याबाबत प्राधिकरणाने जा क्र. १४३५ दि. १८/०३/२०२० च्या पत्राअन्वये सविस्तर सुचना निर्गमीत केलेल्या आहेत.

********

# २२. नैमित्तिक रिक्त जागा (नियम ७४)

- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) व निवडणूक नियम ७४ अनुसार नैमित्तिक रिक्त जागा विहित रितीने भरण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त.
- समिती सदस्यांचे निधन झाल्यामुळे, सदस्याने राजीनामा दिल्यामुळे, सदस्याला अनर्ह ठरवल्यामुळे अथवा सदस्याला काढून टाकल्यामुळे अथवा पदाची मुदत संपण्यापुर्वी अथवा अन्यथा काम करण्यास तो असमर्थ झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागांचा समावेश **"नैमित्तिक रिक्त जागा"** या सदरात समाविष्ठ होतो.
- निवडणूक निकालाच्या दिनांकापासून समितीचा कालावधी अडीच वर्षापेक्षा जास्त झालेला असल्यास नैमित्तिकपणे रिक्त झालेल्या पहिल्या कमाल २ जागा नामनिर्देशनाने भरण्याचे अधिकार संबंधीत सहकारी संस्थेच्या संचालक मंडळास प्राप्त.
- निवडणूक निकालाच्या दिनांकापासून अडीच वर्षाच्या आत संचालक मंडळात नैमित्तिकपणे रिक्त झालेली जागा निवडणूकीद्वारे भरण्याची संस्थेस मुभा.
- नैमित्तिक पद कोणत्या तारखेस रिक्त झाले आहे ही बाब विचारात न घेता असे नैमित्तिक रिक्त पद भरतेवेळी समितीची मुदत ही अडीच वर्षापेक्षा जास्त झाली असल्यास ती नामनिर्देशनाने भरता येणार आहे.
- याबाबत प्राधिकरणाने जा क्र. ७७५० दि. २६/१०/२०१८ व जा क्र. ३४२८ दि. २८/०३/२०१९ अन्वये आदेश जारी केलेले आहेत.
- तसेच प्राधिकरणाने जा क्र. ७९१० दि.३/११/२०१८ रोजी निर्गमीत केलेले परिपत्रक विचारात घ्यावे.

*********

# २३. “ड” वर्ग संस्था निवडणुक (नियम ७६)

## १. 'ड' वर्गीकरणातील सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक

या भागातील तरतुदी नियम ४(चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या 'ड' प्रकारच्या संस्थांना लागू होतील.

(१) संस्था मतदार यादी तयार करून त्याची एक प्रत तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यास समितीचा कार्यकाल संपण्यापुर्वी कमीतकमी ६० दिवस अगोदर सादर करेल. प्रारुप यादी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन ७ दिवसाचे आत तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी अंतीम मतदार यादीचा कार्यक्रम प्रसिध्द करावा.

(२) अंतीम मतदार यादी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिका-यास सुपुर्द करण्यात याव्यात.

(३) या प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका या प्रयोजनार्थ बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात येतील. अशी सभा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली होईल. अशा सभेची नोटीस निवडणूक निर्णय अधिकारी किंवा यथास्थिति असा अधिकारी अशा सभेसाठी निश्चित दिनांकाच्या किमान पंधरा दिवस अगोदर देईल :

**परंतु, संस्थेच्या सर्वसाधारण सभेने, तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याकडे नियम ७५ मध्ये “क” वर्गीकरणातील सहकारी संस्थांकरीता विहित केल्याप्रमाणे निवडणूक घ्यावी याबाबत ठरावाद्वारे मागणी केल्यास, तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी नियम ७५ मध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार निवडणूक घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करील:**

**परंतु आणखी असे की, जर या प्रयोजनार्थ बोलावण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत, कोणत्याही कारणामुळे समिती सदस्य निवडण्यात कसूर झाल्यास, निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा यथास्थिति तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे नियम ७५ अन्वये विहित केल्याप्रमाणे निवडणूक घेण्यासंदर्भात अहवाल सादर करील:**

**परंतु तसेच, निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या प्राधीकृत व्यक्तीस, कोणत्याही परिस्थितीत मतदानाचा हक्क असणार नाही.**

निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेली व्यक्ती, सभेस उपस्थित राहील आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे ज्या प्रयोजनार्थ अशी सभा झाली त्या सभेनंतर दोन दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करील.

## २. नियम ७६ मधील तरतुदीची वैशिष्ट्ये

१. ‘ड’ वर्ग सहकारी संस्थेच्या निवडणुकीसाठी ‘प्रारुप मतदार यादी’ संस्था स्तरावर तयार करण्यात येते.

२. प्रारुप यादी प्रसिद्ध करणे, त्यावर आक्षेप / हरकती मागविणे, प्राप्त आक्षेप / हरकतींवर निर्णय देणे आणि अंतिम यादी प्रसिद्ध करणे ही संपुर्ण कार्यवाही तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्तरावर पुर्ण करण्यात येते.

३. सदर अंतीम मतदार यादी प्राधिकृत अधिका-यास सादर करणे बंधनकारक आहे.

४. ‘ड’ वर्ग सहकारी संस्थांच्या निवडणुका या प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात येतात.

५. निवडणुकीच्या प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद ‘राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने’ नियुक्त केलेल्या व्यक्तीने भुषविणे अनिवार्य आहे. म्हणजेच, ‘ड’ वर्ग संस्थेचा प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार केवळ राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास असुन असे आदेश संस्था अथवा जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी परस्पर प्राधीकरणाचे पूर्वमान्यतेशिवाय निर्गमित करु शकत नाहीत.

**६. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या ‘प्राधिकृत अधिका-यास’ निवडणुकीच्या सभेची नोटीस सभेसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान पंधरा (१५) दिवस अगोदर निर्गमित करणे अनिवार्य आहे.**

७. **निवडणुकीच्या प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत इच्छुक उमेदवारांची संख्या निवडुन द्यावयाच्या समिती सदस्य संख्येपेक्षा अधिक असल्यास नियम ८० मधील तरतुदीनुसार मतदानाची गुप्तता राखणे अनिवार्य** असल्याने, प्राधिकृत अधिका-याने गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक घेणे बंधनकारक आहे. या साठी प्राधिकरणाने पत्र क्र. १५४१ / २०२० दि. ०६/०५/२०२० द्वारे मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

**८. निवडणुकीसाठी बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत कोणत्याही कारणाने समिती सदस्य निवडण्यात कसूर झाल्यास अथवा अन्य कारणास्तव, जसे अतिगोंधळ, वादविवाद, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास प्राधिकृत अधिकारी हे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा जिल्हा / तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना अशा संस्थेची निवडणूक नियम ७५ ('क' वर्ग संस्थांची निवडणूक) मध्ये नमुद केलेल्या रितीने घेण्याबाबत अहवाल सादर करतील.**

९. निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीस, कोणत्याही परिस्थितीत मतदानाचा हक्क असणार नाही.

१०. निवडणुकीसाठी बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्राधिकृत अधिकारी दोन दिवसांच्या आत आपला अहवाल राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे सादर करील.

## ३. संस्थेस पहिली भेट देण्यापुर्वी करावयाची कार्यवाही

- ✓ संस्थेच्या पदाधिका-यांशी दुरध्वनीद्वारे/ मोबाईलव्दारे संपर्क साधुन भेटीची वेळ निश्चित करुन घ्यावी.
- ✓ संस्थेने सादर केलेला ई-२ नमुना तपासुन, संस्थेच्या विद्यमान समितीचा पदावधी संपण्याचा नेमका दिनांक पहावा. संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचा दिनांक निश्चित करतांना सदर दिनांकाच्या पुर्वी पदाधिका-यांच्या निवडीसह संपुर्ण निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईल अशा प्रकारे नियोजन करावे.
- ✓ संस्थेचे उपविधी तपासुन नेमक्या किती जागांसाठी निवडणूक घ्यावयाची आहे, त्याची निश्चिती करुन घ्यावी.
- ✓ उपविधीतील तरतुदी तपासुन अधिनियमाचे कलम ७३ ब अन्वये अनुसुचित जाती / जमाती साठी एक (१), ईतर मागास वर्गीयांसाठी एक (१) आणि विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्गासाठी एक (१) अशा तीन राखीव जागा आणि कलम ७३ क अन्वये महिलांकरिता दोन (२) राखीव जागा अशा एकुण पाच (५) राखीव जागांच्या आरक्षणाची खात्री करुन घ्यावी.
- ✓ प्राधिकरणाचे आदेश क्र. १५४१ / सन २०२० दि. ०६/०५/२०२० चे प्रपत्र १ मध्ये नमुद नमुन्यात 'विशेष सर्वसाधारण' सभेच्या नोटीसचा मसुदा तयार करावा.
- ✓ उपरोक्त पुर्व तयारी झाल्यानंतर प्राधिकरणाचे आदेश, स्वतःचे ओळखपत्र आणि तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांकडुन प्राप्त झालेली कागदपत्रे यांसह संस्थेच्या पदाधिका-यांची भेट घ्यावी.

## ४. विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस

- ✓ संस्थेच्या निवडणुकीबाबतची 'अधिमंडळाच्या विशेष बैठकीची सुचना प्राधिकृत अधिका-याने खालील नमुन्यातील नोटीस मध्ये तयार करावी.

**नोटीस**

जा.क्र. / /सन दिनांक: / /

<u>**महाराष्ट सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६० अन्वये**</u>

(फक्त सभासदांसाठी)

**अधिमंडळाची विशेष बैठकीची सुचना**

--------------- या सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक श्री.------------ ---------, प्राधिकृत अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ----- रोजी स.---- वाजता ------------------------------------------ - येथे पुढील कामकाजाकरीता बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेचा विषय :** -------------सहकारी संस्थेचे व्यवस्थापन समितीचे निवडणुकीसाठी --------कालावधीसाठी उपविधीतील तरतुद क्र.-- --अन्वये ------- जागांसाठी निवड करणे.

**मा. प्राधिकृत अधिकारी यांचे मान्यतेने** **सचिव / व्यवस्थापक**

**प्रत :** संस्थेचे सर्व सभासद

**विशेष सुचना :**

संस्थेची सदरची अधिमंडळाची विशेष बैठक गणपूर्ती (कोरम) अभावी तहकुब झाल्यास ती बैठक त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी होईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही. यासभेत सभेच्या विषय पत्रिकेवरील विषयावर चर्चा होईल.

- ✓ संस्थेच्या निवडणुकीबाबतची 'अधिमंडळाच्या विशेष बैठकीची सुचना' निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ज्या दिवशी काढली म्हणजेच निर्गमित केली, त्याच दिवशी प्रसिद्ध करावी.
- ✓ सदर नोटीस

  १. संस्थेचा नोटीस बोर्ड

  २. तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याच्या कार्यालयीन नोटीस बोर्ड

  ३. संस्था परिसरात उपलब्ध असलेला ईतर कोणताही सुचना फलक

  या ठिकाणी प्रसिद्ध करुन मतदार यादीत नाव नमुद असलेल्या संस्थेच्या किमान पाच (५) सदस्यांची स्वाक्षरी असलेला 'प्रसिद्धी पंचनामा' तयार करुन घ्यावा व स्वतःचे अभिलेखात सदरचा 'प्रसिद्धी पंचनामा' जतन करावा.
- ✓ तसेच सदर नोटीस संस्थेचे व्यवस्थापक / सचिव यांनी सर्व सभासदांना संस्थेच्या अभिलेखात नोंदविलेल्या पत्त्यावर पाठविल्याची खात्री करुन घ्यावी.
- ✓ सभेची नोटीस सभासदांना पाठविल्याचा दिनांक आणि सभेचा दिनांक यात पंधरा (१५) दिवसांपेक्षा कमी कालावधी असु नये याची दक्षता घ्यावी.
- ✓ संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या 'वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस नोंदवहीत' निर्गमित केलेल्या नोटीसची प्रत चिकटवुन सदर नोंदवहीत नोटीस निर्गमित केल्याची नोंद करावी व स्वाक्षरी करावी.
- ✓ संस्थेच्या उपविधीत संचालक मंडळ रचनेबाबत काहीही नमुद असले तरी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ ब अन्वये अनूसुचित जाती / जमाती प्रवर्गासाठी एक (१), इतर मागास वर्गीय प्रवर्गासाठी एक (१), आणि विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्गासाठी एक (१) अशा तीन (१) राखीव जागा आणि कलम ७३ क अन्वये महिलांकरिता दोन (२) राखीव जागा अशा एकुण पाच (५) आरक्षित जागांची निवडणूक घेणे अनिवार्य असल्याने सदर पाच (५) आरक्षित पदांचा समावेश नोटीस मध्ये करावा.

## ५. विशेष सर्वसाधारण सभेची पुर्वतयारी

- ✓ विशेष सर्व साधारण सभेस जातांना 'निवडणूक निर्णय अधिकारी' यांनी खालील बाबी स्वतःसोबत घेऊन जाव्यात-

  १. प्राधिकरणाचे 'निवडणूक निर्णय अधिकारी' म्हणुन नियुक्तीचे आदेश -

  २. ओळखपत्र -

  ३. संस्थेने सादर केलेला ई-२ नमुन्याची प्रमाणित प्रत -

  ४. ई-३ नमुन्यातील 'अंतीम मतदार यादीच्या' तीन (३) प्रमाणित प्रती -

  ५. संस्थेच्या मंजुर उपविधीची प्रमाणित प्रत -

  ६. विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस आणि सदर नोटीस प्रसिद्धीचा पंचनामा -

  ७. विशेष सर्वसाधारण सभेची नोंदवही -

  ८. प्रपत्र १० मधील 'निवडणूक कार्यक्रम' -

  ९. विहित नमुन्यातील नामनिर्देशन पत्राच्या पुरेशा प्रती -

  १०. निवडणूक निर्णय अधिका-याचा शिक्का -

  ११. मतपेटी -

  १२. कुलुप -

  १३. कुलुप सिलबंद करण्याचे छोटे कापड -

  १४. लाख -

१५. सुई व दोरा -

१६. मेणबत्ती व माचीस -

१७. फुटपट्टी -

१८. पेन व पेन्सील -

१९. पुरेसे कोरे कागद -

२०. मतदानाची शाई / पेन ( Indelible ink / Marker pen) –

२१. मतमोजणी तक्ता-

- ✓ उपरोक्त नमुद सर्व बाबींची तपासणी सुची (check list ) तयार करुन सर्व बाबी घेतल्याची आणि अचुक असल्याची खात्री करावी.
- ✓ विशेष सर्वसाधारण सभेच्या निश्चित वेळेस अनुसरुन प्रपत्र १० मधील नमुन्यात निवडणूक कार्यक्रम तयार करुन घ्यावा.
- ✓ संस्थेचे सचिव / प्रशासक / प्राधिकृत अधिकारी यांना लिखित पुर्वसुचना देउन आवश्यक असलेल्या सहकार्याची जाणिव करुन द्यावी आणि जातीने उपस्थित राहण्याची सुचना द्यावी.
- ✓ निवडणुकी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्भवण्याची शक्यता असल्यास खात्री करुन घेऊन संस्थेच्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन, संबंधित तालुका दंडाधिकारी आणि तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयास निवडणुकी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करणे बाबत लेखी स्वरुपात विनंती पत्र द्यावे.
- ✓ उपरोक्त प्रमाणे विशेष सर्वसाधारण सभेची पुर्व तयारी पुर्ण झाल्यानंतर सभेच्या विहित दिनांकास सभेच्या निर्धारीत वेळेपुर्वी किमान एक (१) तास आधी सभास्थानी हजर होऊन संस्थेचे सचिव / प्रशासक / प्राधिकृत अधिकारी यांची भेट घ्यावी आणि निवडणुकीच्या पुर्वतयारीचा आढावा घ्यावा.

## ६. सभेतील निवडणुकीची उद्घोषणा व गणपुर्ती

- ✓ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने विशेष बैठकीचे निर्धारीत दिनांक, वेळी व स्थानी हजर होऊन स्वत:स प्राधिकरणाने निवडणूकीच्या सभेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त केल्याची उद्घोषणा करावी व खालील प्रमाणे निवेदन करावे.
- ✓ तत्पुर्वी कोरम पुर्ण झाला आहे किंवा नाही याची खात्री करावी, कोरम पुर्ण न झाल्यास सभा अर्धा तसा तहकुब करुन सभा गणपूर्ती होत नसेल तरीही पुन्हा सुरु करावी.

## नि वे द न

" उपस्थित सन्माननीय सभासद बंधु/ भगिनींनो, आपली संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ४ अन्वये निवडणुकीचे प्रयोजनार्थ "ड" वर्गात मोडते. नियम ७६ अन्वये 'ड' वर्गातील सहकारी संस्थेची व्यवस्थापन समितीची निवड ही संस्थेचे अधिमंडळाचे बैठकीत घेण्याची तरतुद आहे. त्यानुसार या सभेचे आयोजन केलेले आहे.

नियमातील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने माझी या सभेचे अध्यक्ष म्हणुन नियुक्त केलेली आहे. त्यांचे दिनांक ----- चे आदेशान्वये मी -------- प्राधिकृत अधिकारी आपल्या संस्थेचे सन .......... ते सन .......... कालावधीकरीता व्यवस्थापन समितीचे निवडीकरीता या सभेचा अध्यक्ष म्हणुन उपस्थित आहे. सभेत एकुण.......... सभासद उपस्थित असुन संस्थेचे उपविधीतील तरतुद क्र....... अन्वये कोरम पुर्ण झाला आहे. उपस्थित सभासदांपैकी अंतिम मतदार यादीत नाव असलेल्या सभासदांनाच निवडणूक प्रक्रियेत मत देण्याचा/ नामनिर्देशन करण्याचा अधिकार आहे. ज्यांचे नाव अंतिम मतदार यादीत नाही त्यांना निवडणुकीसाठी उमेदवार होणेचा, उमेदवारास सुचक अनुमोदक होणेबाबत व उमेदवार निवडीसाठी मत देण्याचा अधिकार नाही " याची नोंद घ्यावी.

- ✓ त्यानंतर विषयपत्रिकेवरील एकमेव विषयाचे वाचन करुन निवडुन द्यावयाच्या समिती सदस्यांची संख्या, आरक्षणाच्या जागा यांची घोषणा करुन सुचक व अनुमोदकाच्या नावांसह उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र सादर करण्याची सुचना देण्यापुर्वी खालील प्रपत्र - १० मधील नमुन्यात निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करावी.
- ✓ निवडणूक कार्यक्रमाची उद्‌घोषणा झाल्यानंतर मतदार यादीत नाव असलेल्या ईच्छुक सभासदांना विहित नमुन्यातील नामनिर्देशन पत्रांचे वितरण करावे.
- ✓ नामनिर्देशन पत्र वितरित करतांना विशेष सर्वसाधारण सभेच्या नोंदवहीत ईच्छुक उमेदवाराचे नाव आणि मतदार यादीतील अनुक्रमांकाची नोंद घ्यावी.
- ✓ त्यानंतर, प्राधिकृत अधिकारी यांनी जाहिर निवडणूक कार्यक्रमानुसार विहित वेळेत प्राप्त नामनिर्देशनांची सुचक अनुमोदकांच्या नावासह इतिवृतात नोंद घेऊन त्यांच्या संमतीदर्शक स्वाक्षऱ्या घ्याव्या आणि विहित वेळ संपल्यावर प्राप्त नामनिर्देशनांची घोषणा करावी.
- ✓ त्यानंतर प्राधिकृत अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी करुन वैध नामनिर्देशन पत्रांची उद्‌घोषणा करावी व त्याची इतिवृतात नोंद घ्यावी.
- ✓ नामनिर्देशन पत्रांची छाननी करतांना प्राधिकृत अधिकारी यांनी ह्या मार्गदर्शक हस्तपुस्तिकेच्या प्रकरण १ मधील अधिनियमातील अपात्रता विषयक तरतुदी आणि संस्थेच्या मंजुर उपविधीतील समिती सदस्यत्वाच्या पात्रता विषयक तरतुदी विचारात घेउन नामनिर्देशन पत्राचे मंजुरी किंवा नामंजुरी बाबत निर्णय घ्यावा आणि सदर निर्णय नामनिर्देशन पत्रावर आणि सभेच्या ईतिवृत्तांतात नोंदवावा.
- ✓ नामनिर्देशन पत्रांची छाननी पुर्ण झाल्यानंतर वैध नामनिर्देशनांची घोषणा करावी आणि तशी नोंद सभेच्या ईतिवृत्तांतात करावी.
- ✓ त्यानंतर, प्राधिकृत अधिकारी नामनिर्देशन माघारी घेणे बाबत उमेदवारांना विचारणा करेल व माघार घेणाऱ्या उमेदवारांच्या नावाची उद्‌घोषणा करुन इतिवृत्तांतात स्वाक्षरीसह नोंद घेईल.
- ✓ नामनिर्देशन पत्र माघारीची विहित वेळ संपल्यानंतर प्राधिकृत अधिकारी अंतीम वैध उमेदवारांच्या नावाची उद्‌घोषणा करुन इतिवृत्तांतात नोंद घेईल.

## ७. अविरोध निवडणूक

- ✓ समिती सदस्य पदासाठी निर्धारीत संख्येएवढीच नामनिर्देशने प्राप्त झाल्यास त्यांची समिती सदस्य म्हणून अविरोध निर्वाचनाची घोषणा करुन प्राधिकृत अधिकारी नवनिर्वाचीत सदस्यांची नावे घोषित करुन इतिवृत्तांतात त्याची नोंद घेईल.
- ✓ अविरोध निवडणुकीची उद्‌घोषणा झाल्यानंतर प्राधिकृत अधिकारी यांनी खाली नमुद प्रपत्र ७ मध्ये निवडणूक निकालपत्र नवनिर्वाचित समिती सदस्यांना आणि संस्थेच्या अध्यक्ष / सचिवांना देऊन त्यांची पोहोंच घ्यावी.
- ✓ अविरोध निवडणुकीचे निकालपत्र दिल्यानंतर तात्काळ निवडणूक संपन्न झाल्याचा अहवाल, निवडणुकीचे निकालपत्र आणि विशेष सर्वसाधारण सभेचा ईतिवृत्तांत यांच्या प्रमाणित प्रती तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करण्यात येतील. त्याच प्रमाणे सदर बाबी प्राधिकरणासही सभेच्या दिनांकापासुन दोन (२) दिवसांच्या आत सादर करण्यात येतील.
- ✓ प्राधिकृत अधिका-याने त्या नंतर संस्थेचे निबंधक यांचे कार्यालयात पाठपुरावा करुन नवनिर्वाचित समितीच्या गठणाची अधिसुचना प्राप्त करुन घ्यावी.
- ✓ नवनिर्वाचित समितीच्या गठणाची अधिसुचना प्राप्त होताच प्राधिकृत अधिका-याने पदाधिकारी निवडीसाठी नवनिर्वाचित समिती सदस्यांच्या पहिल्या सभेची सुचना उपविधीतील तरतुदींना अनुसरुन निर्गमित करावी.
- ✓ **पदाधिका-यांची निवड विशेष सर्वसाधारण सभेच्या दिनांकापासुन १५ दिवसांच्या आत घेण्यात येईल याची दक्षता घ्यावी.**

## ८. लढविलेली निवडणूक

- ✓ माघारीनंतर समिती सदस्य पदासाठी निर्धारीत संख्येपेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे शिल्लक राहील्यास प्राधिकृत अधिकारी प्रवर्ग निहाय उमेदवारांच्या नावाची घोषणा करुन अधिमंडळ बैठकीत निवडणूक प्रक्रिया गुप्त मतदान प्रक्रियेनुसार पार पाडतील.
- ✓ **सदर निवडणूकीत केवळ अंतीम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या सभासदांनाच मते देण्याचा हक्क आहे.**
- ✓ **"ड" वर्ग संस्थांची निवडणूक घेतांना निवडणूक नियम ८० नुसार गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेणे अनिवार्य असल्याची बाब उपस्थित मतदारांच्या निदर्शनास आणुन द्यावी.**
- ✓ उपविधी प्रमाणे निवडुन दयावयाच्या विहीत जागापेक्षा अधिक उमेदवार असतील तर प्राधिकृत अधिकारी यांनी घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमास अनुसरुन मतदानाची तयारी करावी.
- ✓ सर्व प्रथम उमेदवारांची प्रवर्ग निहाय अंतीम यादी प्रसिध्द करावी.
- ✓ त्यानंतर प्रसिद्ध केलेल्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादी प्रमाणे प्रवर्गनिहाय मतपत्रिकेचे मसुदे उपलब्ध सोयी प्रमाणे सुवाच्च अक्षरात हस्तलिखित अथवा टंकलिखित स्वरुपात नमुन्यात तयार करावे.
